**विदयापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या लघुसंशोधन प्रकल्पांतर्गत लघुशोधप्रबंध**

# पारनेर तालुक्यातील पळशीचे ऐतिहासिक महत्व



**संशोधक**

**काकडे भिमराज जयराम**

**एम. ए., बी. पी. एड. (इतिहास)**

**विभागप्रमुख, इतिहास विभाग**

**टाकळी ढोकेश्वर कला महाविदयालय,**

**टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर,**

**जि. अहमदनगर**

# प्रस्तावना

पारनेर तालुक्यातील पळशीचे ऐतिहासिक महत्व या विषयावर संशोधन करत असताना अहमदनगर जिल्ह्याचा महत्वाचा ऐतिहासिक ठेवा म्हणून पळशीकडे पाहिले जाते. ज्याप्रमाणे मौत्याचा हार तुटावा आणि काही मौती नजरेच्या टप्याआड व्हावेत, अशी कितीतरी ठिकाणे अहमदनगर जिल्ह्यात नजरेच्या टप्याआड गेलेली आहेत. अहमदनगर वस्तू संग्रहालयास मिळालेले पळशीकर दप्तर हा एक अमुल्य ठेवा आहे. त्याचा पुर्न:अभ्यास व्हावा आणि ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचे ऐतिहासिक महत्व सर्वांना ज्ञान व्हावे म्हणून हा लघुशोधप्रबंध मी लिहीण्यासाठी घेतला.

ऐतिहासिक स्थळांचा, वाड्यांचा शासनाकडून विकास व संरक्षण व्हावा या दृष्टिकोनातून त्यावर या निमित्ताने पळशीचे ऐतिहासिक महत्व या विषयावर प्रकाश टाकत आहे. रामजी यादव यांना नेमणुक व जहागीर देऊन २५ जुलै इ. स. १७५० मध्ये श्रीमंत बाळाजी पंडित पेशवे यांनी मल्हाररावांचे दिमतीस माळव्याचे स्वारीस पाठविले. तेव्हापासून होळकर घराण्याची दिवाणगिरी अगर नायब दिवाणगीर या घराण्यातील ५ पिढ्यांनी शंभर सव्वाशे वर्षे इमाने इतवारे केली व वंशपरंपरागत दिवाणसाहेब ही पदवी व दरबारात पहिला मान मिळविला. या घराण्यातील कर्ते पुरुष पहिले सुभेदार मल्हाररावापासून अहिल्याबाई, तुकोजीराव, काशीराव, यशवंतराव, हरिहरराव या सर्व राजांच्या विश्वासावर होते. रामजी अप्पाजी हे रामजी यादवांचे नातू तुकोजी होळकरानंतर दुसरे बाजीरावांचे कारकिर्दीत होळकरांचे मुख्य दिवाण होते. त्यामुळे पूर्ण दरबाराचे होळकरांचे वकील, उज्जैनचे वकील वगैरेंनी बाजीरावसाहेब पेशवे, नाना फडणीस, दौलतराव शिंदे, इंग्रज यशवंतराव होळकर वगैरे संबंधीची राजकीय माहिती (इ. स. १७४०) पासुनची विशेष तपशीलवार अशी पुण्याचे होळकरांचे वकील अप्पाजी जाखदेव व दादो भैराळ कळवित होते. राजकारणातील अगदी अंतर्गत डावपेच, परस्परातील सरदारांचे शत्रुत्व, आर्थिक शोषण, शिंद्यांचे फौजेचा जमाखर्च (दोन कोटी नजराणा व वीस लाख रुपये महिना फौजेचा खर्च) सरदारांवर वरात, जप्त्या, अरबांची धरणी वगैरे पडत्या काळातील वर्णने भयानक आहेत.

राज्यातील गावे आपल्याच अनेक सरदारांनी लुटली, जाळली, खंडण्या घेतल्या गावे ओसाड पडली, वगैरे अनेक वर्णने पत्रात आहेत. बाजीराव पेशवे व नाना फडणीस हतबल झाले होते. या काळास गर्दीचा वखत म्हटले आहे. यशवंतराव होळकरांचे पराक्रमामुळेच होळकरशाही वाचली. श्रीमंताचे राज्य राहत नाही असे उद्गार अनेक पत्रात आहेत. पेशवाई जाण्यापूर्वीचे वीस बावीस वर्षापासूनचे उल्लेख आढळतात. याशिवाय भिल्ल, पेंढारी यांच्या टोळ्या व पठाण, अरब वगैरे, दर गावातून हजार, दोन हजार, पाच हजार रुपये वसुल करुन घोडे, बैल, धान्ये, वैरणीच्या रुपाने लुटीत होते. प्रमुख लोकांस राखेचे तोबरे दिल्याचे व जाळपोळ केल्याचेही प्रकार अनेकदा झाले.

पळशी येथील दिवाणसाहेबांचा जुना वाडा कागदपत्रासह व कितीतरी गावातील इतर वाडे जाळलेले आज दिसत आहेत. तरीही आजच्या पळशीकरांचे वाडयात रामराव अप्पाजींचे म्हणजे इ.स. १७९८ पासूनचे हजारो कागद अस्ताव्यस्त स्थितीत होते. त्यामधून काही निवडक तीनशे कागदपत्रे नगरच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयाचे प्रमुख सुरेशो जोशी व स. शि. मिसळ यांनी निवडली. ही सर्व कागदपत्रे मोडलिपी मध्ये होती. मोडीतून ती कागदपत्रे मराठीतून करुन ठेवली आहेत.

आपण ज्या परीसरात राहतो त्या परिसराचा गतकाळातील घटनांचा अभ्यास करण्याकडे अलिकडील काळात भर दिला जात आहे. इतिहासाच्या अध्यतन अभ्यासप्रणालीमध्ये स्थानिक इतिहास (Local History), जनसमुहांचा अभ्यास (Subaltarn History) यांना अलिकडे जास्त महत्व प्राप्त होत आहे. म्हणूनच मी पारनेर तालुक्यातील पळशीचे ऐतिहासिक महत्व या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले. पळशीचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्व फार मोठे आहे. इतिहासाचा तो एक महत्वाचा अलंकार आहे. पुराणवस्तू खात्याने अशा ऐतिहासिक वस्तूंचे जतन व संरक्षण केले पाहिजे हा एक दृष्टिकोन आहे. निश्चितपणे पळशी व परीसर हा त्या अर्थाने महत्वाचा आहे.

# ऋणनिर्देश

इतिहासाचे थोर अभ्यासक स. मा. गर्गे यांनी म्हटलेल्या 'अंधार दिसेल तिथे बॅटरीचा वापर करा' या उक्तीप्रमाणे मी 'पारनेर तालुक्यातील पळशीचे ऐतिहासिक महत्व' या विषयावर लघुशोधनिबंधाचे काम हाती घेतले. पळशीचा स्थानिक इतिहास हा अत्यंत महत्वाचा आहे. ज्या स्थानिक इतिहासाकडे दुर्लक्ष झाले आहे, त्या स्थानिक इतिहासावर मी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. या मौलीक कार्यमध्ये ज्या ज्या व्यक्तींनी महत्वाची भूमिका बजावली व सहकार्य केले त्यांचे ऋण न फिटणारे आहेत.

द. वा. पोतदार, इतिहास मंडळाचे ग. ह. खरे, श्रीमंत आबासाहेब मुजुमदार, शिवाजी महाराजांचे चरित्र लिहीणारे बाबासाहेब पुरंदरे यांनी पळशीकर दप्तरातील महत्वाची पत्रे पाहिली व ही पत्रे अत्यंत महत्वाची आहेत हे मान्य केले. इतिहास संशोधक स. शि. निसळ व नगरच्या ऐतिहासिक संग्रहालयाचे प्रमुख मा. सुरेश जोशी यांनी पळशीकर दप्तरातील महत्वाची पत्रे संकलित करण्याचे महत्वपुर्ण कार्य पार पाडले.

पळशीकरांचे मोडी लिपीमध्ये असणारे रेकॉर्ड व त्या रेकॉर्ड मधील महत्वाची पत्रे त्यांनी अभ्यासासाठी घेतली. इ. स. १७९५ ते इ. स. १८१८ या कालखंडातील पत्रे त्यांनी अभ्यासासाठी घेतली होती. पळशीचा इतिहास समजून घेण्यासाठी त्याचा मला फायदा निश्चितच झाला. त्या पत्रांमधूनच काही महत्वाची पत्रे मी लघुशोधनिबंधामध्येही आधारासाठी घेतलेली आहेत.

नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पळशीचे पूर्वी जहागीरदार असल्यामुळे श्रीमंत रामराव कृष्णराव पळशीकर दिवाणसाहेब यांनी मोठ्या मनाने हा महत्वाचा संग्रह नगर जिल्ह्यातील ऐतिहासिक मंडळास इ. स. १९६५ मध्ये दिला. मा. स. शि. निसळ व मा. सुरेश जोशी यांना त्यावेळेस मोडी लिपी वाचण्यासाठी श्री. दादा जोशी, श्रीधर रंगनाथ तांबोळी, इ. नी वारंवार मदत केली. त्यांचे हे मौलीक कार्य कधीही न विसरण्यासारखे आहे. जामखेडचे भिडे गुरुजी यांनी त्यावेळेस महत्वाच्या कागदपत्रांची निवड केली. त्या कागदपत्रांचा मला उपयोग झाला. म्हणूनच पारनेर तालुक्यातील पळशीचे ऐतिहासिक महत्व सर्वांना ज्ञात करण्याचा प्रयत्न लघुशोधनिबंधाद्वारे मी केला.

मा. प्रा. कं. श. सहाणे, उपप्राचार्य यु. आर. ठुबे, डॉ. सुरेश जोशी, माजी प्राचार्य आर. व्ही. शेरकर, प्राचार्य डॉ. एस. टी. खरात, श्री. स्वानंद भालेराव (पत्रकार, दै. सकाळ), श्री. शरद झावरे (पत्रकार, दै. लोकसत्ता), श्री. दादा भालेकर (पत्रकार, दै. लोकमत) श्री. बबनराव गायके सर (पत्रकार, दै. सार्वमत) पळशीचे पोळ या सर्वांनी लघुशोध निबंध लिहीण्यासाठी जे मार्गदर्शन केले ते अनमोल आहेत.

मा. प्राचार्य आर. व्ही. शेरकर यांच्या मार्गदर्शनामुळे व सततच्या आग्रहामुळे संशोधनाची दिशा माझ्या मनात निश्चित झाली. प्राचार्य डॉ. ना. म. कदम, सहकारी प्राध्यापक वर्ग व सेवक वृंद यांचे प्रोत्साहनही तेवढेच मौलीक आहे.

प्रा. विरेंद्र धनशेट्टी यांनी या शोधनिबंधाच्या प्रिटांगची सर्व जबाबदारी स्वीकारली, त्यांचे हे मौलीक सहकार्य आभारापलीकडचे आहे. या सर्वांच्या ऋणानुबंधाच्या या गाठी अशा न सुटणा-या आहेत आणि म्हणूनच त्यातील बंधन अधिक महत्वाचे, मौलीक व आभारापलीकडचे आहे. या सर्वांच्या ऋणानुबंधातच राहण्यातच मी अधिक आनंद मानतो.

**काकडे भिमराज जयराम**
विभागप्रमुख, इतिहास विभाग
टाकळी ढोकेश्वर कला महाविद्यालय,
टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर,
जि. अहमदनगर

# <u>अनुक्रमणिका</u>


| अ. नं. | प्रकरण | प्रकरणाचे नांव | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ०१ | | प्रस्तावना | ०२ |
| ०२ | | ऋृणनिर्देश | ०४ |
| ०३ | पहिले | पळशीकर घराण्याचा इतिहास | ०७ |
| ०४ | दुसरे | संदर्भ संस्कृतीचे व संदर्भ उपेक्षितांचे -पळशी | १० |
| ०५ | तिसरे | होळकरांबरोबर - पळशीकर घराण्याचा उदय - पानीपतावर पराक्रम (इ.स.१७६१) | १३ |
| ०६ | चौथे | पळशी गावातील वाडे व मंदिरे | १७ |
| ०७ | पाचवे | सुंदर व कोरीव वास्तू शिल्पांची वस्ती - पळशी | २० |
| ०८ | सहावे | पळशीकर दप्तरातील दिवाण पळशीकर घराण्याशी संबंधीत असलेली महत्वाची पत्रे | २५ |
| ०९ | परिशिष्टे | क्रमांक एक ते सहा | १०८ |

प्रकरण १ ले

# पळशीकर घराण्याचा इतिहास

पळशीचा इतिहास समजून घेण्यासाठी पळशीकर घराण्याचा इतिहास व वंशावळ अभ्यासणे महत्वाचे आहे. दिवाण पळशीकर दप्तर खंड पहिला इ. स. १९७२ मध्ये प्रकाशित झाला. पळशीकर घराण्यातील वंशवृक्षातील बहिरव, तिमरस या सुरुवातीच्या दोन नावावरुन हे घराणे मूळचे कर्नाटकात बहामनी काळात होते असे दिसते. यांचे उपनाव कांबळे, देशस्थ, ऋग्वेदी, ब्राम्हण, सुत्र, आश्वलायन गोत्र वसिष्ठ कुलदैवत जगदंबा. परंतु पुढे कर्नाटकाच्या लढायात पराक्रम गाजविल्याने हे घराणे नावारुपास आले. तिसरे पुरुष नरसिंह तिमरस कांबळे हे सोलापूर प्रांतात देशपांडे होते. तेथून ते नगर पुणे प्रांती राजगारास इ. स.१५१० चे सुमारास आले. त्यावेळेस बु-हाण निजामशहा पहिला याचे राज्य अहमदनगर येथे होते. काही काळ नरसिंह तिमरस कोतुळ येथे शिकदार होते. त्यानंतर त्यांनी नगर जिल्ह्यातील पळशी, वनकुटे, मांडवाखुर्द, चिखलठाण व तास या गावातील जोशी कुलकर्णी यांची मर्जी संपादन केली. असे समापत्र कार्तिक शु//५ शके १६५७ ऑक्टोबर १० इ.स. १७३५ मध्ये रामजी यादव व त्यांचे चुलत बंधू नागो अनंत व महादजी शामराज कुलकर्णी मौजे पळशी व मांडवाखुर्द रामजी यादव यांचे दोन शाखांकडे वनकुटे, चिखलठाण व तास तीन चुलत शाखांकडे अशी वतनाची वाटणी झाली.

नरसिंह तिमरसांचे सहाव्या पुत्रांचे पणतू रामजी यादव हे होते. यांचा होळकरशाहीचे संस्थापक मल्हारराव होळकर यांचा अत्यंत स्नेह होता. त्यांच्या विषयीची आख्यायिका महत्वाची आहे. पळशी, मांडवे या गावातील भाऊ हिश्याप्रमाणे येणा-या वाटणीवर वाढत्या कुटुंबाची पूर्तता होईना म्हणून ऐश्वर्य प्राप्तीसाठी तपश्चर्या करण्यास रामजी यादव हे सप्तशृंगांस गेले व कठोर तपश्चर्या केली. श्री जगदंबा प्रसन्न होऊन तिने साक्षात दर्शन दिले व बोलली की, मी प्रसन्न आहे आता तू सेवा पूरी कर व गावास जाताना तुला विशेष काही चमत्कार दिसेल तेथे थांब. त्यापासून तुझा उत्कर्ष होत जाईल. असे सांगून हातावर भाकरी व आंबाड्याची भाजी ठेवली. रामजी यादव आनंदात गर्क असताना मुर्ती गुप्त झाली. तेव्हा ते बावरले गेले हातात पहातात तो प्रत्यक्ष प्रसाद.

दृष्टांतावर विश्वासून अनुष्ठानाची सांगता करून रामजी यादव यांनी गावचा रस्ता धरला. पुणे जिल्हा, तालुका सासवड पैकी होळ येथील खंडूजी वीरकराचा मुलगा मल्हारी बाप वारल्यामुळे आपले मामा भोजराज बारगळ यांचेकडे तळोदे येथे राहून मेंढरे चारीत होता. मल्हारी मेंढरे चारणीस लावून एका झाडाखाली निद्रीस्त असता (झोपी गेलेला असताना) वारुळातून नाग येऊन त्याने मल्हारीवर फणा धरुन सावली केली. हा चमत्कार स्वत: रामजीने पाहून आश्चर्यचकित होऊन विचार करीतात तो, श्री जगदंबेच्या स्वप्नातील वचनाचे त्यांना स्मरण होऊन ते आनंदीत झाले.

इतक्यात मुलाची आई भाकर घेऊन तेथे आली व मुलावर नागाने धरलेला पाहून घाबरुन आरडाओरडा करु लागली. लोक धावले तो गडबड ऐकून नाग वारुळात निघून गेला. नंतर मुलास जागे करून तो सुरक्षित आहे, असे पाहून या चमत्काराचा अर्थ लोकास विचारू लागली. सर्वांनी रामजी यादव यांना घटना काय आहे, म्हणून विचारले. रामजी पंतांनी सांगितले की, हा मुलगा भाग्यवान आहे. तो पृथ्वीपती होईल मात्र यास दहा वर्षे चांगले सांभाळा हे भाषण मल्हारजींनी ऐकले व रामजीच्या पाया पडून म्हणाले की, म्हणाले की, हे जर खरे होईल तर मी आपणास विसरणार नाही, तुम्हास मी माझा दिवाण करीन.

पुढे बारगळ यांनी मल्हारजीस कदम बांडे सरदाराकडे शिपाईगिरी करावयास लावले. एका स्वारीत पेशवे यांचे बरोबर बांडे यांची फौज असता त्यातील मल्हारजीचा पराक्रम पाहून बाजीराव साहेबांनी त्यांना आपले फौजेत कदम बांडचांकडून मागवून घेतले. इ. स. १७४१ मध्ये श्रीमंत मल्हारराव होळकर आपले मामा कदम बांडे साहेबांसह पळशीस आले व श्री रामजी यादव यांचेसह पुण्यास जाऊन पेशवे सरकारास जाऊन भेटले. पेशवे सरकाराने मल्हारराव यास सुभेदार किताब दिला. सुभेदार मल्हारराव होळकर व रामजी यादव यास उत्तर दिशेस गाव काबीज करण्यास पाठविले. त्या समवेत फौजफाटा देऊन जाण्याचा हुकुम दिला.

त्याप्रमाणे फौजफाटा घेऊन नगर, मनमाड, चांदवड वगैरे गावे काबीज करत गेले. पुढे खर्चाची तंग आल्यामुळे रामजी यादव हे पुण्यास गेले व पुण्यास जाऊन तीन लाख रुपये पेशवे सरकाराकडून आणले. फौजेचा बंदोबस्त करून पेशवे सरकारचा निरोप श्रीमंत मल्हाररावास सांगून त्यांच्याबरोबर ब-हाणपूर, खांडवा वगैरेकडून नर्मदा काठी महेश्वरला मुक्काम केला. नंतर घाट उतरुन इंदोरला आले. तेथे नंदलाल जमीनदार साहेबांची भेट घेऊन फतीयाबाद, रतलाम, चितोड, खजुरीपथ, रामपुरा, भालपूरापर्यंत प्रांत काबीज

करुन सुभेदार आणि रामजी यादव पळशीकडे दक्षिणेत आले. नंतर पुण्यास जाऊन सर्व हकीकत पेशवे यांना सांगितली.

काही दिवसांनी पेशव्यांची स्वारी पानपत व सौनपतवर गेली. सर्व सरदारांबरोबर सुभेदार मल्हारराव होळकरांबरोबर रामजी यादव व त्यांचे पुत्र आनंदराव हेही गेले. (पानीपतची तिसरी लढाई इ. स.१७६१ मध्ये झाली त्यामध्ये महत्वाची भूमिका निभावली) पानीपतच्या लढाईत मोठे नुकसान झाले. मराठ्यांची संपूर्ण एक पिढी पानीपतच्या रणसंग्रामामध्ये कापली गेली. त्यामध्ये रामजी यादव यांचा मुलगा आनंदराव हेही मरण पावले. त्यांचे बायकास घेऊन सुभेदार परत आले. नंतर रामजी यादव खजुरपथ येथे आले. काही दिवसांनी बांदा येथून रामजी यादव पळशीस आले. पळशीस आल्यानंतर त्यांच्या दोन स्त्रीया सती गेल्या. त्यांची स्मारके, वृदांवने, उत्तम घाट बांधून तेथे आहेत. पुढे रामजी यादवांचे स्मारक तेथे रामेश्वर मंदीर बांधून केले आहे. त्यासमोर वाहती नदी आहे. त्यामध्ये सुमारे एक ४० फूट रुंद व ६० फूट लांब असा तलाव करुन ती स्थळे रम्य केली आहेत.

त्यांचा दुसरा मुलगा अप्पाजी रामजी साधु वृत्तीचा होता. त्याचा मुलगा रामराव अप्पाजी पुष्कळ वर्षे दिवाण होते. त्यांचा मुलगा केशवरावही दिवाण होता. त्याचा भाऊ नारायण यासही कुणीतरी मूठ मारल्याने त्याचा अंत झाला. त्यांचे पुत्र रामराव नारायण होते. त्यांना हरिहररावांनी दिवाणगिरीची वस्त्रे व सनद दिली व सांगितले की, वडीलांचे जागी चांगले त-हेने कारभार करावा. त्यांची हुशारी पाहून दुसरे तुकोजीराव होळकर यांनी नेमणुक केली.

अशाप्रकारे रामराव नारायण यांना वतन, इनाम, व हुद्दा प्राप्त झाला. त्यांच्या सात बायका झाल्या. शेवटच्या पत्नी पार्वतीबाई यांना कृष्णराव रामराव झाले व दोन तीन वर्षांनी रामराव नारायण वारले. त्यांच्या पश्चात पार्वतीबाई उर्फ ताईसाहेब सर्व घरचा कारभार पाहत होत्या. कृष्णराव डॅली कॉलेजमध्ये शिकत असताना त्याला फिट्स येऊ लागल्या म्हणून त्यांना दत्तक घेण्याची परवानगी दिली. त्यांनी गंगाधर कांबळे यास दत्तक घेऊन त्याचे नाव नारायण ठेवले. हे नारायणराव होळकर कॉलेजमध्ये शिकले. नंतर कृष्णराव यांना औरसपुत्र रामराव झाले तेच हल्लीचे विदयमान पुरुष व या घराण्याचे वारस इंदोरला दिवाणसाहेब म्हणून प्रसिध्द आहेत.

हे पळशीकर घराणे इंदोरला स्थायिक झाले. त्यांना इंदोरमध्ये दिवाणसाहेब म्हणून ओळखले जाते. पेशव्यांच्या काळातील पळशीकरांचा वारसा पानीपतावरील पराक्रम हा ऐतिहासिक कार्याचा महत्वाचा ठेवा व वारसा आहे.

प्रकरण २ रे

# संदर्भ संस्कृतीचे संदर्भ उपेक्षितांचे : पळशी

पळशी हे गाव पारनेर तालुक्याच्या काहीशा दुर्गम भागात वसलेले आणि म्हणूनच ऐतिहासिक संदर्भाच्या दृष्टीने आणि उपेक्षित असलेले सुमारे ४००० लोकवस्तीचं टुमदार खेडेगाव. ऐतिहासिक ऋणानुबंधाचं लेणं शिरावर अभिमानानं बाळगत असल्याची प्रचिती गावाला भेट दिल्यानंतर प्रथमदर्शनीच येते.

विठ्ठल-रखुमाई हे या गावाचं आराध्य दैवत मंदिराच्या स्थापनेचे संदर्भ ऐतिहासिक शिवाजी महाराजांच्या सुरतेच्या लुटीमधील काही रक्कम मंदिराच्या उभारणी कामी वापरल्याची माहिती व वंदता आहे.

पळशी गावचे मूळ वतनदार रामराव अप्पाजी पळशीकर यांचे चिरंजीव आनंदराव रामराव उर्फ आण्याबा पेशव्यांकडे सुभेदार होते. पानीपतच्या तिस-या युध्दात (इ.स.१७६१) त्याने बहादुरी गाजविल्याने ते सरसेनापती झाल्याची नोंद इतिहासात आढळते. सुरतेची लुट उंटावरुन वाहून नेली जात असताना पळशी मुक्कामी विद्वत्जनांच्या सभेत या लुटीतील काही द्रव्य पळशी गावच्या विकासासाठी वापरण्याचा बेत पक्का करण्यात आला. त्यानुसार पळशी गावाभोवती चौहोबाजूंनी भरभक्कम तटबंदी व गावच्या आग्नेय दिशेस श्री विठ्ठल मंदिर बांधण्याचे ठरले. त्याप्रमाणे कार्यवाही झाली. उत्तर हिंदूस्थानातील कलावंतांना मु÷ाम पाचारण करण्यात येऊन त्यांच्याकडून अप्रतिम अशा दगडी नक्षीकामयुक्त मंदिराची उभारणी करण्यात आली. वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणजे पारनेर तालुक्यातील पळशी येथील वास्तु होत. दगडी नक्षीकामाचं सौंदर्य शब्दांकित करता येणं केवळ अशक्य. वेरुळ अंजिठ्याची कोरीव लेणी ही उणी वाटावीत हे सांगण्यातच कामाचं वैशिष्टच दडलेलं आहे.

# विठ्ठल मंदिर वास्तुची रचना

मंदिराच्या महाद्वारावर गणपती व सरस्वती ही दैवते. महाद्वारावरच्या दोहोबाजूस जय-विजय, मुसलमानी पध्दतीच्या सुरया व नगारखाना आहे. नगारखान्याचे रंगकाम व नक्षीकाम खास मुस्लिम पध्दतीचे आहे.

- **सभामंडप** :- सभामंडपाच्या तीनही बाजूंनी नऊ-नऊ पाय-या जणू नवविधा भक्तीची प्रातिनिधीक स्वरुप होत. उत्तर हिंदूस्थानातील सचेतन स्त्रीत स्थाने आहेत. सभामंडपाला अठरा, नऊ-नऊ फूट उंचीचे दगडी खांब आहेत. जणू साक्षात अठरा पुराणे मंदिराच्या आश्रयाला आली आहेत. मंदिराचे बांधकाम वैशिष्टयपूर्ण आहे. सभामंडपाच्या मध्यभागी दगडी कासव आहे. कासवाच्या पाठीवर उभे राहून कुर्म दृष्टीने विठ्ठल मुर्तीचे दर्शन होते. सभामंडपाच्या वरील भागात दृष्टी टाकल्यास लक्षवेधक अशा सवा मण वजनाच्या काशाच्या घंटीवरुन नजर दूर होतच नाही. सभामंडपाच्या आतील बाजूस श्रीकृष्ण व गौळणींच्या रासक्रिडेच्या दगडी मूर्ती आहेत. श्रीकृष्ण व गौळणींच्या चेह-यावरील उत्कृष्ट भाव हे उत्तर हिंदूस्थानी कलाकारांच्या हस्तकौशल्याची उत्कृष्टशैली आहे. चेह-यावरील बोलके हावभाव वेरुळ अंजिठा येथील मूर्तीच्या चेह-यावरील हावभावाची साक्ष देतात. म्हणजेच वास्तूशास्त्राचा उत्कृष्ट नमुना येथे पाहावयास मिळतो. सभामंडपातील हरणांच्या व वानरांच्या कोरीव मूर्ती तर केवळ चेतनच नव्हे तर प्रत्यक्षात वेगवेगळया कोनातून त्यांच्याकडे पाहिल्यास त्यांच्या च हालचाली होत असल्याचे जाणवते. यामुर्ती कोरताना कलाकारांनी खरोखर त्यामध्ये जीव ओतल्याचे निदर्शनास येते. गाभा-याच्या दरवाजाच्या दोनही बाजूंना रिध्दी-सिध्दी सहित गणपती आणि भैरव यांच्या मुर्ती आहेत. दरवाज्यावर ६४ योगीनी आहेत. उंब-यावर दोन किर्तीमुखे आहेत. गाभा-यामध्ये श्री पांडुरंगाची शाळीग्राम शिलेची कोरीव मुर्ती आहे. मुर्तीच्या दोन्ही बाजुंना राही-रुक्मीणीच्या संगमरवरी मुर्ती आहेत.

पांडुरंगाच्या मुर्तीच्या प्रभावळीवर मच्छ-कच्छादी दशावतार कोरलेले आहेत. डोक्यावर शिवलिंग आहे. पायाजवळ सवत्स धेनु आणि गोपाळ आहेत. मुर्तीच्या सिंहासनावर नारद, तुंबरू, गंधर्व, यक्ष, किन्नर, आदींच्या कोरीव मुर्ती आहेत. मंदिरांच्या शिखरावर अत्यंतिक नाजूक व कोरीव कलाकुसरीची कोरीव कामे आहेत. त्यावरुन नजर दुर जात नाही. ते कोरीव काम स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ठ नमुना आहे. मंदिराच्या आवारातील पाण्याचा हौद पाण्याची एक ठरावीक पातळी टिकवून आहे. कितीही पाणी वापरले तरी पाण्याची पातळी टिकून असते. हा हौद म्हणजे निसर्गाची एक किमया आहेत. इ. स. १९७२च्या दुष्काळातही सगळीकडे पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना या हौदातील पाण्याची पातळी स्थिर होती. प्रतिपंढरपुर असलेल्या पळशीचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्व हा महत्वाचा ठेवा आहे. पेशव्यांच्या कालखंडातील पळशीचे नावलौकीक, तेथील दिवाणपद, त्या घराण्याचे वंशज, पळशीचे ऐतिहासिक दृष्टीकोणातून महत्व पाहिले तर ऐतिहासिक वारसा पळशी गावाला लाभलेला आहे. ऐतिहासिक दृष्टीकोनातून हे संस्कृतीचे आणि उपेक्षितांचे संदर्भ महत्वाचे आहेत.

पळशी गावचा स्थानिक इतिहास अत्यंत महत्वाचा ठेवा आहे. पळशीतील मंदिरे, तटबंदी, दगडी मुर्ती, कलाकारांची कारागीरी हा उत्कृष्ठ ठेवा आहे. अप्रतिम वास्तुशिल्प येथे पाहावयास मिळते.

इ. स. १७२० ते इ. स. १७६१ या कालखंडात पळशीचे महत्व, संदर्भ अत्यंत महत्वाचे आहेत. इंदुरच्या होळकर घराण्याच्या कालखंडामध्ये पळशी नावारुपास आली.

प्रकरण ३ रे

# होळकरांबरोबर पळशीकर घराण्याचा उदय

## पानीपतावर पराक्रम - (इ.स. १७६१)

## पळशीकर घराण्यातील कागदपत्रांत त्रिंबकजी डेंगळ्यांच्या कर्तबगारीचा गौरव

मल्हारराव होळकरांचा भाग्योदय होईल, हे भाकीत सांगणारे रामजी यादव यांनी होळकरांचे दिवाणपद मिळविले आणि नगरच्या पळशीकर घराण्याचा उदय तेव्हापासून झाला. इतिहासात अज्ञात राहिलेल्या या कालखंडावर प्रकाश टाकला गेला नव्हता. त्यामुळे ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेल्या पळशीची माहिती पाहणे महत्वाचे आहे. होळकरांबरोबर पळशीकर घराण्याचा खऱ्या अर्थाने उदय घडून आला.

## सात पिढ्या राजवैभव नांदेल

पळशीकर घराण्याचे मुळ पुरुष रामजी यादव कांबळे राहणार पळशी, (जिल्हा. अहमदनगर) हे मोठे तपस्वी व देवीभक्त होते. सप्तशृंगी गडावर देवीचे अनुष्ठान करीत असता देवीने प्रसन्न होऊन तुझ्या घरात सात पिढ्या राजवैभव नांदेल, असा आशीर्वाद व प्रसाद म्हणून एक भाकरीचा तुकडा दिला. तो भाकरीचा तुकडा त्या घराण्यात गेल्या सात पिढ्यांपर्यंत सोन्याच्या पेटीत ठेवला होता. नंतर तो आपोआप नाहिसा झाला. आताचे विद्यमान वारस श्री. रामराव कृष्णराव पळशीकर हे आठवे पुरुष असून सुविद्य, सुस्वभावी, प्रेमळ व सर्वांस मदत करणारे आहेत. पुर्वजांचा देवीभक्तीचाही वारसा त्यांच्या वैभवाबरोबरच चालवीत आहेत. त्यांचेच सौजन्याने घराण्याचे बहुमोल कागदपत्र नगर जिल्हा इतिहास संशोधन मंडळास उपलब्ध झाले आहेत.

## पळशीकरांना दिवाणपद बहाल

एकदा सप्तशृंगीचे मल्हारराव होळकर मेंढया चारीत असता, थकून झाडाखाली झोपले होते. त्यांच्या तोंडावर उन्हाचा कवडसा पडला होता. शेजारचे बोळातून एक मोठा नाग येऊन त्याने मल्हाररावांच्या तोंडावर ऊन लागू नये म्हणून फणा उभारुन बसला होता. मल्हाररावांची आई मुलास भाकरी घेऊन रानात आली व हे दृश्य पाहून घाबरुन ओरडू लागली. जवळच श्री रामजी यादव तपश्चर्या करीत होते. त्यांनी ते पाहून सांगितले की, "हा मुलगा राजा होईल" हे सांगणे मल्हाररावांस व त्याच्या आईस त्यावेळेस खोटे वाटले असेल पण मल्हारराव म्हणाले, "मी जर खरच राजा झालो तर तुम्हांस माझी दिवाणगिरी देईन". पुढे इतिहास सांगतो की, मल्हारराव होळकर माळव्याचे राजे झाले व वचनाप्रमाणे रामजी यादव पळशीकर यांना त्यांनी दिवाणपद दिले. पुढे पेशव्यांचे तर्फे होळकरांचे दिवाणपद -गंगोबातात्या चंद्रचुड यांना दिले गेले. त्यांनी व पळशीकर यांनी दोघांनी मिळून इंदोर दरबारचा कारभार पाहावा अशी तडजोड मल्हाररावांनी केली. तेव्हांपासून या घराण्यातील पुरुषास दिवाणसाहेब असे आजपर्यंत म्हणतात.

## विठ्ठल मंदिर: शिल्पाचा उत्कृष्ट नमुना

पानीपतच्या (इ.स.१७६१) स्वारीत गंगोबातात्या मारले गेले. आनंदरावांच्या दोन्ही पत्नी बातमी समजल्यावर सती गेल्या. त्यांची दोन वृदांवने पळशी घाट येथे आहेत. पळशी कोट व पळशी येथील शिल्पे, सरदार साहेबांचे वाडे, वाडयांचे नक्षीकाम देवीचे भिंतीवरील चित्रे वगैरे पहाण्यासारखे असून तेथील विठ्ठल मंदिर तर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना अत्यंत सुस्थितीत आहे. आतापर्यंत पळशी गाव पारनेर तालुक्यात आजूबाजूस असल्याने या गोष्टी इतिहास संशोधकाच्या फारशा नजरेस आल्या नाहीत. या घराण्याचे सुमारे दोन हजार कागदपत्र उपलब्ध आहेत.

इ. स. १८७३ मधील एक पत्र त्रिबंकजी डेंगळे यांच्या विषयी महत्वाचे आहे. श्री. ना. स. इनामदार यांचे प्रसिध्द 'झेप' कादंबरीत त्रिबंकजी डेंगळे यांच्याविषयी तो खुषमस्क-या गुंड, स्वार्थी असून, दुस-या बाजीरावाची मर्जी गैरमार्गाने धरुन सत्ता गाजवीत होता. हा इंग्रजांनी त्याच्या स्वार्थाकरीता पसरविलेला गैरसमज दूर करुन त्रिबंकजी सद्‌वर्तनी देशाभिमानी,

स्वामीभक्त, उत्कृष्ट राज्यशासक होता हे दाखविले आहे. त्यास हे पत्र अस्सल पुरावा देत आहे.

या पत्रावरुन त्रिबंकजी राज्यात फिरत असता सामान्य गावकरी त्याला भेटून आपल्या तक्रारी सांगत असत व तोही तत्परतेने व खंबीरपणाने त्यांची दाद घेत होता असे दिसते. वास्तविक हा काळ म्हणजे इ. स. १८०२ चे पुढील अत्यंत धामधुमीचा होता. हे पळशीकर दप्तरातील नगरला झालेल्या आबाजी लक्ष्मण माने, भिल्लांचा दंगा या पत्रांवरुन सिध्द होते. काही पत्रे नगरच्या संघशक्ती पत्रात छापली आहेत. इंग्रजांची नजर आता श्रीमंतांचे राज्यावरही आहे असेही पळशीकर लिहीतात. अशा कठीण काळातही त्रिबंकजी प्रजापालनाचे कर्तव्य ठामपणाने करू पाहतो, हा त्याचा स्वभाव विशेष उठून दिसतो.

## पळशीकर दप्तरातील त्रिबंकजी डेंगळयाबद्दलचे असलेले पत्र

चिरंजीव रा. भाऊ पळशीकर यास पुरुषोत्तम देवराव आशीर्वाद उपरी येथील क्षेम.

तुम्हांपासून निघालो ते दिवसापासून तुम्हांकडील वर्तमान काहीच समजत नाही. तरी ऐसे नसावे रा. गोविंदराव बाबा पळशीहून येथे रा. खंडोपंत वकील याजकडे आले आहेत. त्यांची पत्नी व आमची भेट झाली. त्यास गोविंदराव बाबा त्रिबंकजी डेंगळे याजकडील गेले होते. त्यास डेंगळे मजकुरांनी ताकीद भिल्लविषयी केली तरी बाबानी पूर्वीच डेंगळे यास करार केली की, पंधरा रोजानी दत्त्या भील धरून देतो त्या करारास पाच रोज अधिक झाले. यास्तव डेंगळे यांनी ताकीद केली. त्रिबंकजी डेंगळे यास सांगितले की, पळशीस दत्त्या भील आहे त्यास तेथे थारा आहे. त्यात त्रिबंकजी डेंगळे यांचे मनात की, पळशी व ब्याह्या मांडवे भारत प्रमाण आहे. येथे गोविंदराव बाबा आज चार रोज माझी व त्यांची भेट नाही. तरी सरकार गेल्यास मग निघणे कठीण त्यात आमची मातुश्री विचार आहे की, कार्य करावे ते सत्वर करावे तरी येथून तुम्हांकडे हा कागद पाठविला आहे. त्यास या पत्राचे मजकूर सर्व करून सत्वर याचे जवाब पाठविणे. मा. त्रिबंकजी डेंगळे यांचे घरी काल गेलो होतो. त्यास डेंगळे मजकूर, पंतमामा या उभयतांची सांगणे ठाणे बसवायची झाली. तरी सत्वर याचे बेत

करणे व तुम्हीही हा बीज करुन कोपरगावचे मुकामास लष्करात येथे व भिलाविशी तुम्हास बंदोबस्त करणे प्राप्तच आहे. पळशीच्या डेंगळे यांनी मजपाशी भिलाविशी बहुतच सांगितले त्यावर सत्वर बंधन करणे.

असे पत्र त्रिबंकजी डेंगळयाच्या कामगिरीची ऐतिहासिक साक्ष देतात. त्रिबंकजी डेंगळेची साहसी व धाडसी वृत्ती, सर्वांचे प्रश्न समजावून घेण्याचे कसब हे सत्य आहे. त्रिबंकजी डेंगळे पळपुटे नाहीत तर कुशल कार्य करणारे ते एक सरदार होते.

पळशीकरांच्या कालखंडातील हे अत्यंत महत्वाचे पत्र आहे. या पत्रामुळे त्रिबंकजी डेंगळयाचे पूर्ववृत्त, कार्य इ. चा परामर्ष येतो.

प्रकरण ४ थे

# पळशी गावातील वाडे व मंदीरे

नगर जिल्ह्यातील इतिहासाचा व कलेचा समृध्द वारसा जपणारे गाव म्हणजे पळशी पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गावापासून उत्तरेला २० किलोमीटर अंतरावर असणारे गाव, गावच्या भक्कम तटबंदीने व नैसर्गिक सौंदर्याने शोभीवंत बनवले आहे.

खळखळणारा ओढा व खुलणारा निसर्ग यामुळे पळशीचे आगळे-वेगळे रुप ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. पळशी गाव तसे इतिहास प्रसिध्द गाव आहे. तसा ऐतिहासिक वारसा पळशीला लाभला आहे. पळशी हे गाव जहागिरीचे गाव. बहामनी राज्याच्या जहागिरीची साक्ष मिळते. इ. स. १५१० पासूनचा इतिहास या गावात आपल्याला पाहावयास मिळतो. इ. स. १७०९ ते १७१९ या कालखंडातील तटबंदी येथे चांगल्या अवस्थेत आहेत. तिचा भक्कमपणा आजही जाणवतो. पळशी गाव या तटबंदीच्या आत विखुरलेला आहे. जूने पळशी गाव आज नाही. जुन्या पळशीतल्या पडक्या घराच्या भिंती आढळतात. जुने पळशी गावातील बरीच माणसं स्वातंत्र्यपूर्व काळातील पटकी(कॉलरा) साथीने दगावली असल्याची माहिती मिळते. त्यामुळे पळशी गावची लोकसंख्या घटली.

गावाच्या मध्यभागी संपूर्ण दगडी महादेवाचे मंदीर दिसते. या महादेवाच्या मंदीरातील घंटा खणखण वाजते व तिचा आवाज दूरवर पसरतो. म्हणून त्याला खणखणीचं मंदीर असं जुनी जाणती माणसे म्हणतात. या मंदीरात इतरत्र कुठेही न दिसणारे शिवपंचायतन येथे दिसते. मंदीरातील दगडी नक्षीकाम अप्रतिम असून भूमितीय कोनातील नक्षीकाम, शिल्पकाम व जाळीकाम सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. महादेव मंदीरात शृंगी-भृंगी, शिवगण, नंदी, पार्वती या मूर्ती प्रेक्षणीय आहेत.

महादेवाच्या मंदीराशेजारीच मलवीर मंदीर आहे. हे गावचे ग्रामदैवत आहे. अश्वारुढ मलवीराची मूर्ती ही सुंदर, देखणी व रुबाबदार असून वैभवशाली इतिहासाची साक्ष आहे. पौष महिन्यात पळशी येथे मलवीराची यात्रा भरते. गावात होळकरांचे दिवाण रामराव अप्पा पळशीकर यांचा वाडा आहे. या वाड्यात ५४ खण आहेत. हा वाडा म्हणजे अभियंता मंडळीसाठी अपूर्व अशी कलाकृती आहे. या वाड्यात लाकडावरील कोरीव

काम, शिल्प उत्कृष्ट सौंदर्याचा अजरामर नमुना आहे. लाकडात कोरलेली विविध प्रकारची कलाकुसर नक्षीकाम अप्रतिम कलाकृतीचा अविष्कार आहे. या कलाकृतीतील नमुना म्हणजे लाकडातील सिताफुल हुबेहुब दिसते.

हा संपूर्ण वाडा सागवानी लाकडापासून बनविलेला आहे. शेजारी दोन वाडे असून एक वाडा पेंढारी लोकांनी जाळला असल्याची माहिती येथे मिळते. वाडयातील प्रत्येक खांब तुळई, छताच्या पुढील भाग नक्षीकामाने केला आहे.

वाड्याशेजारीच गजगौरीचे मंदीर आहे. हा वाडा अप्रतिम असून वाड्याच्या वरच्या मजल्यावर खांबावर केळीच्या पानांची नक्षी आहे. दुस-या मजल्यावरील दिवाणखाना व जनानखाना यामधील नक्षीकाम कलाकृती वनस्पतीच्या रंगातील आहेत. गजगौरीच्या मंदीरात पूर्वी भित्तीचित्रे होती. या मंदीराचे सभा मंडपाचे छत पिरॅमिडच्या आकाराचे चौकोनी आहे.

पळशी गावात पांडुरंगाचे मंदीर किलवाडा मंदीरासारखे आहे. दोन एकर जागेवर असलेले हे मंदीर दगडीकाम, भक्कम तटबंदीसाठी प्रसिध्द असून या मंदीरात १८ खांब कोरीव असून १८ खांबावर १८ पुराणे असून तिनही बाजूने नऊ पाय-या आहेत. राही विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीच्या प्रभावळीवर मच्छ, कासव आदी दशावतार कोरलेले आहे. सिंहासनावर नारद, गंधर्व, किन्नर यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. सभामंडपात गाभा-यात प्रवेश करण्यापूर्वी श्रीकृष्ण व गवळणी यांच्या रासक्रिडा कोरलेल्या आहेत. मंदीराचा कळस हा कमलाकृती आकाराचा आहे. पाठीमागच्या बाजूस कोरीव काम प्रेक्षणीय असून मंदीराच्या तीनही बाजूंना उत्तम शिल्पाकृती पाहावयास मिळते. शिल्पाकृती ही वेगवेगळया प्रकारची आहे.

गावच्या पश्चिमेला ३ एकर असा पेशवेकालीन तलाव असून चार बाजू चौकोनी आहेत. हा तलाव दोन तीन छोट्या टेकडीच्या बाजूला आहे. डोंगरावरचे पाणी अडविण्याची, जिरविण्याची ही १७ व्या शतकातील योजना होती. हे पुराव्यासह आपणास दिसते.

गावात रामेश्वर मंदीर, गणपती मंदीर, रेणुकामाता मंदीर असून रामराव अप्पा पळशीकरांच्या २ पत्नी सखुबाई व पार्वतीबाई या सती गेल्या. म्हणून त्यांची मंदीरे (समाधी स्थळे) मंदीराच्या शेजारी आहेत.

पळशी गावाला दोन वेशी असून उत्तरेकडील वेशीला दिल्ली दरवाजा असे नाव आहे. पेशवे काळात दिल्ली, इंदोर, नागपूर, चांदवड

आदी गावाचा पत्रव्यवहार सापडतो असे अनेक कागदपत्रांवरुन दिसून येते.

पळशी गावाविषयी रामायणातील संदर्भात दंतकथा येथे ऐकावयास मिळते. राम जेव्हा दंडकारण्यात गेले तेव्हा याच मार्गाने गेले असल्याची माहिती मिळते. सौंदर्याची दृष्टी असलेल्या व भक्तीत गोडवा मानणा-या महान कारागीराने पळशी सारखी अजरामर कलाकृती निर्माण केली आहे.

पळशी गाव तटबंदीच्या आत आहे. पळशी हे ४००० लोकवस्तीचं गाव आहे. आज येथे हायस्कुल, प्राथमिक शाळा, बँक, ग्रामपंचायत यांसारख्या सुविधा आहेत. गावात गागरे, जाधव, सुडके, छाजे, गांधी, पोळ आडनावाचे लोक राहतात.

पळशीची अप्रतिम सौंदर्य, कलाकृतीमुळे ‘वास्तूपुरुष’ या मराठी चित्रपटाचे शुटींग येथे झाले. परंतु गावाला पर्यटन अगर तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी गावकरी इच्छुक आहेत. ऐतिहासिक व धार्मिक दृष्टिकोनातून महत्वाचा वारसा जपला जावा ही गावक-याची इच्छा आहे. प्रशासनाचे मात्र याकडे फारसे लक्ष नाही.

कला, इतिहास यांचा समृध्द वारसा पळशी गावाला लाभला आहे, हे जपणे सर्वांचे कर्तव्य आहे. अशाप्रकारे पळशी ऐतिहासिक व धार्मिक त्याचबरोबर सुंदर कलाकृतीचा ठेवा आहे. तो ठेवा जपला पाहिजे, अशी गावक-यांची तीव्र इच्छा आहे.

# सुंदर व कोरीव वास्तू शिल्पांची वस्ती: पळशी

एखादा नवरत्नाचा हार अचानक तुटावा आणि त्यातील एखादे रत्न ओघळून नजरेच्या टप्प्याआड व्हावे. सांदी कोप-यात दडलेल्या त्या रत्नाकडे कुणाचे लक्षच जाऊ नये तशी अवस्था आज पळशी या ऐतिहासिक वास्तूची झाली आहे. दुष्काळी नगर जिल्ह्याच्या अंतर्गत पठारी प्रदेशात पारनेर तालुक्यातील इतके रमणीय, आकर्षक आणि वास्तू शिल्पाने श्रीमंत असे ठिकाण असेल अशी कल्पनाही येत नाही. इथली एकेक मूर्ती, काळया कातळातील कोरीव शिल्पे, लाकडातील कलाकुसर यांची किंमत आजच्या बाजारभावात केली तर कोटयावधी रुपयांचे गणित मांडणारे व्यवहारी मन थकून जाईल.

पारनेर तालुक्याच्या हद्दीत असलेल्या या पळशी गावाला दोनशे वर्षापूर्वी राजवैभव लाभलेले होते. नाशिक-पुणे हमरस्त्याला संगमनेरच्या दक्षिणेस सुमारे १५ किलोमीटर साकुर फाटा मिळतो. साकूर हे तसे इतिहास प्रसिध्द गाव पेशवाईत येथे वैभव नांदत होते. साकुरच्या ओढयाचे पाणी उंटावरून पखाली भरुन इंदौरला स्थायिक झालेल्या संस्थानिकांसाठी पाठविले जाई. इतके ते गोड पाणी होते आणि या गावाला साखरऊर असे नाव पडले. साकुरची मुळी नदी ओलांडून पुढे गेले तर सगळीकडे उघडे माळरान, लहान-मोठया उजाड टेकडया आणि त्यातून कोरडी पडलेली ओढयाची पात्रे लागतात. एके काळी वैभवाचा वरदहस्त या परिसराला लाभला होता.

भव्य दगडी तटबंदी आणि त्या कालखंडातील सुरेख वेस तेथे आहे. चिरेबंद बुरुज आणि भक्कम लाकडी दरवाजातून अंबारीसह हत्ती सहज आत जाऊ शकेल इतकी तीची भव्यता आहे. वेशीच्या चारही बाजूंना भक्कम दगडी भिंत गावकुस वेढून उभी आहे. वेशीच्या दोन्ही बाजूंना शिलालेख आहे. तटबंदीला तसे पाच दरवाजे असले तरी त्यापैकी तीन दरवाजे पूर्णपणे बंद आहेत. उत्तरेकडचा दिल्ली दरवाजा बंद केला तर गावचे संरक्षण गेली कित्येक वर्षे होत आहे.

गावात गेल्यावर दगड मातीने बांधलेली काही घरे आहेत. मध्यभागी शिवशंकराचे मंदिर आहे. हे चिरेबंद दगडी हेमाडपंथी मंदिर म्हणजे तत्कालीन बांधकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. इथले दगडी कठडे, तसेच आतील संगमरवरी शिव-शाळुंका, ऐटबाज नंदी हे सारेच प्रेक्षणीय आहे.

## शिल्पांकित राजप्रसाद

मंदिर बघून बाहेर आल्यावर पूर्वेला थोड्याश्या अंतरावर दगड-विटांचे दोन-तीन मजली भक्कम बांधकाम दिसते. हे गावकुसाचे मर्मस्थान आणि एकेकाळचे सरदारांचे राजविलासी निवासस्थान. त्याच्या भक्कम बांधणी वरुनच वाड्याच्या भव्यतेची कल्पना येते. दरवाज्याच्या आत पाऊल टाकताच रखवालदारांच्या जुन्या बांधणीच्या देव-या लागतात. त्यांना वळसा घालून डावीकडे जाताच मन आश्चर्याने थक्क होते आणि तेथे पाय थबकतात.

चहू बाजूंना उभे असणारे लाकडी खांब आपल्या अंगावर अप्रतिम नक्षीचे काष्ठशिल्प घेऊन उभे राहिलेले दिसतात. इथला प्रत्येक खांब स्वतंत्र शैलीचा आहे. मत्स्य, वसुदेव-देवकी, अननसाची उमलती पान, देवाच्या मूर्ती, दिमाखात मिरवणारे गजराज आणि सगळयात सरस ठरावी अशी सलग लाकडात कोरलेली व सहजगत्या गद-गद हलविता येण्याजोगी फुलांची परडी खरोखरच कुतूहलजनक आहे. वाड्याचा इतर भाग मात्र मोडीत निघालेल्या जुनाट भांड्याच्या ढिगा-याप्रमाणे वाटतो. माणसाने उभे केलेले वैभव त्यास जपता आले नाही तर त्याची किती विपन्नावस्था होते याचे एक बोलके उदाहरण म्हणजे हा भाग होय. माडीवर जाण्याचे अरुंद जिने काही प्रमाणात शाबुत आहे.

दुस-या मजल्यावरचा श्रीमंतांचा दिवाणखाना भव्य आणि कोरीव असला तरी आज त्याची जपणूक होत नाही. कोनाकोप-यात छताशी असलेल्या मीनाकामाकडे लक्ष गेल्याशिवाय राहात नाही. वाड्याच्या बाहेर अनेक वाड्यांचे जूने अवशेष उभे आहेत.

## आजूबाजूची देखणी मंदीरं

गावकुस ओलांडून दक्षिणेकडे जाताना वाटेत हेमांडपंथी मंदिराचा आणखी एक उत्कृष्ट नमुना लक्ष वेधून घेतो. मंदिर सामान्य बांधणीचे असले तरी आतील गजान्त लक्ष्मीची मूर्ती आणि वरील सलग दगडी छत

पाहण्यालायक आहे. गावाची दगडी भिंत ओलांडून पलीकडे चारपाचशे फूट अंतर गेल्यावर आणखी एक भव्य ठिकाण आढळते. उजाड खडकाळ माळरानावर उमलले ते जणू काळया कातळाचे भव्य फूलच. दुरूनच या मंदिराची भव्यता लक्षात येते. आकर्षक प्रवेशद्धार, त्यावरील कोरीव मूर्ती आणि नगारखान्याची प्रेक्षणीय बैठक पाहून आत गेल्यावर आढळतो तो मंदिराचा विशाल सभामंडप येथे भव्य व सुंदर कलेने नटलेले विठ्ठल मंदीर आहे.

या मूर्तीचे एकेकाळचे सुवणालंकार लपवून ठेवण्याचा दगडातील कोरीव ड्रॉवर केवळ अप्रतिम आहे. मंदिरावरील कमलाकृती कळस सहसा कुठेही न आढळणारा आहे. मंदिराच्या चारही बाजूंनी दगडी तटबंदी असून प्रवेशद्धारापाशी स्थानिक जलरेषा थोपवून तयार केलेली पुष्करणी मोठी आकर्षक आहे. या सुरेख जलकुडांत सध्या पाणगवत उगवलेले आहे.

कोनाडयातील एकेक अप्रतिम शिल्प आता भुईसपाट झाले आहे. काही मूर्ती भंगण्याच्या मार्गावर आहेत. पुष्करणीच्या पलीकडे बारमाही ओढा झुळझुळ वाहत असतो. त्याच्या काठावर गणेश मंदीराच्या माथ्यावरील कमलाकृती शिखरे परिसरातील इतर ओसाड भागापासून पटकन उभी राहिल्यासारखी वाटतात. ओढ्याच्या काठाने थोडे पुढे गेल्यावर भक्कम चिरेबंद बांधणीत दोन सुरेख वृदांवने मस्तकी शिवलींग घेऊन उभी आहेत.

पळशी गावातील हे ठिकाण विकसित केले तर येथे सुंदर पर्यटन स्थळ निर्माण होईल. ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टिकोनातून पळशीतील वाड्यांचे आणि मंदीराचे संरक्षण करणे महत्वाचे आहे. तो आपल्या पूर्वजांचा, जनतेचा महत्वाचा ठेवा आहे.

म्हणूनच पळशी हे सुंदर व कोरीव शिल्पकलेचं लेणं स्वत:च्या अंगावर घेऊन दिमाखात उभी आहे. त्या शिल्पकलेचं, वास्तुकलेच जतन शासनाने करावे. यासाठी पळशीकरांच्या भावना बोलक्या आहेत. पळशी गावातील एका कवयित्रीच्या या गावाविषयीच्या भावना तिच्या पुढील कवितेतून प्रकट झाल्या आहेत.

## **'माझा गाव उभारला'**

पेशवाईच्या काळात
माझा उभारला गाव

हालगीच्या नादामंदी
धुंद झाली सारी शिव
माझ्या गावच्या तटाची
आहे रीतच पुराणी
जुने दगड सांगती
इतिहासाची कहाणी
जहागीरीच हे गाव
तटाच्या निवा-याला
विठू माऊली निवास
गावाच्या शेजाराला
मधे खळखळे ओढा
भारी पाण्याचा प्रवाह
माऊलीच्या दर्शनाला
रोज लोटे सारा गाव
काय सांगू आता बात
माझ्या गावच्या जनाची
भक्ती भावासंग चिंता
दोन येळच्या पोटाची
द-याखो-याच्या कुशीत
माझा विसावला गाव
मनामनात रुजला
विठु माऊलीचा भाव

माझ्या गावचा समाज
भोळा भाबडा गाव
मोठया दिलाची माणसं
घेती काळजाचा ठाव
रितीरीवाज जपला
माझ्या गावानं चांगला

धान मातीत पेराया
गाव कष्टात रंगला

माणसाला माणूस
उभ्या गावानं जागला
माणुसकीला जोडीत
माझा गाव उभारला

कवयित्री
गुंफा पाटीलबा कौकाटे
M.A., M. Phil, WCVDWDS.

प्रकरण ६ वे

पळशीकर दप्तरातील दिवाण पळशीकर घराण्याशी संबंधित असलेली महत्वाची पत्रे

**पत्र व त्यातील संदर्भ माहिती**

## महत्वाची पत्रे

| लेखांक | पत्रे |
|---|---|
| १. | इंग्रज मराठ्यांना डोईजड झाले. |
| २. | मराठ्यांचे लष्करास व घोड्यांस उपास पडतात. |
| ३. | श्रीमंताचे राज्य राहणे कठीण दिसते. |
| ४. | भिलांचे मुळे पळशीस रक्षण होत होते. |
| ५. | त्रिंबकेश्वरास अभेसिंगाने पांच लाख रू खंडणी वसविली. |
| ६. | चिमाजीपंत अप्पासाहेब दुसरे बाजीरावचे बंधु यांचे लग्न. |
| ७. | अमृतराव पेशवे व शिंदे बायांवर पुण्यांत शिंद्यांचा हल्ला. |
| ८. | जो येतो तो अबरुसी गाठ घालतो. |
| ९. | सरदारीत जीव नाही सरकार नाशावर आहे. |
| १०. | महादजीच्या राण्यांचे छळाने शिंदे फौजेत दुही. |
| ११. | पुण्यास तुकोजी होळकरासारख्या दौलतीच्या खांबास मरते समई बाजीराव साहेब अगर नाना फडणीस भेटत नाहीत. |
| १२. | स्वराज्याचे सरदार स्वराज्यातील गावे लुटतात. |
| १३. | दुसरे बाजीराव साहेबांचे खुनाचा प्रयत्न. |
| १४. | दौलतराव शिंदे फौजेच्या खर्चाबद्दल गावक-यांवर इसमवार वराती पाठवतात. |
| १५. | महादजीच्या राण्या व दौलतराव शिंदे यांचा तंटा, कैदेतून सोडवून नानास तोडण्यास सांगतात. |
| १६. | एक कोट रुपये नजराणा घेण्याचे ठरवून शिंद्याने नाना फटणीसास कैदेतून आणविले. |
| १७. | सरकार वाड्यात काळे यांचेवर धरणे, शौचास जाऊ देत नाहीत. |

१८. बाजीराव साहेब इंग्रजास न विचारता नानास भेटले या बद्दल रागाने इंग्रजाने सरकारचे बागमळे तोडून लुटले, बाजीराव, शिंदे नाना वगैरेंचा समेट झाला.

१९. १) सात पिढ्यांची वहिवाट डावलून धाकटे घरच्या बाबुराव आंग्रे दौलतराव शिंदे यांचे मामास सरखेली वस्त्रे देतात.

२) करवीरकरांचा कारभारी रत्नाकरपंत राजाज्ञा याचा पराभव धोंडोपंत गोखले करतात.

२०. १) सर्व सरदार ओढीत मंत्र्यापाशी द्रव्य, तो इंग्रजास, थोड सोबत्यास शिंद्यांस देतो.

२) पुजेतील शिंद्यांची मसनदी गादी, बंदूख, शिक्के कटचार, पळवून पहारेकरी महादजीचे बायाकडे नेतात. पुणे दग्ध करु असा दम दौलतराव भरतात.

२१. श्रीमंतांनी स्वहस्ते नानास गंध अक्षता त्याचे व्रताप्रमाणे लावले. शिंदे जेवणास पंक्तीत होते. नानाचे स्त्रियांस पेशव्यांचा दहा हजाराचा अहेर.

२२. बायाशी समेटाचा प्रयत्न. लखबादादा उज्जनीस राणेखानाभाईचा वाडा लूटतो. यजमान काशीराव होळकर बोंगाडे समजत नाही काळ जगभक्षक आला.

२३. १) पुणीयात सर्व सरदार श्रीमंत व कारभारी भिंतीवर चित्रे पहावी. जीव नाही उदार नाहीत चळणवळण नाही.

२) मश्रुलाने इंग्रजास चिठ्ठी देऊन फ्रांसीसाचा हैद्राबादेत नाश केला.

२४. यशवंतराव होळकर भिल जमा करून लढाई मारतो.

२५. वाणी, उदमी, सावकार, रोजगारी, सरंजामी, कारकून, सोयरे, आप्त सर्व नागविले. भरणा सिंद्यांकडे केला.

२६. जीजीबाईची फौज करजगाव व पळशी लूटतात.

२७. राणेखानभाईचा भाचा नुरखान करजगावी पळशीकरांचे जहागीरीचे गावी कारभारी, पाटील, कुलकर्णी यांस कोलदांडे, शंचैल स्नान, मारहाण करून खंडणी घेतो. वाडा दरोबस्त लूटतो.

२८. १) पंतप्रधान व नानांचे श्रेवणी वर्तमान घातलें बंदोबस्त करतो. ऐसे मुखे करून मात्र समाधान करतात परंतु जमेत पाठवून हरामखोराचे पारपत्य होत नाही.

२) स्वत:चे बहाणे गावांचे रक्षण करावे. कोणाचा भरवसा धरू नये.

२९. नाना फडणीसांस ज्वरांश, श्रान वर्ज, भस्म स्नान करतात. पडल्यापडल्या सर्व कारभार त्यांचे विचारे चालतो.

३०. नाना फडणीस यांचे खास जहागीराचा गांव महिंदे, ठाणे माणिकदौंडी ता. पाथर्डी, जि. नगर हा होता.

३१. रात्रीचा छापा येईल तर ? हवायाचा संग्रह कोस अर्धा कोस प्रकाश टाकता येईल येवढा करावा.

३२. १) स्वप्नाचा नमुना.

२) नाना फडणीसास कैद केल्यावर त्यांची लूटालूट केलेले विरोधी गोवींदराव काळे शिवरामपंत थत्ते व बाळाजीपंत शिदोरे यांचे नाना सुटल्यावर बाजीराव पारपत्य करतात.

३३. होळकर दरबारास द्रव्याची तीव्र टंचाई.

३४. फ्रांसीस दुदरनेक याने मिठाईदाणा, चारा ठेऊन घेतला पण रु. शंभर पाठविले होते. ते, मी चाकर आहे असे म्हणून परत केले.

लेखांक १ श्री बुधवार व ९ शके १७०१
२९ मार्च १७८०

राजश्री या विराजित राजमान्ये रा. पांडुरंगपंत अप्पा व खंडेराव स्वामीचें सेवेंसी -

सेवक बाबूराव नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष तुम्हाकडील वर्तमान महीना पंधरा दिवस कळत नव्हते. तो अकस्मात तीर्थस्वरुप रा. रंगोपंत आबा बराबर पत्र पावले. व याज अगोदर जासूद जोडी लष्करांत जावयास आली त्यास महेना दोड महेना जाला तेव्हां पत्र एक पाठविले तेंही पावले. त्यास इकडून डाक मारली गेली होती. वाटा चालत नवत्या. मग एक रोज ठेवून दुसरे दिवशी सोबत लावून ब-हाणपुरचे मार्गे वाटें लावले.

दुसरे सोंद्या होळकराचे लस्कराचे वर्तमान तर सुरतेवरुन कूच निघून अमदाबादेस गेलें मग फिरंगी बाहेर निघाला. पुढे आला. याना शिंदे होळकरांनी गराडा भोवता घातला. मग फिरंग्यांनी मार दिल्ही. सेपन्नास माणुस यांचे त्यांचे पडले. मग आपलालें जागा कायम गेले. फीरंगी काही पाठी जात नाहीं व याच्यानी काही उडी घालवत नाहीं. यांचा मुक्काम सोंदे होळकरांचा जेथें होता तेथे फिरंगी चाटून येतो. मग हे ठिकाण टाकून पळतात. पावागड पावेतो फिरंगी गेला. पावागड घेतला हे पलीकडें गेले पाचशे रुपयाचे देणे लस्करात आले आहे. हे आपले एकदा छापा घालावयास गेले होते त्याच्या चार सारख्या टोल्या करुन उतरले होते. हे एके टोळीवर पडले. लुटून परत केली तो दुसरी टोळी दोन पलटणें येऊन पोहोचली. त्याने मार दिल्ही ते यांचे फार खराबी केली माणूस फार पडले. इतक्यावर काय जाले ते नकळे येणे प्रमाणें वर्तमान आहे.

---

लेखांक २ श्री १७०२ चैत्र व. ॥ ८११८९

रविलावल २१ १७८० एप्रिल २७

ती. सौ. मातुश्रीबाई वडीलाचे सेवेसी

अपत्ये रामरावाने चरणारविंदी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशलता फाल्गुन कृष्ण चतोर्थी परीयंत मुकाम लस्कर नजींक पावागड येथे वडिलाचें आसीर्वादे करुन खुखरुप आसो विशेष वडिलापासोनें आलीया. ता: // दोन तीन पत्रे शेवेस पाठविली परंतु रावाने उत्तर न आलें त्यावरुन चित्त उद्धीग्न आसे तर सदैव पत्र बालकास आवीस्मरण असाले पाहिजे इकडील वर्तमान तर इंग्रज व फत्तेसिंगराव गायकवाड बडोदियात होते. त्यांनी फालगुण शुद्ध १० कुच करुन पांच कोस (फाटले) ल्यावर मुक्कामास आले हे वर्तमान उभयता सरदारास कललीयावर तेच दिवशी रात्रीस स्वार होऊन बुणगे मागे दोन कोस टाकून सडे स्वारीनसी आले ते मुक्काम मजकुरी आहेत तेथून इंग्रज आडीच दोन कोस आहेत त्याचे यांचे अंतर थोडकेच आहे. इत:पर पुढे जावयाची आवध राहिली नाही. इकडील फौजा नीत्य तयार होऊन पुढे जातात, त्याची याची गोळागोळी होत आहे. इंग्रज अडचणीत जाऊन राहिले याजमुळें इकडील लोकांस फावत नाही. मैदानात निघालीयावर गाठ घालून लढाई होईल ऐसा प्रसंग आहे. नित्य रात्री घोडीयावर जीन ठेवून तयार होऊन उभे राहावे लागते त्याजकडे दारुचे बल भारी याजमुळे उपाय नाही. डाव घाव पाहून ---

लस्करात महागाई मोठी त्यांत पैका नाहीं लोकास उपवास जातात येंदा उभ्या प्रांती प्रर्ज्येन्य नाहीं. येणे करुन पाणी याचे व गवताचे दुर्भिक्ष जाले धारण रुपयेची तीन सेर चार सेर साहा सेर जाली आता चार पाच रोज जाहाले आठा सेराची जालीं. माणसास अन्न नाही मग तेथें घोडीयास दाणा कोण देतो घोडीयात जीव राहिला नाही फारच विपत्ती लस्कराची ते पत्री कोठवर लिहावी त्यात आपला कारभार सर्व दृष्टीने बराच आहे. तो वडीलांस विदीतच आहे. खर्चावाचून बहूतच हैराणगत आहे. कोठे कर्ज देखील मिलत नाहीं येंसी अवस्था येऊन प्राप्त जाली बरे सर्व चिंता श्रीस आहे वडीलाचे पुण्य समर्थ त्या पक्षी कालची करीत नाहीं पत्र जलदीनें लिहिले आहे. रागास न यावे सेवेंशी श्रृत होय ही विज्ञापना.

तीर्थरुप मातुश्री आई व काकुबाई वडीलांचे सेवेसी सा. नमस्कार विज्ञापना लिहिली परिसोन लोभाची वृद्धी करावी हे विज्ञप्ती चिरंजीव राजश्री अत्या व विठोबाकाका यास आसिर्वाद इंदुरी बहुत सावधपणे असत जाणे तुम्ही तर सावध आहा परंतु सुचतार्थ लिहीले आहे आसीर्वाद राजेश्री भवानीपंत बाबा व भिकाजीपंत स्वामीचे सेवेसी सा. नमस्कार सर्वत्र भिक्षुक मंडळी व गृहस्थ मंडळीस नमस्कार सांगणे सो. मातुश्रीबाई आई व काकुबाईस यास माधवराव

रंगनाथ सा. नमस्कार विज्ञापना परसीन लोभ करावा. वडिलांचे सेवेसी अमृतराव नानाजी व आप्पाजीं जाखदेव साष्टांग नमस्कार विनंती लिखितार्थ परिसीन लोभ की जे आम्ही बुणग्यांत सुखरुप असो मकाजी सोडवे व जीवाजी थोरात वगैरे सर्व मंडळीचा दंडवत लोभ करावा.

---

लेखांक ३ श्री नकल १७०४ कार्तीक व//१ बुधवार
११९२ छ १४ जिल्हेजस १७८२ नोव्हेंबर २०

राजश्री हरी गणेश गोसावी यासी--

अखंडीत लक्षुमी आलंकृत राजमान्य श्र /// आहील्याबाई होळकर दंडवत सुमा ईसने तीसेन मया व आलफ मौजे भटगाव पाट मजकुर हा गाव राजश्री रामराव आपाजी याजकडे आहे तेथे सुभे पटीचे ऐवजाचीं वरात वरुन गावास मनस्वीपणे उपसर्ग देता म्हणोन वीदीत जाले ऐसी यासी मशारनील्हेकडील गावास मनस्वी उपद्रव द्यावा हे ठीक नाहीं सुभेपटी ------- सालीना वीस रुपये येणे त्यास चीरंजीव राजश्री तुकबा देसी आसता चौदा सालाचे दोनसे ऐसी रुपयाची बरात केली होतीं. त्यांपैकी काही सुट देऊन बाकी ऐवज घेऊन फडशा केला आलीकडे नव वर्षांचे एकसे ऐसी रुपये सर्व प्रमाणे होतो तीतके मात्र घ्यावें ते न करता मोघम वरात केली हे ठीक नाही यासाठी पत्र सादर केलें असे तरी तुम्ही मौजे मजकुरी गैरवाजवीतील प्रायें उपसर्ग न देता सालाबाद सुभेपटीचा ऐवज वीस रुपये प्रमाणे नव सालाचे एकसे ऐसी सर्वप्रमाणे जाले. त्यांपैकी त्याजकडून वसुल पावला असाल तो मजरा देऊन बाकीचे ऐवजाचा नीकाल करुन घेऊन जाजती कोणेविशी तोसीस न देणे जाणीजे छ १४ जील्हेज बहुत काय लिहिणे.

---

लेखांक ४ श्री मंगळवार कृ.//१२ माघ १७०९
१७८८ मार्च ४

राजश्रीया वीराजीत राजमान्य राजश्री आपाजीस्वामी सेवेसी.

सेवक अंबाजी नागनाथ कृतानेक नमस्कार वीनंती येथील क्षेम माघ कृ//११ भोमवासर जाणुन स्वकीय कुशल लेखन करीत असीले पाहिजे वीशेष आपण

राजश्री एकोपंतास मागणे पत्र पाठवीले उत्तम समये पावून परम समाधान जाहाले लिहीला भावार्थ कलला मोगलाकडील वर्तमान तरी त्याच मोकामी आहे. तह प्रारंभ केला आहे चालीस पनास लाख पावेतो सरंजाम देतो ऐसे बोलतो हे साठी पावेतो मागतात यात काये करार होऊन सरंजामात कोणता मुलुक समस्तात वाटुन देते पाहावे हींदुस्तानाकडील वर्तमान तहकीक येत नाही सला झाल्यांवर श्रीमंत भाऊ गोतमीतीरास येणार हे इकडून जाणार तेथे तुला करावीसी योजना आहे घडेल तो प्रकार मागाहुन लीहीला जाईल रुपये तीनसे ३००/-पावले वरकड लीहनेसा मजकुर नाहीं बहुत काय लीहणे आमचे जाणेचा मजकुर मशारनीले बंद जाबानी सांग लीहुन पाठवीने मध्यस्ताचा मजकुर कललाच आहे पुर्ता शोध करुन संपत्ती जमा करुन घेऊन जाऊ नाही तरी जाणे घडणार नाही. कृपा करावी ही विनंती.

---

लेखांक ५ श्री

पाटणची लढाई इस्माईल बेगशी

जून १७९० चे सुमारास झाली.

वडीलांचे शेवेसी आपत्य रामानें चरणी मस्तक ठेवून

सा नमस्कार वीज्ञापना

पाटणच्या लढाईची गत्य झाली येकयेका स्वारामागे येकयेक गोळा लाविला मुजाफरखानाच्या लोकाच्या गोष्टी ऐकत होती परंतु पलटनांनी देश्याधडी करून दोल्हे दाही आखी तोफा सोडल्या तोफखान्यापुढे कोणाची दाळ गळल असे नाही श्रीमंताचे राज्य राहणे कठीन दिसते आपण येण्याचे करावे सेवेसी श्रृत होये वीज्ञप्ती.

---

लेखांक ६ श्री

वडिलांचे सेवेसी-अपत्य चरणी मस्तक ठेऊन

सा.नमस्कार वि.

येथील कुशल तागायत आषाढ शु.//१४मुकाम उज्जैन. सर्व मंडळी आनंदरूप असो विशेष.

वडिली पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर ध्यानास आला. शिंद्यांकडील स्वार वरातीचे तूर्त गेले. हे फार चांगले झाले. देशीही कासीद पाठविलाच आहे. तेथूनही आबाजीचे पत्र काय येते तेही ध्यानास येईल. तूर्त फौज सुजालपुरानजीक ठिकाणीवर मु.राजगड पाटणची वगैरे मामलत लुटली. ती ऐवज घेऊन पुढे कोटे प्रांती जाणार ऐसी बातमी आहे. धारेकडे जाणार होते, परंतु तेथे गुजरात प्रांतातून श्रीमंत पवार आले. त्यांचे समागमे फौज आहे. राजश्री रंगराव अपांचे याचे चित्त शुध्द नाही. सबब तेही सर्व मंडळी सुध्दा निघून इंदुरी गेले. पवार बदनावरेस येऊन किल्लेदार कैद करून घोडी पागा दरोबस्त हस्तगत केल्या हे वर्तमान येताच हे कुच करून गेले. अद्याप पवार धारेस आले नाहीत. बक्षीसुध्दा सर्व मंडळी गेली. पुढे काय होते ते खरे. खेतसी कडील बाकीचे रुपये देणे. त्याजकडील गुमास्ता येऊन बसला.नित्य खटखट त्यास आपल्यास येथील वर्तमान लिहिलेच होते; न्याहलचंद याजला तेथे पाठवावयाचा बेत केला आहे, तुमचे शिपाई आलेस त्यांची आज भेट घेऊन उत्तर घेऊ. त्याजला दोनचार दिवस गुंता आहे, त्यांचे घरी यजमान इंदोरचे सगेसाई आलेत याचा मात्र गुंता आहे. वरकड मजकूर बोलली आहे. त्यास तो आला म्हणजे आपले काम करील यात गुंता नाही. त्याजला बोलावून आणून नंतर शिपाई त्याचे सल्लयाने माघारे पाठवून आज दोन प्रहरावर शिपाई विदा करू तो रात्री बोलला जे मी व // त्रितियेस जाईन ऐसे खचित मजकूर आहे. कळावे हे विज्ञापना.

---

लेखांक ७ श्री १७१२ श्रावण गुरुवार व //८
१७९० ऑगस्ट २६

तीर्थरूप राजश्री आबासाहेब वडिलांचे सेवेसी-

अपत्ये बापूने चरणी मस्तक ठेवून सा. नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता. श्रावण व//२गुरुवार पावेतो वडिलांचे आशीर्वादे करून यथास्थित असो विशेष

इकडील वर्तमान आज येथून गावातून भील दरोबस्त निघून बाहेर मुला नदीचे काठी गेले. पन्नास माणूस सिंदी वगैरे लोक गावात ठेवून गेले आहेत. रा. कासीनाथ हरी सुभेदार पारनेरकर यांची भीलाशी खटखट लागली आहे. सुभेदाराने आपली खडकवाडी लुटून नेली आणि गावाचे वाणी उदमी, कान्हूर, जामगाव खांदेसास जाऊन सवंग महाग दाणा खावयासी आणीत असता सुभेदाराने दोन तीन वेळा लुटून नेले. भिलाचे तर काहीच होत नाही. परंतु गावास रयेतीस मात्र उपद्रव करून गांव खेडी लुटीतात. पळशीचे नांवे बहुत म्हणतात कीं भिलाचे मिलाफी गांव आहे. गांव लुटु जाळू असे म्हणतात चार गावांत घरे कुणबी पाटील वगैरे आहेत ते या उपद्रवामुळे तजावजा होणार येक वेळा येथन वस्ती गेलीयास पुढे गांवचे व सरकारवाडच्याचे लाकूड राहात नाही आणि गांव लुटला जाता आधीच सेर धारनेमुळे वस्ती बुडाली राहिली साहीली तिजला घोर प्राप्त जाला सुभा यास पत्र गावाविषयी वडिली लौकर पाठविणे म्हणजे बचाव होईल भील गेले  तेव्हा ते गावात येतील यांत गुंता नाही दुसरे विंचूरकरही येणार त्याजकडीलही बंदोबस्त जाला पाहीजे नाही तर सर्वांस आज्ञा द्यावी म्हणजे चहुकडे चार जातील. स्वारीवाले गरीबाचे काल आहेत आजपर्यंत भीलामुळें कोण्ही आले नाही हली ठाणे खाली पडले आता भलताच येऊन सिरेल आसे आहे याकरीता आब्रूदार माणसापासून वडीलास वर्तमान कळावे म्हणून पत्र पाठवित आहे. येँ विषयीचा बंदोबस्त जाला पाहीजे इकडे मृगापासुन आज परियेंत पाऊस नेहमी नाही पुढे गांव वस्तीस राहील भरोसा नाही. तशात हे उपद्रव या मुळे गाव उजाड पडतो या करीता लवकर गावाचा बंदोबस्त करावा सुभ्याकडील गावास भये फार आहे येथे भीलाची माणसे राहीली आहेत. तेही रात बीरात निघून जातील. पत्राचे उत्तर लौकर आले पाहीजे.

सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

---

लेखांक ८ श्री १७१६ वैशाख शु. //१४

१७९४ मे १३ मंगळवार

स्वामीचे शेवेसी उभयेता शेवकांचा कृतानेक

शीर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना

येथील वर्तमान ता. छ १३ सबाल मंदवार प्रात:काळ स्वामीच्या कृपेकरून सेवकाचा वर्तमान येथास्थित आहे. विशेष येथील प्रसंगीक वर्तमान

सर्व राजेश्री रामभाऊ विनंती करील येजमान याणी औरंगाबाद तीसास नागविली वैजापूर प्रथम दिली, मागती एक मीरखान मागाहुन आला. त्याणे सर्व लुटून दग्ध केले. अंदरसुल येथे लस्कर मुककामास येऊन चांदवडास खासा स्वारी गेली त्याचें बीसंग याणे किल्ला धोडप घेऊन ठाणे कायम केले. पुढें जनस्थानास गेला येजमान लस्करसुध्दा धोडपेस गेले खासा कील्यावर जाऊन बाली किल्ला वगैरे पाहून खाली आले. लस्कर बुनगे येंकुण पंचवीस हजार स्वार नाशकास गेले रावसाहेब यांची भेट जाली. याजला सांगीतले नाशीक दोन वेळा खंडणी जाली. अभेसींग याणे बारा हजार रुपये घेतले. तुम्हाकडून उपद्रव नसावा. अभेसींग श्रीत्र्यंबकास पुढें गेला. त्याणे पांच लाख रुपये खंडणी लाविली, गावात सिरला ब्राह्मण उलगडले. कील्लेदार याणे आरब सींदी गोल्या मारल्या फौज माघारा प्रयाग तीर्थावर मुक्कामास आले. येजमान स्वारी गेली यानी सर्वत्र परामर्ष देवब्राह्मण सरकारवाडा भातखले येकंदर उलगडले पांच लाख रुपये ब्राह्मणासी द्या म्हणतात किल्यावर झाडा देणें मोर्चे बसवीले. रंगराव त्रिंबक मालेगावकर एकंदर लुटला आणीख लोक तेंथे बहुत प्राण घेऊन डोंगरात गेले. पुढे काय घडल कळत नाहीं. छ/. ५ सुहुर शुक्रवारी सींदेगावची टोळी पाठवली बोदली येथें मु. // भोसले मलकापुरी उभेयतांचे अंतर पंधरा कोस गंगातीरी येऊन येजमानास भेटावे बेत ऐसा आहे. श्रीमंताची मर्जी खपा याजला लिहीतात. आपली मर्जी ते करीतो. (फाटले) येतो कुंजीर विनंती लिहितात त्याप्रमाणे योग घडल पुढें काय प्रत्यय होणार हे कळत नाही. जलचर येजमानाला भीतात पुढें जाण्याचा विचार पडला. त्रीवर्ग एक न जाले तरी गाठ घाला. सरकार फौज चालीस अथवा पंचवीस तरी असावी सरदार सर्व आहेत ते बेदील तोंडे वासती सरंजाम कैसा कोठे याचा खर्च ठेवीत नाहीत. कारभारी सदासीव माणकेस्वर मुखत्यार लेखक कृष्णाजी भवानी याप्रमाणें आहे. घावसे नवसे पुढे जगत नाही स्वामीस कळावें हें विज्ञापना.

श्रीमंत ती. मातुश्री ताई व राजश्री भाऊसाहेब व छोटेसाहेब

साष्टांग नमस्कार

श्री बाबाजी गुरूमोर्तीस सा नमस्कार वेडा भगवंत रावजीचा पुत्र वैजापुरात येऊन काल झाला वाईट जाले.

लेखांक ९ श्री १७१६ आषाढ बुधवार व //१२

१७९४ जुलै बुधवार २३

सहस्त्रायु चिरंजीव राजश्री भाऊ यांसी प्रीय रामराव आपाजी कृतानेक आसीर्वाद उपरी येथील कुशल जेष्ट वदय जाणोण स्वकीय ली /// वीशेष तुम्ही राजश्री भवानीपंताची रवानगी केली ते येऊन सुखरुप पावले. पालखी सरंजाम सुधा पाठविली उंट चार ४ पाठवीले ते पावले. सरंजाम बाजरी केली ८३// सीवये दो दीवसांची चंदीची पावली मठ केली ८३//. व येक दीवसाची चंदीही पावली दाल चण्याची केली ८१ उडदाची दाल ८// हळद वजनी ८१० हींग ८८१ जीरे ८८४ सदरहुप्रमाणे पावले पडदाल्याच्या वहया ४ पायल्या ईकडील वर्तमानतर सोबत्याचे घर कलहामुळे बयदा झाला आहे श्रीमन्त राजश्री चीमाजीपंत आपासाहेबाचे लग्न वदय ९ गुरुवारी पाचा घटीका रात्री लग्न सीध्दी जाहली येजमानास लग्नास बोलावले होते. समागमे दीवाण व आम्ही रात्री राजश्री पाराजीपंतबाबा व खंडोपंतबाबा होते इतक्यानी आहेर केले आम्ही तीवट सेला पैठणी व कीनखाप थान १ महमद्या जोडी आहेर केला दीढा प्रहरा रात्री डेरेयास आलो. श्रीमंत राजे अमृतरावसाहेब खांबगावहुन नांदुरीहून कुच करून कान्होबाचे कोरेगावावर मु// आले मुजफरखान पठाण याने सोबत्याचे लस्करची कहीची वगैरे लांडगे तोड मांडली आहे येक दो दीवसा लढाई होईल. रात्रं दीवस जमाबंदी होत आहे. ऐके घटकीचे शास्वत नाही आठा चौ दीवसात नीवलही होईल म्हणोन आपली आणावयाची जलदी करतो आपल्या भेटीस दीवसगत होती याच-मुळे चीतास चैन पडत नाही. बहुत काय लीहणे लोभ कीजे हा आशीर्वाद.

---

लेखांक १० श्री

चिरंजीव राजश्री दौलतराव यांसी प्रती रामराव आपाजी आसीर्वाद

उपरी येथील कुशलता // चैत्र शुध्द १५ पावेतो मुकाम महेश्वर येथे सुखरुप आसो विशेष तुम्ही मानसींग या समागमे पत्र पाठवीले ते पावले लिहीला मजकूर कलला चीरंजीव राजश्री भाऊरावाकरीता हातातील साकल्या जोड टका सोने वजना पंधरा भार व जेपुरी पोषाख लहरीदार प// तो पावला. तुमच्या लीहील्याप्रमाणे चीरंजींवांच्या हातात साखल्या घातल्या व पोषाखही

अंगावर घातला. पीषाख वाढत्या अंगाचा बहुत चांगला आहे. तुम्ही पाठविंले तें पाहुनच पा// आहे. संद्राबाई मामीची रवानगी कैली. तुम्हास घीडाहीं बसावयास पाठविला आहे. आज ता // हे मामी तुम्हापासी पावला आसैल.

जेपुरचें वगैरे राजश्री जींवबादादाचे वर्तमान लीहीले ते कळले. साथ चांगली आहे अक्षयत्रीतीयै परीयैंत काही पत्र देईन म्हणून लीहीले त्यास उत्तम आहे. यैंथैही खर्चाची अडचण बहुत आहे. चीरंजीव राजेश्री बालकृष्णाच्या लग्नाचा नीश्चय वैशाख मासचा जाला आहे. सौयरीक राजश्री मनौहरपंत कौटडीकर कमावीसदार याच्या कन्यैसी जाला आहे. तुमचे यैणे हौत नाही. याजकरिता चीरंजीव राजश्री खंडौपंततात्यास यैंथै बौलावीले आहे तेंही चैत्र आखर यैऊन पौहौचतील. लग्न सीध्दीही हौईल. आसी तुमचा हात चालेल तेथवर तजवीज करून आम्हास खर्चास पा /// दयावे वैशाखमासी श्रीमंत राजश्री सुभेदार साहेंबाची स्वारी देसी जावी. यैसा वीचार ठरला आहे. हींदुस्तानात श्रीमंत राजश्री बापुजी हौलकर दाहा हाजार फौजेनेसी यैतात. तुम्ही चींता न करावी आमचा नीश्चय अदयाप जाला नाही जाणे हौईल कींवा यैथै राहणें जसे ठरेल तेंसे तुम्हास लीहून पाठऊ सावलसाकडील ऐवजाचे लीहीलेल्यास त्याजकडील कौणी यैऊन ऐवज दिल्यास घेऊन तुम्हावर चिठी देऊ तुलसाबरीबर ढाल तलवार पा// ता पावली वेळैस बातमीस माणूस ठेवले आहे म्हणून लीहीले उत्तम आहे चौला कडील बातमी ठेऊन सावध आसावे यजमानाचे देसी जावयाचे कारण हेच की सींदयाचें हयांचें वाकडे आहे. महादजीबाबाचा काळ जाला आहे त्याचे चिरंजीव राजश्री दौलतराव सींदे याजला सरदारीची वस्त्रे श्रीमंतांनी दील्ही पुढे उभयता सरदार यैकच वीचारे चालले पाहीजेत. याजकरीता पुण्यास उभयैता यैक हौऊन नीर्मलता व्हावी. याजकरीता जातात वरकड वर्तमान हौईल ते मागाहून ली // पाठऊ बहुत काय लीहीणे लौभ कीजे हा आसीर्वाद.

---

लेखांक ११

श्रीमंत महान कृपाळु पंतप्रधान राजमान्य राजश्री सवाई माधवराव पेशवे महाराज सैवेसी शेवक यशवंतराव तुकौजी हौळकर सा. नमस्कार वीज्ञापना वा // कार्तीक व//९ पावेतौ आपले कृपेकरून मुकाम जयनगर यैथै सुखरूप असौ हल्ली इकडे मौगलाने बहुत दांडगाई केली आहे (औळ फाटली) ढे तौंड लढाईचे लावीतौ खुद आपण मागाऊन फौज तयार करून यावे हरकत केली तर माझी फजिती हौईल आम्ही मौगलास सांगीतले की तुम्ही फार दांडगाई मांडली त्यास आम्ही काही ऐकणार नाही मग ते बौलले

की तुमच्याने व श्रीमंताच्याने काय होणार आहे काय करणार ते करावे कलावे बहुत काय लीहीणे हे वीज्ञापना.

---

लेखांक १२ श्री १७१७ आषाढ व //९शुक्रवार
१७९५ जुलै १०

राजश्रीया वीराजीत राजमान्य राजश्री तात्या स्वामींचे शेवेसी श्री.बाबाजी रामजी सा.नमस्कार विनंती उपरी येथील कुशल आशाड व// ६ बुधवार पावेतो मु// महेण्वर सुरवस्प असो (खाजगी मजकुर) येथे वर्तमान आले की आषाढ शु// १२ व्दादशी सोमवारी सोबत्यानी प्रथम दोन घटका दीवस आला नाही तो पंध्रा वीस तोफा नेऊन श्रीमंत रा अमृतरावसाहेब व बायाचे या दोन्ही फौजेवर लागु केल्या अगदी फौज उधळली तळ त्यांनी लुटला राहीला तो जाळुन दील्हा या प्रमाने वर्तमान आले पहावे पुढे काय वर्तमान येते ते न कळे परंतु आता बहुत बीघडली कोणते थरास जाईल ते नकले कळावे बहुत काय लीहीणे लोभकीजे हे विनंती.

---

लेखांक १३ श्री १७१८कार्तीक व//७
१७९६ नोहेंबर

श्रीमंत महाराज राजश्री आबासाहेब स्वामींचे सेवेसी शेवक बालाजी भिकाजी सा. नमस्कार वीज्ञापना येथील कुशलता कार्तीक व//७ पावेतो

यथास्थीत जाणीन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे वीशेस रा// ज ववादादा बावनपागे याचे लस्कर आल्याचे पुर्वी रा.रामजी मनाजीस काही सोये थोडी बहुत करून वाटे लावावे हा बेत होता तो आकस्मात त्याचे लस्कर लखमापुरास मुकामास येऊन गांडापुर प्रगण्यात सीवार व्याप्तले गाव लुटून काही कबाडे भरून येत आहे शेवटी बालाजी येशवंत व हरी व महादजी अनंत त्रीवर्ग गांडापुरातून बेआब्रु करून धरून आणीन गारदयाचे पह-यात देऊन लाख रुपये खंडणी मागतात गांडापूर प्रगण्याची लुट जाली ती निराली बालाजी यशवंत मामलेदार आगोधर आ /१ व माहादाजी आनंद व बालाजी हरी ह्या दोन अ// २एकुन तीन आसाम्यास नीलस खंडणी लाख रुपये मागतात नेवासकर मामलेदार आगोधर कबुल करीतात सबब त्यांनी प्रगणीयात चीठठया गावगना करून पा// वीलीस धरून नेले.

नंतर नेवासकर जमीनदार यांनी खंडणी कबुल करून त्याजकडील एक ग्रहस्त रा. भैराळ धाडोजी व दोन पागा सुधा नेवासायासी घेऊन आले त्याजकडील चीठ्या प्रगणीयात खंडणी करीता होतात लस्करचा मुकाम लखमापुरास आलीयावर आम्ही बाबाजीच्या, वीचारे तेथे गेलो चार पाच रोज प्रयेत्न बहुत केला त्यास बैंकेदी कारभार ज्यासी बोलावे तर तोच वीलीस बसवून ठेवून गावावर स्वार पाठवीतात तेव्हा उपाये काये करावा रा//मोत्याजी गावडे याजकडून सेवगावचे बंदोबस्तास रा.मोत्याजी थोरात लस्करात आले त्यांनी नेवास प्रगणीयात दादाजीकडील च्यार गाव व कालेगाव येकुण पाच गावचे साडेतेरासे रुपये ठरविले आम्ही त्यासी बोललो की हे पाच गावचे तुम्ही केले तसे आमचे ही गावचे ठरवावे त्यास दोन तीन दिवस त्याच्या राहुटीस होतो नीत्य बोलत गेलो परंतु त्याच्याकडोन आपल्या गावची तोड न पडली नेवासकराने खंडणी केली त्याचे स्वार खांबगावी चीटी घेऊन चार राऊत आले याजकरीता गावकरी व आम्ही नेवासीयासी खंडणीस जाणे प्राप्त आहे करजगावकरही तेथेच येतील तेथे ठराव होईल तो शेवेसी लीहून पाठऊ रा. मोत्याकालगावडे याचा मुकाम देवठाण प्र// वैजापुर येथे आला आहे त्याचे रोखे जागंमठाणा पावेतो आले ते नेवास प्रगणीयाचे वारकरी आहेत त्यात घरचे गाव तर मायेचे याचा समाचार आगोधर सांभाळुन घेतील याजकरीता शेवेसी विनंती लिहिली आहे बावनपाग्याच्या खंडणीचा ही आपल्या गावच्या मोत्याजी थोराताकडुन न जाला तेव्हा नेवासकर खंडणी करतील तो देणे लागल गावकरी पडले नेवास प्रगणीयात गाव वीस आहेत जे आहे ते दुमालदारावरच त्याचे शस्त्र आहे हा वीचार येसा घडला पुढे रा. कालगावडे या प्रांतात येन्हार तर याचा बंदोबस्तास रा.खंडोपंत आबास पाठवावे की आमचे गाव बावनपाग्याचे खंडणीत मारे पडले तुम्ही खंडणी येक पैसा न घेता गावचा बचाव करून उपद्रव

न लागे ती आर्थ करावा ऐसे सरकारातून बंदोबस्त करून आम्हास इकडे पाठवावे म्हणजे त्याच्या हात बंदोबस्त होईल दुसरा वीलाज दिसत नाही. तर याप्रमाणे जरूर केले पाहिजे खांबगावास मागील देणे पाच हजार व करजगावास पाच हजार येस असून पुढे हे धोंडे येऊन पडतात.

तेव्हा गाव हवालदील जालेत त्यासी दीलासा देऊन मात्र थांबवीतो मंगेस पाणी बहुत याजमुळ लस्करची कही अलीकडे उतरली नाही कही आसती तर गांडापुर प्रगनीयाची गत्य आपलया गावासुध्दा जाली असती रयत दीक जाली बांधली साले दगे कोठवर सोसावे मागील सावकार चैन पडु देईनात पुढे वाणी शेर पीठ मोजुन देत नाहीत जो येतो आबरूसी गाठ घालीतो या गोष्टीचा प्रांत ईश्वर लावील तो खरा इकडील पैसा येत नाही त्यास रा. रामजी मनाजी पाठवीले की काही एवज पाठवावा त्यास हया दंग्यास उपाय काय करावे सरकार कामास अंतर करून स्वामीचे शेवा चोख व्हावे ऐसे कोणासही वाटत नाही याजकरीता त//पत्री लीहला आहे याचे उत्तर उगऊन व्हावा गावडयाकडील बंदोबस्त जाला पाहिजे वरकड म//र रा // बाबाजीनी लीहीला त्याज वरून शेवेसी नीवेदन होईल दंग्यामुळे येथून घोडी करजगावास वाटे पाठविली आहेत रामभाऊही पत्री त//वर करजगीहुन म//र लीहील कलावे बहुत काय लीहीणे हे विज्ञापना.

---

लेखांक १४ श्री १७१८ फाल्गुन व //३

१७९७ मार्च १५

श्रीमंत राजश्री आबाजी स्वामीचे सेवेसी विनंती

सेवक आपाजी जाखदेव व दादो भैराळ चेरणी मस्तक ठेऊन सीर साष्टांग नमस्कार विनंती वीज्ञापना येथील क्षेम ता.छ १५रोज साबात बुधवार प्रात: काल स्वामींच्या प्रतापेकडून सेवकाचा वर्तमान कुशलरूप वीशेष येथील वर्तमान दिनचर्ये ई//छ ८ रोज मंगळवार ता //छ १३ रवीवार मीनहु पत्र

लखोटा राजश्री रामाजी नानाजी याजकडे प्रवीष्ट केला पावेल स्वामी गेलीया तागायत पत्र येऊन सेवकाचा परामर्ष जाला नाही.बहुत चींता प्राप्त आहे अवकाशे स्मरणपूर्वक पत्र पाठवावे तेव्हा अन्न गोड वाटेल नीद्रा येईल स्वामी म्हणतील उपायकरीता तरी नाही आपले कुशल वृत्त तेच सेवकाचा संतोष अनेक चिंता प्राप्त जाल्या आहेत शत्रुचे पारपत्य होईल. तेव्हा संतोष स्वामींचा श्रीसांबजी सर्व अरिष्ट परिमार्जन करील चिंता नसावी छ १४ रोजी सिंद्याकडे कंपुवाले याजलादोन लक्ष रूपयाचा भरणा पाठवीला दादो हरी म-हाटे याजकडे वसई सुभा तो कहाडला गणेशराव गोपाळ जोग याजला सांगितला त्यांनी तीन लक्षाचा भरणा कंपुस एकेदिवशी केला तेव्हा एक सरदार कुच करोन मौजे मांजरीवर सिंदे तेथे दाखल जाला. वराता मनस्वी सरकारावर करीतात दाबात थोडे कमी पावले ते साल मागतात हे पैसा देऊ म्हणतात. गायेकवाड तीन देतात पाच द्या म्हणतात बहुत रदबदली करीतात ऐकत नाहींत नीरोप रावजी आपाजी यजमान साहेबाचे कारभारी नेहमी मंडळी पूणीयात रुमाल घेऊन खेटे घालीतात अद्यापी बेतात येत नाहीं शींद्याच्या बाया करमाळे प्रांतात शिरल्या मोगलाकडील फौज दहा हजार त्या प्रांतात रखवाली करीता आली आहे समेट होत नाही गोपाळराव व चीटणीस पलटणे तीकडे पाठवीतात. सरकारात नेहमी कारकुन वसुलास बसले आहेत. ऐवज चहुकडे पाठवीतात. आपलें कारभारी पुढ डोई देन्हार कोन्ही दिसत नाहीत येका आड येक असतात, वाकडे यांचे घरी दीवान मंडळी दादाजीकडे, पारनर मंडळीं भोजने निद्रा करीतात. सीसोलकराचा लोभ पारनेरकरांकडे ओढतो चिमणीजीपंताचा लोभ दीवान मंडळीकडे आहे. घडता काय घडल कळत नाहीं ओझे भारी कोणी मस्तकावर घेतो होत नाही श्रीमंत राजश्री नानाची ताकीद जलदी करावी. सींद्यांच्या वराता होळकरावर कराव्या या बेतात आहेत. छ. १५ रोजी सींद्यांचा नीरोप कृष्णराव चिटणीस घेऊन आले पंचवीस लक्ष रुपये आज या मुक्कामी घ्या व दाहा जामगावी घ्यावे. तेव्हा कुच होईल हे न जाले तरी कुच होत नाहीं नीमे अनंत सींद्यांनी श्रीमंताकडोन नेले आपल्या लस्करात आत्मारामबाबाच्या जीमेस ठेवीला बायास वर्तमान कळले. नारायेणराव बक्षी यांना स्वारी करोन कडा पेडगांव दरोबर लुटले गावास अग्नी लावीला किल्ला मात्र राहु दीधला. वरकड नाश थोर केला बातमी सींद्यांस आली परमक्षोभला पुढें काय करील कळत नाहीं बज्याबा सीरोलकर आपले कारभारी हीसेब रुजु पाहात बसले तेथे मल्हार शामजीकडील कारकुन येऊन विनंती राजश्री आबाजी यांचा गाव पळसी सरकार आज्ञा त्या गावास आमच्या लोकांचा उपद्रव नसावा. पत्रे सरकारची व खाजगत बज्याबाची याप्रमाणें पत्रे मल्हारपतभाऊची चार गेली तेव्हा फौज माघारी गेली आता आबाजी स्वस्थ पळसीत असलीया काडी मात्र

अपराध आम्हाकडून त्या घडणार नाही आबाजीस पत्रे श्रीमंत बालासाहेब लिहीतात सरंजामसुध्दा आबाजी लक्ष्मणावर जावें पारपत्य करावे दौन तीन पत्रे पाठविली कालगावडा आबाजी येक होतात आता आम्हाकडे दोष नाही आबाजी यासी सरकारचा सरंजाम आहे तो यानी सुरवरूप पुढे कालगावडच्याकडे पाठवावा आपण आपलें गावांत स्वस्थ असावे आबाजी गावापासीन कोसभर पुढे गेले तरी सरकार पत्र बज्याबाचे पत्र मस्तकार वंदु सेवा घडल ते करूं तेव्हा बजाब्यानी चिरंजीव मयेपतरायास रूबरू आज्ञा केली. वकील तुम्ही साफ पत्र आबाजीस लिहिणे आपला गांव राखूण स्वस्त असावे यांच्या घरकर्जीयांत आपल्याकडे नीमित्य नसावें मल्हारशामजी तुम्हास बहूत मानीतो गावाबाहेर सर्वथा न जावे खंडोपंत बाबास ताकीद बज्याबानी केली तुम्ही पत्र आबाजीस लीहा येजमान पत्रे पाठवितात. तुम्ही सरंजाम त्यांच्यापुढें पाठवणे खासा आपले गावात स्वस्त राहाणे तुम्हास उपद्रव मल्हारशापनी देत नाही खंडोपंतबाबानी दादास सांगीतले आपास सांगुण पत्र आबाजीस लिहीणे स्वस्त घरी राहुण मुंजी कर्णे. कुटूंब पुणीयास घेंऊन येणे मग गावास भय नाही तुम्हांस काळजी पडणार नाही बाळासाहेब पत्र लिहून पाच रुपये घरातून देणार नाहीत तुम्हास खर्ची पाडतील संवसारओढा सावकाराचे देणे खेडी मारली गेली लटक्या घोरात नसावे याप्रमाणे बाबाचा नीरोप सरकार दाणे टाकून कोंबडी झुंजवितात. पुढे उंट कोणतें रोखी बसल समजत नाही काळ परम खोटा आला जे कराल ते दूर अन्देशा पाहून करावे स्वामी सूज्ञ सेवकांनी विनंती काय करावी सरदारीत जीव नाही सरकार नाशावर आहेत, त्याचा भरवसा येकरूप नाही मल्हारशामजीकडे मंत्र्याचा लोभ त्याप्रमाणे सरकार कारभारी आपले कारभारी सर्व मल्हारपंताच्या साहीत्यावर आहेत. परीणाम गोड दिसत नाही. अबाजी काळ बहुत लबाडीचा निघाला. गोड बोलावे काळजात सुरी घालावी. याप्रमाणे वर्तणूक निघाली आहे सोंदा काही जात नाही. मग कोणास खाईल भरवसा येत नाही आबा चीटणीस लटके कामात घेतले त्यांचा जीव सरकारकडे. त्यांचे पदरी सोदे ते मनस्वी भासवीतात. मशारनीलेस जड पडल पन्नास मागती तोंड सुकले मंत्र्यास म्हणती तुमच्या पत्रावर मी आलो. याची चाल खोटी पत राहता दिसत नाही कारभारी म-हाटे हुजरे ते मार्गाप्रमाणे चालत नाहीत. बाया दौलतराव येक नाहीत यात नुकसानी लीहीता पूर्वत नाही येथून चीरंजीव जान्हवीबाई पलसीस चतोर्थी करीता राहात नाही, मातुश्री पासी पाठवावा. छंद घेतला नीमित्य पाठविली सेवेसी श्रृत्य होये लोभ कीजे हे वीज्ञापना . राजश्री भवानीपंतबाबास सा.नमस्कार वीनंती भीत दक्षणाची कलले त्याप्रमाणे सिध्दीस न्यावी. आरंभीले कार्य सोडू नये. दीवस गडबडीचे भरवसा आपला लोभ कीजे हे विनंती.

लेखांक १५ श्री शनिवार व//३०जेष्ठ १७१९

२४ जून १७९७

पै.छ//२८ जील्हेज सन १२०७

राजश्रीया वीराजीत राजमान्य राजश्री तात्यास्वामीचे सेवेसी

सेवक रामा मनाजी सा. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जेष्ठ शु//१४ मु. पळशी जाणोन स्वकीय कुशल लीहीत जाणे आपणापासुन स्वार जाली ते श्रीमंत सौभाग्यवती ताईसाहेब सेंधव्याचे मुकामी आटोपून समागमेच पळशीस पावली (पुढे खाजगी मजकूर) राजकी वर्तमान महादजी सींदे यांच्या स्त्रीया व दौलतराव यासी वाकड पडोन बाया श्रीमंतांकडे गेल्या श्रीमंतासी व सीदयांसी येक लढाई जाली सींदे सीकस्त खाऊन माघारा मुकामावर गेला सीलेदार पागे पथके सर्व फौज बायाकडेच उठुन आली एका दो महीण्यात राज्याचा बेदा मीटेलसे दीसते कलावे बहुत काय लीहीणे लोभ कीजे ही विनंती.

---

लेखांक १६ श्री

छ १२ सुहुर १६ ऑगस्ट १७९७

श्रीमंत राजेश्री आबाजी स्वामीचे शेवेसी विनंती सेवक आपाजी जाखदेव व दादो भैराळ चरणी मस्तक ठेऊन शीर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील क्षेम ता छ २२ सफर बुधवार मु. पुणे जाणोत स्वकीये कुशल लेखन निरंतरी लिहीत असावे विशेष वर्तमान श्रीमंत राजेश्री सुभेदार साहेबाचा वाखा श्रावण प्रतीपदेपासून अधीक जाला. भरवसा तुटला सर्वांस ताकीद केली कळले तैसे सांगुण बावाची समजूत पाडा, यात उत्तम आहे. जीवात जीव आहे तोपर्यंत पोराणी येक असावें थोर हेत आहे बाबाकडे सांगुण पाठवले. आमची पराकास्टा जाली. उभयेंता भाऊ येक होऊन दौलत राखा आपला कजीया

बाहेर लोक मनस्वी बाहणे दाखवून लांबवितील हे चाल खोटी श्रीमंत राजेश्री नानाकडे नीरोप पाठविले येक वेळ येऊन डोळे भेटी घेणे यांचा शेवट निदानचा आहे. पंचमीपासून अन्न रस पोटात गेला नाही सैष्ठीस श्रीमंत बालासाहेब याणी लस्करचा जाबता केला. सर्वत्र पाहारे पुलावर नावावर ठेविले सावध निरंतरी वडीलाच्या पलंगापासी सावध बसले. सप्तमी सोमवारी बहुत वारवा जाला. सैब्द खोलीस गेला. बालासाहेबी बावाकडे सांगुण पाठविले.

येजमान साहेबी सौ. जिजीबाईस भेटीस बोलाविले. सैवटची भेट घेणे असली तरी जलद येणे जिजीबाईनी बाळाचा नीरोप घेतला. प्रथम प्रहर दिवस आला तशात सौ. जिजीबाई आली पायावर डोई ठेविली. अर्ध घटका बसली विनंती केली की पथ्ये करीते आपण थोडेसे अन्न खाणे. मान हलविली. राधाऊ यांनी सरंजाम सीध्द केला. पंथीचा स्वयंपाक ताट घेऊन जिजीबाई पलंगापासी आली. उठेवीले खाली गादीवर बसवीले. पाठीसी पलग पाच घास घेतले. अन्न फीरलें हात धुतले. बाळासाहेब तोंड धुतले हात पुसले. पलंगावर निजविले ब्राह्मण बोलावून प्रायश्चित दिधले ब्राह्मण जपास बसवीले दोन प्रहर दिवस आला. सौ. जिजीबाई आपल्या मुक्कामास आली, श्रीमंत बावांस झाले वर्तमान सांगितले. आपण जावे हे चांगले. बालासाहेब वाट पाहातात. बाबानी स्वारी तयारी केली. दीड प्रहर दिवस सोमवार सप्तमीचा राहता स्वारी बाबाची आली. बहुत थोडे (फाटले) पाहीली. श्रीमंत (फाटले)स बावा येतात लोक त्याचे मनस्वी कजीया करावयास चुकणार नाहीत आपले आरब गारदी तयारी सांगुण आपल्याला राहुटीस सावध बसले. बाबाची स्वारी आली बंगल्या आसपास चौकीं बसविली. श्रीमंताजवळ कारकुन मंडळी जोसी भट ब्राह्मण कारभारी श्रीमंत दाजीबा व पाराजीपंत खंडेबाबाबा नागो जीवाजी बावा आले नागोबानी येजमानाच्या कानी सांगितले त्यांनी विचारीले बाला कोठे आहे दूर जाऊ नको त्याजला सांगा तशांत बाबा आले. मुजरा केला पायावर डोई ठेवली. हाताने संवज्ञा केली. जवळ बसावे डोलेयास पाणी ऊर भरूण आला नेत्र पुसीले खंडोबाबास सांगितले बाबा आला बाबास बालास बोलवा बाबानी बावास विनंती केली. आपले लोक आसपास तयार आहेत. बालासाहेब येतात, लोकास ताकीद करावी. त्यांनी सांगितले दूर उभे राहावे बालासाहेब येतात खंडोबानी भगवंतराव हाती धरले बाहेर नेऊन लोकास एके बाजूस बसवीले बालासाहेबाचा मार्ग सुरळीत केला. तीकडे दुज-या पाठविला. जलद येणे बालासाहेबा समागमे चिमाजी बुळे घेऊन आले. बगल्यात पलंगाजवळ आले बावा उठले. पायावर डोई ठेविली. गला हात घातले. अंगास अंग लावीले. पलंगाच्या आस-यानी उजवे डावे बसले. सुभेदार सावध जाले. उभयेंताही हालके बोलु लागले. आज परीयेंत थोरले बावानी

मजला सोपीले बरे वाईट रीतीने पार पडली आता तुम्ही उभयेता भाऊ येक असावे वडीलपणी गादीसी मनसद बालाची असावी कारभारी घेऊन कारभार बावानी करावा. सरकार चाकरी फौज पालावी मामलेदार जमीनदार सर्व लोभात असावे. उभयेता भाऊ येक होऊन जमा सांभाळावी खर्च करावा यांत चांगले तशांत पाराजीबावांनी बोलणे घातले दौलत तुमची तुम्ही राखावी. उभयेता कजीया पडती. महाल गांव लुटले जातात, पागा वगैरे कारखाने लुटीतात. हे नुकसान तुमचे किंवा लोकांचे होते, उभयेता येक असाव. उपयोगी पडतील ते कारभारी जवळ ठेऊन काम घेणे. कायदे नसलीया आज सुभेदार सावध आहे तो जवळ ठेवणे. देशांत महालांत, वतनीगावांत कजीये लोक पागे करीतात, त्याजला ताकीद करावी. ऐकून उभयेतानी घेतले सुभेदारांनी बाबाचे हात बालासाहेबाच्या हातात घातले. हा मूर्ख आहे तु याजला सांभाळीत जाणे श्रीमंताची चाकरी याजपासुन घेणे महाले संस्थाने बालानी राखावी. बालासाहेबाचे हात घेऊन बावाच्या हातात घातले यांचे शेरीर उणे आहे. दरयेक यांचे चालवणे उभयेतांनी पायावर हात ठेवीले एक विचार चालू बावानी आज्ञा घेतली. गावात जातो येजमान साहेबी आज्ञा केली. आलास आता जाऊ नको येथें राहणे कारभारी यास सांगीतले. बावाच्या घोडीयांस चंदी मानसास पेटया देणष आमच्या बंगाल्यात खासा राहेल कचेरीच्या डेरीयात शागीर्द पेशा राहेल चिखल भारी राहुटी उभीकर्ता ठीक पडत नाही लोक पागा सीलेदार पलटणवाले लस्करात जाऊ देणे मागती बावाचा ओढा पाहीला आज सोमवार सारें उपासा त्याचे घरी स्वयंपाक तयरी जाली मी जातो प्रात:काळी येतो अता वाकडे पडणार नाही राजश्री नानास पुसता नंतर कुच करीन उत्तम आहे बावा बाला उभयेता बाहेर निघाले बावानी बालासाहेबास तसलमात केली घोडीयावर बसले स्वारी निघाली दोन घटका रात्र जाली सर्व मंडळीस आज्ञा जाली आज सोमवार रात्र सर्वत्र लहान थोर भोजनास जाणे ऐसी आज्ञा लहाण शब्दे सुमेदारानी केली. सर्व उठले तशात चिरजीव जवळ गेले दोनचर्येे वर्तमान सांगीतले ऐकुन घेतले आज्ञा केली तुजला सोमवार रात्र जाली पुणीयात जाणे ढुर सांबसदाशीव वाट पहात असेल जलद जाणे चिरंजीवानी वीनंती केली सांबसदाशीवास दोड प्रहर रात्र भोजनास लागती येजमानानी आज्ञा केली त्याची चाकरी देव घेतो तू त्याचे चालवीत जाणे वीडे दोन राधाऊ स्वहस्ते दीधले दाहा घटका रात्र जाली चिरंजीव घरास आले. श्री सांबजीच्या आरतीच्या समयास आलो सर्व वर्तमान सांगीतले बावाच्या स्वारीच्या मधे आलो येशवंतराव होलकर दीवशी दोन प्रहरा सरंजाम पागा घेऊन कुच केले. बावाकडे जातो कारभारी कोणी बोलले नाहीत बाळासाहेब यांनी जाईल ऐसे केले तो पुळावर आला.पहारा पलटणीचा त्याती रोखला तेथेच राहिला बावा नीघताच

त्याचे स्वारीत सीरला त्यांनी चार घटका उभे राहून त्याचा लवजमा सर्व समागमे घेऊण प्रहर रात्रीस लस्करात गेले बावाचे कारभारी कडू पाटील मधे होते ती व चिरंजीव बोलत आले कडु पाटील बोलला सुभेदारांनी भाऊ एक केले परंतु हे चालणे घडल भरवसा नाही खतरा जाणे दूर आहे.यात कोणी मातबर पाय घालील तेव्हा हे नांदतील मुलांनी त्यासी उचर केले नानांनी सांगितले तरी निभावल नाही त्याचे स्कार दिघला हे होईल तेव्हा चालेल तो भांबडयीत लस्कारात गेला चिरंजीव मयेपतराव आपलया बि-हाडाला प्रात:काळी मंगळवार श्रावण .व. //८ छ. २१ सफर येजमानाचा वाखा भारी ऐकीला. दिनचर्यै चीठी पाठवीली जासूद गेला सा घटका दिवस लोक सर्वत्र जमा जाले दानधर्म थोडा बहुत केला. चिठ्ठी इकडूण जासद घेऊन गेला खंडोबा बाबापासी दिधली त्यांनी जासूदास सांगितले नानास सांगण आज दिवस पार पडेसा भरवसा दिसत नाही शेध्द थोडा नीघतो वकीलास सांगणे जलद येणे. दहा अकरा घटका दीवस येता जासुद माघारा आला. चिरंजीव श्रानकरून घोडे तयारी जाली. तशात चवदा घटका दीवस पुणीयात वार्ता उठली. सुभेदाराचा काल जाला.पंधरा घटका चवदा घटकेत काल श्रीमंत सुभेदाराचा जाला थोर नाश कोटयावधी लोकाचा अन्नदाता गरीबाचा, ती. मातुश्री सुभेदार ममता खर्चीत गुणवंत कामे केली यांचे यश देता या प्रमाणे उभयेता नाहीत पुढे दैवा प्रमाण काय घडेल कलत नाही श्रीसांबजीनी थोर भूपाल नेला. सीदे होळकर उभयेता सरदार पुणीयात खपले श्रीमंतांचे वर्तमान तरी पूर्व दिवस मागती बाहेर पडल ऐसा दिसतो.मोरोबादादा परगणे राजूर प्रांत जव्हार देश, धनवट परगणे अकोले तेथून बारा कोस पश्चिमेस राजूर जवळ गड रतनगड पाच कोस अवंढापटा या बांधाटीत तोकीला धोंडो माहादेव दौलताबादकर याजकडे दादाची नेमणुक तीकडे जाली. सीदे यांची दोन पलटणे बज्याबा सीरोलकर पाच हजार लोक घेऊन तेथे मोरोबा ठेवीले संन्यास मोडला बद्दु केले वस्त्रे दिधली कुंजर होते येकत्र तेथे गढी मातबर देशमुखाची त्यात ठेवीले बातमी पुणीयात आली मंत्र्यांस कलले. रायेगडास नेतो, तो बेत राहिला आता काये करावे. सीदे पैका घेऊन दादा खुले ठेवीत नाही सीदयाचे कारभारी यांस भारणी घातली भातखुले कानी सांगितले. त्यांनी बेत केला. दौलतरायास सांगावे सर्व कामे जाली आता कुच करावे. यात गोडी राहावी श्रीमंत व नाना येक असावे. घर सांभाळतील देशास कौल देतील छ १६ गुरुवारी मिनहुस सीदे सरकार वाडीयात आले श्रीमंतापासी, बसले नानास बोलावू पाठवीले त्याच्या येण्यास विलंब जाला. रात्र पाच घटका जाली. नंतर नाना आले. अर्ध घटका बसले बोलणे जाले नाही. श्रीमंत सीदे याचे खलबत जाले बाणाजी वगैरे कारभारी खलबतात घेतले नाहीत नानास समजले.जलद आले तसे माघारी गेले. सा घटका रात्र जाली. दौलतरायांनी

नीरोप घेतला. श्रीमंतानी आज्ञा केली: भोजन करून जाणे त्यांनी विनंती केली. आज पोटात भारी भुक नाही भोजन केले तरी श्रमी जीवास होतील, विडे घेऊण लस्करात सोंदे गेले छ १८ रविवार सोंद्याची स्वारी आली दोड प्रहर दिवस होता. श्रीमंत त्रीवर्ग सोंदे चौघांचे खलबत पाच घटका जाले. कारभारी कोण्ही घेतले नाहीत. नंतर सेलुकर येकत्र जाले. आणीख खलबत चार घटका जाले त्यात ऐकले नानाची मर्जी सोंद्यानी जावे चौकी पहारा पलटणे न्यावी. श्रीमंत सरकारवाडीयात असावे. हुजराती लोक पागा गारदी सरकाराची सेवा करील आमचे येणे नीत्य होईल जवळ वाडीयात राहु हे न जाले तरी आज्ञा द्यावी. चार मास कृष्णातीरास राहु. तोथटिणास जाऊ नानास बोलावणे करावे आज बेत ठरल त्याप्रमाणे करावें बापू सेळुकर जाउन मंत्र्यास आणीले रात्र तीन घटका जाली खलबतात त्रीवर्ग श्रीमंत व नाना दौलतराव पांच जनाचे खलबत जाले. दौलतरावाची कामे स्वामीनी सर्व करुण दिधली. मोरोबादादा दुर नेले. कोकणचा बेत सर्व राहिला. अस्तु. आता मजला आज्ञा द्यावी. कृष्णातीरास जाऊ तेथे स्नान संध्या ब्राह्मण भोजने करूं श्रीमंतांनी उत्तर केले जरूर जाणे अगत्य आहे कींवा कैसे पैके कळवा त्याप्रमाणे उत्तर होईल दौलतरावांनी काहीं पुरवणी करावी ते न जाली नानास राग आला. उठून गेले खलबत समाप्त जाली सोंदे भोजनास उठवीले. प्रहर रात्री पाने मांडली. भोगन करून उठले. दहा घटका रात्र जाली विडे देऊन बारावीच्या अमलात लस्करांत गेले. बाणाजी हुज-या त्याजला लोकांनी बसवीले. पैका मागतात कृष्णाजीसी नानानी कोटी रुपये देती. कुच करा जामगावी पंचवीस. ब-हाणपुरी पंचवीस सरकारकडे पंचवीस. उज्जैनीस पंचवीस. तेव्हा लोकांस देणे ते राहीले श्रीमंतास मंत्री अटकेत ठेऊन बसवीतात. खर्च मनस्वी करतात. चालेल कैसे याप्रमाणे सोंद्यास बोलतात. श्रीमंत सोंद्यास चाऊ देत नाहीत. मागती बखेडा दीसतो. नांदणे घडत नाहीत. येजमान साहेबाच्या परामर्षास कोन्ही आले नाहीत. सर्वत्र वर्तमान कळवीले तीन दीवस वारवा जाला. आता नीदान वर्तमान आले सोंदे गेले नाहींत श्रीमंतही नाहीत नाना शनीवार रवीवार सोमवार येतो येतो बोलले. परंतु कोन्ही आले नाहीत. छ १६ मीनहुस रा. दाजीबास सोंद्यानी बोलावीले. चार गोष्टी खातरदास्त बोलणे जाले सुभेदाराचा वारवा तुम्ही कामावर जाणे त्याप्रमाणे रघुपती खंडेराव दाजीबास घेऊन आले त्यानी नानास विचार जा म्हणाले. परंतु पैका करार जाला छ ११ रोजी दाजीबा येजमान साहेबाकडे गेले चार गोष्टी स्वमुखे सांगीतल्या भरवसा तुझा आहे. दौलत राखणे. आमची पराकास्टा जाली उभयेता चिरंजीव तुझ्या ओटीत घातले. मार्गानि चालतील तरी उचम. आता पुणीयात न जावे दाजीबा जाऊ लागले. तेव्हा सुभेदार म्हणाले माझा जोशी असता जेजुरीस जातो दौलत बुडाली. कोण्ही सांभालीत नाही मग

बालासाहेबी हात धरला. राहुटीत राहणे पुणीयात न जाणे स्वस्त राहीले. याप्रमाणे तूर्त जाल थीर नाश श्रीमंत सुभेदार गेले आतां दौलतीत गरीब मनुष्यास सांभाळून पाळतील हा भरवसा उभयेतां धणीयाचा नाही. चवथे घटकेत काल मंगळवारी वद्य जेन्माष्टमीस जाला दोप्रहरी पुलाचे दक्षीणे बाजुस जागा नीबर खडक पाहून तेथे चितास्थळ केले. श्रीमंतास बातमी कलवीली बावास प्रसंगास बोलावीले. याच्या येण्याचा अनमान जाणुन मागती कारकुन जलद घोडेस्वार पाठवीला. त्यांनी सांगितले बालानी चौकी पहारे नावेवर पुलावर ठेवीले. सर्वत्र चौकी ठेवीला आधी येणे तरी लोक येतील नीरार्थक कजीया वाढेल. येणे घडत नाही स्वस्त विधी करणे कारकून सोला घटकेत माघारी आला. राधाऊ स्वस्त राहीली उत्तम गोष्ट जाली पुढें मागती बि-हाड कोठीत जाईल. वैभव भागु हा भरवसा जाणोन राहीली. चौंकी पहारा जाबता बालासाहेबी केला लस्करास लोकांस सावकारास दालबाटी बापुसाहेबास सोपून त्या सेटे महाजनास ताकीद केली दहा दीवस बोभाटच पीसदेकराचा नसावा ऐसे जाले चिता विधी सर्व बालासाहेबी केला नंतर डेरीयात गेले. घडावर दीप चिमाजी बुळे यानें ठेंवला. त्याजला पागोट त्याकाळी बांधले नंतर कारभारी मंडळी सर्व मिळोन बावा साहेबाचे लस्करात आले. चार गोष्टी सांगीतल्या काल वडीलाच्या पायावर हात ठेऊण आज येणे घडलं नाही. आता बोलणे गोड नाही. उभयेतां बंधु बारा दिवस एक असावे. नंतर संसार सांभाळा उपयोगी असतील ते ठेवणे नसलीया उदार हस्ते निरोप देणे हे चांगले चार घटका कारभारी बसलें बावांनी आपले राहुटीस डोई बोडली. मिशा काढल्या. आनंदरूप गोपाळ मंडळीत आहेत. कारभारी हुंडचा जुन्नरकर व जकाती भारी आहेत दौलत बुडती धणी नामर्द. मंत्री दुष्ट राजे बुडती आहे. फार काय लिहु लोभ करूण पत्री सांभालावे आपणाखेंरीज आश्रय नाही. हे विज्ञापना.

---

टीप: - बाळासाहेब, काशीराव होळकरास म्हणत असत, हे अर्धवट होते, पण तुकोजीरावांचे वडीलपुत्र होते. बाबासाहेब उर्फ मल्दारराव हे तुकोजी रावास सुभेदारी मिळण्याआधी जन्मलेले आहेत व माझा जन्म तुकोजीरावास सुभेदारी मिळाल्या नंतरचा असल्यानें सुभेदारीवर माझा हक्क आहे. नाना फडणीसास पराक्रमी मल्हाररावास सुभेदारीं द्यावी असें वाटत होतें. पण होळकराशीही आपल्या तंत्राने असावी म्हणून दौलतराव व बाजीराव यांनी खुळ्या

काशीरावास सुभेदार केले. या पत्रांत भाकीत केल्याप्रमाणे तुकोजी नंतर एकच महिन्यात मल्हाररावाने बंड केले. काशीरावाकडून चाळीस लाख रुपये घेण्याचें कबुल करुन घेऊन दौलतरावाने फौज पाठवली त्या लढाईत १४ जखमा होऊन मल्हारराव ठार झाले. होळकर शाहीत कली प्रवेश झाला. होळकरपुलाजवळ तुकोजीरावा शेजारी या मल्हाररावांची समाधी पुण्यास आहे याखेरीज बाजीराव पेशवे यांनी २०० फटके मारुन हत्तीचे पाई दिलेले विठोजी होळकर व पेशवे शींदे व इंग्रज यांना हैराण करणारा यशवंतराव होळकर हे तुकोजींरावचे दासीपुत्र होते. (होळकर शाहीचा इतिहास भाग २ मधुन )

---

लेखांक १७ //श्री गजानन प्रसन्न//

२६ सप्टेंबर १७९७

विज्ञापना ही की आपण तेथील बंदोबस्त उत्तम प्रकारचा चवकसीने राखावा कोणी फंदफितुरी असेंल त्याचे पारपत्य समजता क्षेणीच करावे दीनावधीवर सर्वथा न घालावे रा. बच्याजी नारायेण येथून प्रतीज्ञेचा वीडा उचलून गेला आहे की महेस्वर सहज्यात घेतो त्यास त्याजबरोबर दाहा सहस्त्राच्या हुंड्या आहेत त्याचा शोध करीन ऐवज हस्तगत करावा आणि बच्यास धरुन कैद करावा घरदार जप्त करावे व महाडीक धरुन पारपत्य करावे आणि इकडे लीहावे यात याचा संतोश सरकार आज्ञा प्रमाणे चाकरी जालीस याजला वाटेल याची मर्जी प्रसन्न होईल आणखी कोणकोण तीकडे या फीतुरात असतील त्याचा शोध करीन पारपत्य करावे इकडुनच लिहावे ऐसी येथील आज्ञा आहे व आपण ऐसे करावे यात स्वार्थ ही घडुन लवकीकी चांगले आंगी

सर्वज्ञेंता तेथ बहुत व स्तरे काय लेहु ज्यात सरकाचा नक्ष आणी स्वामीची कीर्त ही हा अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत आज चेतोर्थी रवीवार श्रीमंत मल्हारराव याजला अकरावा दिवस त्यास श्रीमंत येजमान मंडळीसह पुलाजवळ जाऊन येथोचित शीत सर्ग केला वरकड दानधर्म महादाने वगैरे उदयीक होईल त्याप्रमाणे लिहु कळावें वरकड श्रीमंत मातुश्री व जीजीबाई व येमुनाबाई हे उभयेता बाया व येशवंतराव यांचे कुटुंब व बावाची खास ऐसी येकत्रच श्रीमंत सुभेदार कैलासवासी याच्या बंगल्यामागे आहेत त्याची वस्त्रापात्राची बेजमी यथोचित येजमानानी करावी तसी केली आहे. सेवेसी श्रुत होयें हे विज्ञप्ती.

विज्ञापना ईकडील वर्तमान तर जेजुरकराचें चिरंजीव सोबत्याकडे गेले होते तेथोन काल प्रहर दिवसा आले. पा // व देशमुख तेथेच होते. त्यास आल्यावर प्रहर दोन प्रहर खलबत अस्तमान पावेतो जाले. त्यात विचार तेथे जाला की दीवाण कृष्ण करावे असा विचार होऊन जेजुरकराचे घरी चिरंजीव आले त्याजबरोबर पाटील व आबाराम कोठारी सावकारहीं आले त्याचे याचे सर्वांचे बोलणे होऊन चिरंचीव पा // देशमुख सावकार यासह वर्तमान सोबत्याच्या लशेस्करात चालले तो रात्र चार घटका जाली. त्यास आपले लस्कराबाहेर गेले तो आपणाकडील नवे आराबा आहेन त्याची चवकीं बाहेर लशेस्करच्या गीरद नवाई येजमानाच्या आज्ञेवरून आसती त्या आराबानीं याजला जाण्याचा अटकाव केला. याच्या पालकया थोपून याजला त्रिवर्गास तीन ठिकाणी बसवीले हे वर्तमान येजमानास उमजले नंतर यजमान जात्या तेथ पावेतो जाऊन त्या त्रीवर्गास घेऊन आपले बंगल्यात आले तो तें बहुतच रूष्ट झाले जे आमची आबरू गेली तोंच खटला त्याची समजुती अडीच प्रहर रात्र पावेतो जाला सर्व कारभारीही दरबारी गेले होते. आता ऐसा प्रकार या दरबारचा जाला आहे. पुढे ईश्वर कसी लज्जा राखील ते राखो सेचट जेजुरकराच्या चिरंजींवाची येजमानानी विनयेभावे बोलुन नमनादीक उपचार दोनचार वेळा करीन त्याच्या वृची ठिकाणी आणील्या सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ती.

विज्ञापना इकडील वर्तमान तर जेजुरकराच्या चिरंजीवाची समजुती एकांती जाली. येजमानानी केली ते समई त्याने बोलण्यात आणीलें की रा. आबाजी खंडेराव व आन्याबा बुळे व भगवानदास मुळचेंद हे चवघेजण या लशेस्करात नसावे. यांनीही कबूल केले आहे घडता घडेल ते खरे. साराउंश आज काल त्याचा बस आहे. जे करील ते होईल असा दिवस त्याचा आहे. कचेरीत मनास येईल तशी भाशेणे समक्षे करीतो. मरीयादा रुबरू येजमानाची ठेवीत नाही. ईतराचा लेखा तो काये स्पष्ट उत्तर करीतो की तुम्ही न ऐकले तर लगेतगे प्र // आवस्ता होईल आणि पुढे बंदोबस्तही होईल हे उत्तर येजमान ऐकोन साशंकीत जालें. श्रांत सर्व काळ चिच चिंतार्णवी निमग्न आहेत. दवलत

थीर वडीलछत्र होते श्रीमंत सुभेदार त्याचा काळ जाला. त्याजमागे बंदोबस्त करावा. तो अकस्मात हा घोर प्राप्त जाला येणे कडीन रात्रंदिवस येजमानास चईन पडत नाही. आसो. तथापि दवलत थीर आहे. हारयेक प्रकारे बंदोबस्त होईल. आपण चिंता न करावी. तेथील बंदोबस्त राखून इकडे लिहीले पाहीजे. आंबड चांदवड किल्यावर त्यांनी शेकळायुक्त घातला होता. तो मुक्त होऊन पुढे गाळण्याकडे गेला आहे. सऊदारसिंगाची सेवा करील. मदारीस सऊदारसिंगाने धरून दीधले. आसो. श्रीसचा प्रमाण तूर्तचे प्रसंगी जे आहे वर्तमान ते सेवेसी आहे. वरकड येथे पाहीले, ऐकीले ते वृच रा. रगो भीकाजी आश्वीन शु. // १ आपणाकडे रवाना केले, ते सविस्तर करीतील सेवेसी श्रुत हे विज्ञाप्ती.

---

लेखांक १८ श्री मुवणी

पें. छ. ७ रबीलाखर १२०७ आश्वीन शु. ८ शके १७११

२८ सप्टेंबर १७९७

श्रीमंत राजेश्री आबासाहेब स्वामींचे शेवेसी विनंती सेंवक रामराव नानाजी कृतानेक सीर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता. आस्वीन शु. //६// पावेतो मुकाम पळसी येथे सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष राजश्री बालाजी भीकाजी पळसीत आम्हाकडे आले की दाभाडे याचा दंगा बहुत जाहला या करीता सरकारची ताकीद पत्रे घेऊन श्रीमंत राजश्री नानासाहेब यासी वर्तमान सांगोन दाहा रोजाची आज्ञा मागोन या कामा करीता बालाजी भीकाजी आम्हास घेऊन आले. येते समई मौजे करगांवचे पत्र आले की रा. आपाजीपंत सहस्त्रबुध्दें यांचे स्वार येऊन रोजा लावीला आहे तेच पत्र आपल्याकडे पलसीकर अंतेज्या समागमे ताबडतोब रवाना करून आम्ही इकडे आलो. करजगावचे मनाईकरीता विनंती करून येसु चव्हान यासी सांगीतले कीं आधी मनाई व्हावी. तोही माणुस मनाई घेऊन गेला आसेल गोविंद नाना जोशी हुजूरपागे याचे सांडणीस्वार मौजे मांडवे बुद्रुक व मांडवे खुर्द येथे स्वार व सांडणी ऐसे होते. त्यास ही मनाई ठेवीली त्यांनी ते मानून गेले. उपरांतीक

मौजे मजकुरी व साकुरावर रोखे घेऊन भीवराव पानशाकडील स्वार आले आपले दोन्ही गावास दोन हजार रुपये लावीले. येवीसी बालोजी जाधव आणी आम्हास माघारा समागमे लिहुन पाठवीले ते कागद आम्हास सीपलापुर जवळ भेटले ते वाचून पाहीले. आणि ते समईच श्रीमंत राजेश्री नानास पत्र लिहुन पाठविले की पानसे याचे स्वारास मनाई पाठवावीं तेही आज उदया येथे येईल चहुकडोन गवगवा बहुत आहे. याजला उपाये काये करावा. आपला आसीर्वाद आहे. सेवटी गोष्टी पार पडतील आपण पंचवीस रुपयेची वरात व्यंकोजी खंडेराव याजवर दिल्ही याअर्थी सरकारचा जासुद करजगावी आठदिवस जाऊन बसला आहे. अदयापी एक पैशास ठीकाण नाहीं. व्यंकाजीपंत याची गांठ पडली नाही आम्ही हीकडे आलो आहोत जासुद तिकडून काय करून येईल ते पाहावे श्रीमंत रा. नाना पुरंधरे याज कडून पत्र दाभाडे याचे नावे लिहून जासुद पलसीस आधीच पोहोचला होता तो आज राजेश्री यशवंतराव दाभाडे याजकडे रवाना केला उत्तर कैसे येईल ते व आपली आज्ञा येईल. त्या आन्वये वर्तणुक केली जाईल. या पत्राचे उत्तर लौकर आले पाहीजे. म्हणजे आम्ही जिकडे जावयाचे तीकडील बेत राखु याजकरीता राजश्री बापुजी खंडेराव याजला पूर्वीच मार्गस्त केले असेल नसल्यास हे पत्र पावल्यावर पाठवून दयावे म्हणजे सर्व गोष्टीचा बंदोबस्त येथील आमचा खर्जवेचाचा घडेल त्याजखेरीज आम्ही कोणासी बोलावे इतकीयावर वडीलाचे मर्जीस येईल त्याप्रमाणे उत्तर पाठवावे श्रीमंत राजश्री नानासाहेब यानी दीपवालीस परालाचे घेऊन येणे म्हणोन आज्ञा केली आहे. त्यास ये वीषयीची आज्ञा लेहून पाठवावी की तेथे आम्हीच आपल्या जवळ यावे. कींवा येथून करवून यावे. हे उत्तर उलगडून लीहावे नाही तर शाक भाजी विसी दादोपन्तास लिहीले होते. त्यानी आद्याप एक देठ देखील पाठविला नाही. औसे नसावे श्रीमंत रा. नानासाहेब याणी सांगीतले आहे कीं सौ. मातुश्री ताईसाहेब व रा. भाळसाहेब यांची रवानगी करवून पळशीस आणवून घ्यावी आणी बोलील्या अन्वये तीकडे आणण्याचा बेत आपला करावा वीजयादशमीस मुहुर्त काडोन पलसींस रवाना करावे याप्रमाणे आहे. आमची व भाऊसाहेबाची भेट पळसीस जाली यावर आम्ही आज्ञेप्रमाणे जावयाचे करू नीसंशये नानाचे बोलणे आहे की मी याप्रसंगी असता उपसर्ग काडीचा लागू देणास नाही या पत्राचे उत्तर ये तोपर्यंत आपल्याकडे नेत्र लागले आहेत. जलद उत्तर आले पाहीजे. आपण लीहीले की नागोजी रोकडे व बाबाजीपंत दामले यासी रवाना केले. त्यासी त्याची व आमची भेट जाहलीच नाही. आम्ही अगोदरच पळसीचे जलदी करता निघोन आलो. आपले जाणे जाले. त्या दिवसापासोन बावाजी पंताची आमची भेट जाली नाही बाबाजीपंत याजपासी रुपये चीटनीस याजला

देवावयास स्वाधीन केले होते. हे पंत मजकूर यांनी अदयाप चिटणीसास पावते केले नाहीत. तो ग्रहस्थ आम्हास लाजवुन कामास हीसका पडतो तो विस्तार पत्री काय ल्याहावा. आम्ही काल दोन प्रहरी दाखल पलशीस जालो. तो सायंकाळी गुरेही सुटून आली. वडीलास कलावे. मजजवळून चाकरीस अन्तर होणार नाही. दाभाडे यांनी गुरे सोडून दिली. मग आपण धरली. गुंता -- -- आले म्हणजे ताकीद पत्रे घेऊन जाऊ नाहीं तरी आपले उत्तर येईल त्याप्रमाणे करू बहुत काय लिहीणे हे विज्ञापना. राजेश्री बापुजीपंत पोतनीस स्वामीचे शेवेसी सा. नमस्कार विनंती परीसोन लोभ कीजें. श्रीमंत राजेश्री आबाजीस लिहीले आहे. त्यावरून सर्व कलले आपली मार्गप्रतिक्षा बहुत करीत आहोत. आपण आलींया खेरीज खानगी होत नाही. हरऐक विषयी बंदोबस्त कामकाजाचा वगैरे जाला पाहीजे त्यास पत्र पावताच सत्वर निघोन यावे. बापू लवकर आले पाहीजे. बहुत काय लिहीने. हे विनंती.

---

लेखांक १९ श्री जानेवारी १७९८

विज्ञापना इकडील वर्तमान तर मुखे त्रिवर्ग क्षेमरूप आनंदमये आहेत. रा. दादा गद्रे आपले घरींच होते. त्यांचे माडीवर एक ग्रहस्त होता. त्याने माडीवर बंदूक वा बार काहाडला. त्या वेळेस श्रीमंत त्रिवर्ग बंधु आपल्या वाडयात बंगल्यावर कारखाना चालत होता तेथे खुले बसले होते त्या बाराची गोळी श्रीमंता शेजारी होऊन गेली तो शोध श्रीमंतांनी केला गोळी कोणीकडून आली शोध करिता गद्रे यांचे माडीवरून गोळी आली ते गोळी वाडयांत श्रीमंताचे घोडयास लागली त्यावरून तो दोशी गद्रे यांचे पदरी घातला. ज्याने बार केला आहे तोही शोध करोन धरान पहा-यात ठेवला आहे. त्याजलाही पुरसीस होत आहे. येणेप्रमाणे गद्रे याजकडे दुसरे श्रीमंताची स्वारी बागांत भोजनास गेली. मागे सरकारची भांडी रूपयाची बाहग्यात जात होती. समागमे दोन चार माणसेही होती. त्यास त्या बाहग्याच्या मार्गात चोरांनी लुटले त्यांपैकी दोनचार धरले बेरड त्यानी धोंडोपन्त नित्सुरे यांचे नाव घेतले व शोध पाहता काही भांडी व तभाव नित्सुरे यांच्या घरातही मुद्दा लागला आहे. त्याजकडे ही गोष्ट लागू जाली तिसरें आबा सेलूकर याजकडे प्रतिनिधीब÷ल जाबसाल पुरतेपणी लागू जाला आहे. चवथे बजाबा सोरोळकर यांजकडे मानकरी याचा पेच लागू जाला कारण कीं मानकरी दरोबस्त न्हावी याचे पंगतीस जेवले. त्यामधेस्तीत बज्याबा होते हा दोशी त्याजकडे सीध्द जाला.

याप्रमाणे आहे. ऐसे चार दीशी चवघाकडे सबळ ठेविले. सैवेसी श्रुत होये. हे विज्ञप्ती.

---

टीप :- नाना फडणवीसास वानवडीस कर्नल फिलीजने शिंद्यामार्फत कैद केल्यावर पुण्यातील त्यांचे वतीने कारभारी सर्व कैद केले असे वासुदेव शास्त्री खरे नाना फडणीसाचे चरित्रात म्हणतात. त्यात गदरे, धोंडोपंत नित्सुरे, आबा सेलूकर, बज्याबा सिरवलकर ही नावेही त्यांनी दिली आहेत.सदर पत्रांत त्यांचेवर कोणते आरोप ठेवले गेले होते. ही नवीन माहिती मिळत आहे. मुळ पत्रावर तारीख नाही. पण नानास कैद ३१ डिसेंबर १७९७ ला केले त्यानंतर लवकरच वरील घटना घडली असावी नानास कैद करून घाटग्यांनी पुण्यांत धरपकड सुरू करतांच नानांचे पक्षाचे काही लोकांनी घरांतून व रस्त्यांतुन लढाया केल्या व कांही पळून गेले. शहरभर दंगल व रक्तपात जाले. ५ जानेवारी १७९८ ला रघूपत खंडेराव पालखीत बसून घरी जात असता पन्नास माणसांनी भोई व खाशांचे तुकडे केले. (होळकरशाहीचे इतिहासाची साधने व नाना फडणीसाचे चरीत्र व ग्रँट डफची बखर यातून ही माहीती दिली आहे.)

---

लेखांक २० श्री माघ व // ७ शके १७१९
ता // छ २० साबान १२०७ ७ फेब्रुवारी १७९८

राजश्रीया वीराजीत राजमान्य राजश्री आबाजीपंत दाजीस्वामीचे सैवेसी पो // नरसो नुकदेव सा. नमस्कार वीनंती उपरी येथील कुशल लिहीत आसावे वीशेष राजश्री रामराव आबाजी पलसीवर याजकडील करजगावावर नुर महमंद यानी स्वारी करून नख्त चार हजार रुपये खंडणी घेतली ठाण्यातील घोडी दहा बारा व गावातील गाडे वगैरे चीजवस्तु नेली ती माघारे देणे म्हणोन रा. मल्हारपंत भाऊ याचे पत्र रामराव नानाजी याजबरोबर पो / आहेत व आम्हीही तुम्हास लिहीले होते परन्तु नुर महंमद यास सांगोन अद्याप उलगडा जाला नाही ऐसे नसावे. आबाजी पुत्राचे व्रतबंधाकरता पलसीस गेले आहेत. त्यास तुम्हाकडून पलसी वगैरे त्याजकडील गाव गंगातीरी आहेत तेथे तीलतुल्य उपद्रव देऊ नये. पेशजी लिहल्याप्रमाणे नुरमहमद यास ताकीद करून करजगावचा जप्त ऐवज व घोडी वगैरे काय घेतले आसेल ते रामराव नानाजी याचे विद्यमाने माघारी , देवणे बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनंती.

---

लेखांक २१ श्री १७१९ शके
१७९८ मार्च ९

श्रीमंत महाराज राजश्री आबाजी स्वामीचे सेवेसी अर्जदास्त अर्जदार बंदगी बंदेशेरीकर मोकादम मौजे सारोले भांडी अर्ज विनंती विज्ञापना येथील कुशल ता // फाल्गुन वद्य ७ सुकीरवार पावेतो साहेबाचे पुन्येचे योगे करून येथास्तत आसे विशेष आमचे वर्तमान रा. विठल नरसिव्ह याचे ठाणे फाल्गुन शु.//१५ या परगन्यातून निघून धोडपेस गेले आता त्यांचे कोणी परगन्यात नाही परंतु रा. पांडोजी माहाले यानी चिठया केल्या आहेत की सरकारातून दीगरगावची जप्ती आम्हाकडे सांगीतली आहे. त्यास पटील कुलकर्णी शंभर रूपये पोते घेऊन हुजुर भेटीस येणे त्यास त्या प्याद्यानी मनस्वी गावांत दंगा करून दोघे गडी घेऊन किल्यावर चांदवडच्या गेले म्हणून सेवेसी विनंती लिहिली जाते कीं याचा बंदोबस्त साहेबी केली पाहीजे मनाया सरकारच्या साहेबी पेशजीच आणील्या आहेत परंतु त्या गोविंदराव बाबापाशी आहेत ते पारोल्यास हुताशनीकरता घरास गेले आहेत. त्यास त्याजला साहेबी ताकीद करून मनाया घेऊन व आपलेही पत्र किलेदारास निक्षुन घ्यावे की गावास उपद्रव न लागे ते साहेबी केले पाहीजे येथील वर्तमान तर रा. विठ्ठल नरसिंह यानी खंडणी पटे दाशे रूपये करून ईस्ताटयाचा पैका घेतला आपल्याकडे वसुल गेले तो देखील मुजरा दील्हा नाही खंडही गावास मनस्वी पडला त्याने गावचा खराबा बहुत जाला लोकास अन्नदेखील समयास राहीले नाही पाच चारसे कर्जही पांढरीस जाले. वस्ती उजाड देखील होत होती ते साहेबाचे आश्रे करीता राहीली तो पांडोजी माहाले याचा उपद्रव भारी लागु लागला. याजकरीता वस्ती खुलखुला जाली आहे. याज करीता साहेबी गोविंदराव बाबास येथें पाठवून कीलेदाराचा बंदोबस्त होऊन आमचा उपद्रव तुटे तो अर्थ केला पाहीजे बंदगी सराशण होये हे अर्जदास्त.

लेखांक २२ श्री १७२०जेष्ठ व //३
१७९८ जून १

राजश्री कामदार प्री/ बर्डावद गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री. दौलतराव सीदे दंडवत सूमा समान तीसैन मया व आलफ प्रे // मजुरावर फौजेचे खर्चाबदल वरात केली बीगर रुपये.

५००० पांडूरंग नारायण
५००० बलवंतराव सदासीव राघो गंगाधर
३००० राघो गंगाधर
२००० गुंडी रामचंद्र
३००० सीवराम पांडुरंग
१५०० बखत सींग
१५०० सीवराम नीबाजी
२००० रामराव पुंडलीक

२००० धोंडी रामचंद्र
१००० विश्राम नीळकंठ
२००० रघुनाथ गोपाल सीलेदार
१००० निरंजेनसिंग
१००० विठ्ठल लक्ष्मण
---------
३००००

एकुण तीस हजाराची वरात तुम्हावर केली आहे तर मशारनीले आदा करणे कबज घेणे याच्या कामास आठ स्वार पा // आहेत. यासी रोजीनाची याद करून दिल्ही आहे त्याप्रमाणे देत जाणे जाणीजे छ १२ माहे जिल्हेज बहुत काय लिहीणे हे विनंती.

---

लेखांक २३ श्री (पहीले पान गहाळ )

.. .. .. .. ..ल्या स्वारावर टाकल्या दोन स्वार जखमी झाले. मुकाटयाच नदीपार उत्तर तीरास गेले, मौजे येल्हवडे येथे छबीना पठाणाकडील स्वार पांचसे त्याजला बातमी कळविली. काही उंट छकडे मांजरीवर स्वस्त मुकाम आहेत. दोन स्वार आमचे जखमी केले. छबीनीयातील लष्कर तीनसे कांबीस मध्यरात्री गेले. पांच पंचवीस गारदी पहारेकरी ठार झाले. दीडसे उंटे घेऊन सूर्योदयी पठाणापासी आले. कंपूचे छकडे वैरणीसुध्दा दग्ध केले. सूर्योदयी वर्तमान खाशाला कलले. छ. ५ रोजी खाशाकडील छबीना दोन हजार स्वार संगमाखाली बागबेटातील त्याचे पूर्वेस राहून रात्रीत बेलदार जमा करुन नदीची दरड दक्षिण तीराची खणून मार्ग तोफाचे केला. उत्तर तीरी दरड हलकी ती खणावी तशात छबीना रावसाहेबाचा पीराच्या देवळापासी चाहूल कलली स्वार आले. गोळया वाजविल्या. बेलदार कामासाठी उतरुन नदी दक्षिणतीरावर आले.प्रात:काळी बक्षीस वर्तमान कळला.आगळी झाली. मार्ग केला. गोष्ट खोटी. श्रीमंत लोभाच्या गोष्टी सांगतात कार्य झाले.आपलया मार्गाप्रमाणे आचार करितात.आता श्रीमंतांचे ऐकू नये जलदी करावी. घोडे घालावे. यात येश देणार पाटलाचे पाय आहेत. श्रीमंतांकडे बक्षी पठाणे येऊन रावसाहेबास रात्रीचा भाव कळविला.समस्त तयार होऊन नदीच्या उत्तरतीरावर आले.तो मार्ग खणून जलमय केला. येळवडी याच्या डोंगरावर उभे राहून दगडाचा ढुडा घातला. तोफा तेथे ठेऊन या मार्गास उपद्रव देऊ छ.४ रोजी येजमान साहेब बापू आनंदराव मंडळी दरखदार पाच सात आसाम्या रावसाहेबांचे दर्शनास येतो. चिरंजीव बालाजीपंतांस चिठ्ठी लिहीली विनंती कर्णे आज्ञा जाली. व्यतिपात दहा घटिका पलीकडे लागती, स्वारी येण्याची जलदी असावी. चिठ्ठी पाठविणे आज्ञा लिहीली. चार चिठ्ठया मशारनिनिलेनी जलद स्वारी यावी. (फाटले) ऐशा पाठविल्या. शेवटी बालाजीपंत आपण गेले तेव्हा नववीच्या अमळात खासे आले. साठेबाजारखाली रावसाहेब बसले. रामराम जाला. मंडळीचा नमस्कार जाला. पाव घटका गेली. बाळासाहेब बापू याजला नातू घेऊन राहुटी खलबताची तेथे गेला. रावसाहेब मागून उठले. दिवाण दरखदार आनंदराव वगैरे साटेवाजा खशली बसले.दोन घटका रावसाहेब नातु उभयंता होळकर बोलणे झशले.पायावर हात ठेविले.लक्ष चरणापासी आहे. त्यांचे उत्तर जाले. कलयाण होणे यातच आहे. नंतर दिवाण दरखदार आनंदराव बोलाविले.विडे पानदाने दिधले. बाहेर डेरियात आले. लोकांचा रामराम जाला. आज्ञा जाली. यांनी विनंती केली, बाईची भेटी प्रथम घेणे. आज व्यतिपात लागला. सरकार कारकून येजमानाकडील कारकुण उभयता बाईकडे पाठविले. आज कुयोग निमित्त आले नाही. उदयीक येऊ. घरास आले तो पठाणाकडील धरणे आले. शिंद्यांकडील आठ लक्ष रुपये मागणेकडे आले. त्यांत गुंतले. बाईकडे जाणे राहिले. छ ५ रोजी दादा गर्दे याजकडे घास दाण्याची बाकी येणे. पंचवीस स्वार मोगल पाठविले गर्दे सरकार वाड्यात गेले. गाठ घडू दिली

नाही. स्वार वाडा घेरून आहेत. गर्दे याजला एक खोली राहाण्यास सरकार वाडयात दिधली. छ ६ रोजी रावसाहेब उदास जाले. पठाण बक्षी प्राण खातात. हल्ला करावा. श्रीमंत दम धरा म्हणतात. आता बाईचा सोबती होतो. कुटब खाजागत जामदारखाना जुन्नरास पाठविती. ऐसे श्रीमंतास सांगून पाहतो. छ ६ रोजी कुंजीर श्रीमंतांकडे पाठविला. एक निक्षून सांगणे त्यांनी उचर केले. प्रहर दिवसात रायाजी पाटील, रामजी पाटील यादी भास्कर घाडगा, देशमुख पाठविले. कुजीर पुढे आला. दीड प्रहर दिवस येताच सोद्याकडील त्रीवर्ग आले. रायाजी पाटील, घाडगा आले नाहीत. कुंजीर रागे भरला. बोलता एक करता एक. श्रीमंन्तानी काळे, चक्रदेव सेलूकर, शिद्याच्या कारभा-यासी बोलावयास बसविले. श्रीमंत उभयेता लक्ष्मणशास्त्री तेलंग, वैद्य, नाना फडणीसाचा त्याच्या घरी भोजनास गेले. नानाकडील मजकुर सोंद्यांनी किलीयात मुक्त केला त्यांचे बोलणे आमचें लोक आरब व कारकुन भाऊ कापशा शागीर्द पेशा येथे आणावे. मग किलीयाबाहेर निघोण छ. ५ रोजीं घाडगे यानी आरजवी केली सातसे अरब दोनसे जिलेबी लोक सात कारकुन भाऊ कापशा मण्डळी नगरास पाठविले. तें येणार वार्ता बोलतात. पुढे काय घडण्यात येईल ते कलेल. श्रीमन्ताची मर्जी समेटी करावी यात दौलत जगती श्रम जात नाही. सर्व बचाव होईल होणार चुकत नाही शहर निमे उजाड झाले. मार्गात बहूत लुटले जातात. ईश्वर क्षोभ खरा आहे. येजमानास सेवा पडली तरी अनुकुल काहींच नाही. श्रीमल्हारी रक्षील. स्वामीनी लुगडी वीस अठ्ठवीस घेतली. शिंपी पैका मागतो. पंत म्हणाले येजमान स्वारीस सुचना लिहिणें म्हणून विनंती लिहिली आहे. छ. मीती शूक्रवार त्रीतीये प्रहरी रायाजी पाटील येकटा आला. नीमंतासी चार घटका नीराळे बोलणे जाले. नंतर रामजी पाटील पाटील, यादोराव दाजी देशमुख बोलविले. अस्तमित पर्यन्त बोलत बसले. दौलतराव म्हणतात सांगाल ते ऐकतो. परंतु ती स्त्री व कारभारी देत नाहीं, पुढे रात्र शुक्रवार लष्करात माघारा गेले (फाटले) बाईकडील बुनगे आळंदीहुन सात घटकेत आले. नंतर बाईचे कुच जाले. बुनगे खडकीच्या उत्तरेस नदीच्या दक्षिणतीरी रावसाहेबाच्या उजवे बाजूस ठेवीले. सडी फौज वाकडे याच्या फौजेपासी येजमानाच्या लष्कराच्या पाठीमागे नदी दक्षेणतीरी सर्व आले लढाई करू म्हणतात. काल कत्तलची रात्र येऊण पोहोचली. उदयीक काय घडल कळत नाही. इंग्रेज वकील कलकच्याच्या रावसाहेबी, नादी लाविला आहे. दहा लक्षाची जागीर मागाल तिकडे देऊ जानसाहेब आपल्या मकाणास आणिला. एक प्रहर बोंलणे जाले. नन्तर दुर्जेण साहेबांकडे तो गेला. प्रसंगास कोणती गोष्ट निमित्तास येईल ते खरें बाई म्हणती कारभारी व ती सावित्री घेंऊ मग पुढे दुसरे कार्य करूं राजश्री मोरोबादादास आणावयासी विश्वासराव चिंतामणी पागा तिनसे स्वार बाबडयांघाटे पाठविले आहेत (फाटले) भाऊ मुक्त केला. परगणे वाईहून रहिमतपुरास गेला. पांच सातसे स्वार जमाव जाला. मिरजेस जावे. करवीरकर

राज्यास पायबंद द्यावा बेतात आहे, लखबा सैणवई येतो वार्ता बोलतात. राजेक्रांती समाप्तीचा पाहरा आहे. जमाखर्च श्रीसांबजी करीतो. मर्जी स्वामींची चंद्राची कोर बाकी काय करील ते सत्य लोभाची विधी करावी हे विज्ञापना

रा. छोटे साहेबास सा. नमस्कार सेवकास उत्तम बाण प्रसाद पाठवावा.

टीप - बाजीराव साहेबांनी हे दोन इंग्रज फितुर करण्याचा प्रयत्न केला याकामी घोरपडे मध्यस्थ यास ५० हजार रूपये खर्चास दिले पण हाच घोरपडे एलफीस्टनचा हेर होता असे क्रॉफर्ड लिहतात (अवर ट्रबल्स अरांउंड पूनामधे)

---

लेखांक २४ श्री १७२१ जेष्ठ शु. // ९

१७ जुलै १७९८

श्रीमंत राजश्री नाना फडणीस नगरातुन बाहेर बागात इकडे येण्याकरता आहेत पाय सुजले आहेत शौचाचा उपद्रव जाला आहे गाढवे त्याजला आणावयास गेले आहेत. त्यासही तेथे काही खोसा उत्पन्न होऊन तीन जखमा लागल्या आहेत असी उपश्रुत नीघाली जाहे सत्य मीथ्या आपल्यापासोन सानीध समजन्यात आलें आसेल (असाच मजकुर दुस-या एका पत्रांत आहे)

श्रीमंत राजश्री आबाजी स्वामीचे सेवेसी सेवक कृष्णाजी मुकुंद सा// नमस्कार येथील कुशल ता छ ७ मोहर्रम जाणून मु.// लस्कर नजीक पुणे येथों कुशलरूप आसो विशेष रा. खंडोपंत आबानी लीहिले त्यावरून वर्तमान आहे येथील प्रकार तरी आहे तसाच आहे.

---

टीप - एक कोट रुपये घेण्याचे ठरवून शिंद्यांनी नानांची सुटका केली. सुटताना दहा लाख रुपये घेतले. नाना पुन्हा कारभारावर आल्यावर पंधरा लाख घेतले व नानांचे मृत्यूनंतर बाकीच्या वसुली करतां त्यांची जहागीर शिंद्यांनी जप्त केली. (नाना फडणीसाचे चरित्र व ग्रँट डफ पान ३३७ वरून )

लेखांक २५ श्री १७२१ जेष्ठ शु. // ९
१७ जुलै १७९८

स्वामीचे शेवेसी आनंत कोटी सीरसा// नमस्कार विनंती विज्ञापना छ ६ रोज शुक्रवार प्रहर रात्र माहे सुहुर मु.// पुणे श्रीमंतांनी नीत्य नेम केला उपरात लोकाचा रोजमुरा देणे पाच लाख हवाला काले यानी घेतला तीन लक्ष आदा पुर्वी दीधला दोन लक्ष तुर्त देणे वायेदा सरला काळे सरकार वाडीयांत लोकानी धर्णे बसवीले चक्रदेव तोंड चुकाउण आरसे माहालात श्रीमंतापासी रांहीला त्रीतीये प्रहरी श्रीमंतानी फराळ केला मंडळी उपासी भोजन केले नाही आनवले बोलावून लक्ष रुपये तुर्त हवाला घेणे त्यानी विनंती केली ऐवज मिलत नाही लोक अबरू घेती ऐवज लाऊण द्याल तरी जीमा करीती नख्त काही जव्हायेर बानवाले याजला देऊन अस्तमीती काळे भोजनास घरास गेले बाया वाडीयातून काढीती बेत रावसाहेबासमागमे क्रीया शफथ पर्वतीपासी तीन दिवस जाले गोष्टी घडत नाही चिठी रावसाहेबाची बोललां ते ही सरम पुढे गोड दिसल ते कर्णे तयारी करतात मंत्र्याची बातमी -- -- -- बसली बाई कहाडली म्हणजे पलटणे पाठवून कजीया करावा नीमीत्य आवकाश पाहून पाठवावी बेत आहे धडले तरी शहर मातीत जाते रावसाहेबाची मर्जी स्वहस्ते शहर लुटावे लोक बहुत आज पलतात मंत्र्याची बातमी क्षेणाक्षेणी पुढे भारी दिसते लोकांच्या नाकात काडया तलबेकरीता चक्रदेव घालीतात मंत्र्याची मर्जी वाड्यातच मुख्यानी असावे बाहेर गेले त्याचे परिपात्य करू काय घडल कलत नाही -- -- -- सीदे मंत्र्याकडे गेले चार घटका खलबत जाले वस्त्रे कंठी सीरपेच दीधला वीडे देऊन मर्जी प्रसन्न केली कारभारी कचे वर्तमान आपणास सांगतील पुढे मसलत काय कर्णे ते करावी सदासीव मल्हार रायाजी पाटील घाटगे गाढवे माघे बोलावयास राहून स्वारी सींदे डे-यास आले कुंजीर नानास भेटले श्रीमंताचा नमस्कार सांगीतला आपण येतात म्हणऊन नेत्र मार्गाकडे बाबासाहेबाचे लागले आहेत उत्तर त्यांचे आमचे लक्ष त्यांचे चरणी असेल त्याप्रमाणे लोभ धणी कर्तील सावसर्गीक लोभ राहु देत नाहीत आता फुकट नाश करतात बाई बाहेर नेतात तेव्हा सींदे अनर्थ कर्तील शहर लुटल अन्न कोण्हास मिळणार नाही सर्व नाश होईल आमचा निरोप सांगावा स्वस्त स्थळी असावे शहर जंगल लबाडांचे पारपत्य येथाकाळी होईल दोन मास धीर धरला आता जलदी कराल तरी नुकसान अपकिर्तीस पार नाही. दमाखाली सर्व पार पडल. पठाणे रावसाहेबा सर्वनाश करतात चीठी ली.// कुंजीरानी वर्तमान ली.// पो // शहरात नाकेबंदी नाकझारी अलीकडे करतात. पलटणे सरकार वाडयावर येतात बातमी आली. काय घडल कलत नाही साता-याचे स्वार सातसे पुढे चालून आले. रास्ते

परशरामभाऊ याच्या लीकाची गांठ पडली ते स्वार सर्व लूटले घीडी घेतली हत्यारे वस्त्रे घेऊन जीवंत सीडीले. दीनसे जास्त ठार मारले गेले बातमी वींचूरकरांची आली.कुंजीर घाटगे याचे घरी राहीले सीबत्यास मंत्र्यांनी सांगतले नीरेचा पुल तीडा तीकडे जाणे येणे मार्ग स्वस्त राहेल दीन पलटणे तीकडे नेमली.ते पाचसे स्वार समागमे मागतात. पठान याचे लीक तीकडे मार्गात लढाई पडल लीक पागेचे स्वार त्यांचे नाश आहे.-----रात्रीत काय घडल कलत नाही. पुणे बहुत उज्याड जाले. लीक मनस्वी पलतात. श्रीसांबजी काय करीती समजत नाही. काल कठीण आला. सराफा सर्व लपला पाचा रुपये जमाखर्च चालत नाही. वैरण आठ-दहा पुढे -- -- -- -- -- घीडी मर्तील श्रीमंत रावसाहेबाकडे आज प्रातःकाळी राजश्री गणपतरावजी पाराजीपंत बाबा आबाजी खंडेराव गेले चार घटका बीलणे कीरकील खलबती जाले. रावजीचा घीडा जरदा खासा सरंजामसुधा नजर रावसाहेबास कैला फैरूण पाहुन मर्जी खुष जाली. बक्षी वगैरे लीक रावसाहेबाकडे आले. लढाई करावी बेत बीलतात. पठाण याणी च्यार सावकार शहरातील उचलून नेले. रावजी आप्पाजी नि // गायकवाड वरात पठाणाची जाली. पन्नास स्वार बसवीले. खर्च मनस्वी घेतात. पुढे चांगला काल दिसत नाही लीभ कीजे हे विज्ञापना.

---

लेखांक २६ श्री २२ सप्टेंबर १७९८

पौ छ ११ माहे रबीलाखर उजनी

सु शके १७२० भाद्रपद मास सन १२०८

स्वामीचे शेवेसीं उभयता सेवकांचे अनंत कीटी सीरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना (कुशल मजकूर, सीडला) रामजी पाटील श्रीमताकडे आला आज पुष्य नक्षत्रे आपण मंत्र्यास भेटावे गीष्ट मान्ये केली रामाजी पाटील माघारा मंत्र्याकडे गेला श्रीमंत येतात बेत सांगीतला गीपाळ काल्यास जाणे राहीले मार्ग श्रीमंताचा लक्षीत पंतप्रधान यानी चिठी रावसाहेबाकडे पाठविली आपण कुच करून मीतीबागांत येणे मंत्र्याच्या भेटीस जावे लागते आज्ञा येईल त्याप्रमाणे जाणे घडल रावसाहेबास संकट पडले उत्तर काय देऊ आपन फसतात मजला बुडवितात मंत्र्याच्या मनात काळकुट या प्राण्यास कलत नाही प्रहर रात्र प्रथम जाली तो परीयंत उत्तर चीठींचे लिहले नाही यानी स्वारी तयार करून उत्तराचा मार्ग लक्षीत राहीले स्वारी जाणे तहकुब जाली रामजी पाटील रात्रीत आला. मंत्री वाट पहात बसले स्वारी न आली

आमच्या पतीस दोष लागला श्रीमंतानी त्यासी शफत पूर्वक उत्तर केले छ २६ रोज मंद वारी प्रथम चार घटका जाउन पुढे कन्यालग्न त्याजला आम्हास चंद्रबळ सारखे जरूर येतो त्या प्र // छ मजकूर घडले वर्तमान कोण्हास न समजतां भेटी मंत्र्याची घेतली नंतर इंगरजास  समजले त्यांजला राग आला छ २७ रोजी गुलटेकडीपासी बाग आंबराई कंपुवाले यानी तोडून नाश केला ते दिवसी बाबा फडके नजरबंदीत ते श्रीमंतानी मुक्त करून आपल्या घरास जाणे आज्ञा केली मंत्र्यास सांगून पाठवीले बाबा फडके आपल्या सांगण्याप्रमाणे घरास पो// छ २८ रोजी इंगरजानी पलटणे तोफा लायनी तयार करून पुणीयाचे बागमले बागाईत मालोजी राजा घोरपडे याच्या वाडीयाच्या आसपास सर्व कही केली दोन तीन वाडया पुण्याच्या लुटल्या सेकडो झाड आंबे तोडले जीनस वेल वाख भाजी फळे नेली श्रीमंतास कलले रायाजी पाटील रामजी बोलावले रायाजी आले रामजी आले नाहीत पोटात कल जाली निमित्य येणे घडले नाही. रायाजी पाटलास आज्ञा केली छ २५ रोजी बायांकडे समेटीस जातो बेत केला. समाभमे सरंजाम साहीत्य नेमीले अद्यापी जात नाहीत हे काय समेटी करीता आज पुणीयाचे बाग मले इंग्रजांनी लूटले कारण काय बोलतां येक करीता अणेक हे चांगले नाही कजीया तुम्ही वाढविता बायाकडे जातो. रामजी पाटील बोलूण गेले आता पोटाचा बहाणा करीतां पोट दुखा अथवा राहो बोलल्या प्र // सरकार काम करावे देश नाश जाला. पुढे पुणे लुटणार ऐसे लक्षण दीसते. रायाजी पा // ख:पा जाले रामजी कडे गेले त्यांनी खाशास सांगीतले कंपूवाले लबाडी करितात पुणीयाचे बागामुळे आंबराई तोडली. हूकूम कोन्हाचा दौलतरायांनी ताकीद केली. छ मजकूरी बोभाट आला नाही. बायाकडे जातात. बाहेर बि-हाडे घेतली आहेत. काय घडल कलत नाही. बोटवाला पालकर वकील कलकतेवाला यासी पूर्वी मोहरमात रावसाहेब बोलले. कंपूवाले लोभात घेणे. दाहा लक्षाची जागीर कोकणात गुजराथ प्रांती देऊ. मंत्री आपण गुप्तरूपे श्रीमंत एक जाले अमच्या विच्यारे समेटी न केली म्हणवन जबरी दाखवावी. या प्र // इंग्रेजाचा बेत आहे घडता काय घडल कलत नाही. मंत्री त्यांच्या लोभात आहे. श्रीमंत असावे. रावसाहेब नसावे. अंत:करणात गोष्ट आहे. तेव्हा मंत्री धणी नांदणे कठीण आहे. आबाजी हे राजे सुखात नांदत नाही. काळ बुडता आला. सर्व बुध्दी भ्रष्ट जाले. पुढे कल्याण तरी रयेतीस पालावे नांदवावे हें स्वप्नी नाही. सर्व बुडाले. बुडतात चीन्ह चांगले उर्जीताचे नाही. स्वामींचे पत्र स्वदस्तुर श्रा //व.// १३ पावले.

टीप:- बाजीराव नाना फडणीसास पुन्हा कारभारावर घेतात इंग्रजांना विचारीत नाहीत यांचा इंग्रजास राग येतो.

पूर्ण तिथी अमावश्यास बहुत आनंद जाला. शरीर अशेक्त जाले. तेजवळ लोकांच्या देण्याची काळजी तिकडे गेले आता हीमत धराल तरी सर्व जमल देणे जीवापेक्षा भारी जाले सर्व श्रीसांब पार पाडील चींता हरण श्रीसांब आहेत लोभाची व्रीध्दी करावी हे विज्ञापना.

---

लेखांक २७ श्री

भाद्रपद शु/ १३ शके १७२० पी छ ११ माहे रबीलाखर

२२ सप्टेंबर उज्जेन

श्रीमंत राजश्री आबाजी स्वामींचे शेवेसी विनंती सेवक आपाजी जाखदेव व दादी भैराळ विशेष

छ ८ रोज बुधवार प्रात:काली श्रीमंतांनी स्वारी तयार करोन चींचवडचे देव प्रतीनिधीचे येथे गेले तेथ जाऊन देवाचे दर्शन घेऊन देवांनी उभयंता श्रीमंतास पैठणी हीरवी तीवट व सेले वस्त्रे देऊन वाटे लावले. स्वारी निघोन वाडयात आली.तो दौलत सीदे याजकडुन रामजी पाटील आले त्याचे बोलणे पडल की बक्षी व पठान कुच करोन लोहगावास गेले. उचम जाले भेटीची समारंभ करवीला पाहिजे.श्रीमंत राजश्री रावसाहेबांचे व आमचे सख्यत्व करुन घ्यावे या प्रा- छ ७ रोजी ठरवून छ ८ रोजी बुधवारी त्रीतीये प्रहरी श्रीमंतांनी स्वारी तयार करवीली.श्रीमंत राजश्री रावसाहेब व बाळासाहेब याची स्वारीची तयारी करवून राजश्री दौलतराव सीदे व नाना फडणीस यांची स्वारी तयार करवून कपु व तमाम फौज तयार जगचे जागी तयार मात्र करवून श्री पर्वतीकडे हीराबागानजीक आंबराईत तयार येऊन उभे राहिले,मागील चार घटका दीवस राहतानी प्रथम राजश्री दौलतराव यांची भेट जाली आधी आपले येजमानाची (फाटले) श्रीमंत व रावसाहेब (फाटले) जाली श्रीमंत त्रीवर्गास आदब कुर्णीसा केलया हात जोडून पुढे उभे राहिले श्रीमंतांनी सींदयास आज्ञा केलीजे घोडयावर बसावे तदनंतर पाठीमागून राजश्री नाना भेटले तेही अनुक्रमा प्रमाने भेटुन सन्मुख नजरा नजर मात्र जाली पालखीत जाऊन.

---

टीप:- नाना फडणीस कैदेतून नगरहून आल्यावर शिंदयाच्या छावणीतच रहात होते. निजाम व इंग्रज माझ्ा संरक्षणाची हमी घेत असतील तर मी कारभारावर येते अशी त्यांची अट होती.पण

बाजीरावाने समक्ष भेटून त्याचे मत वळवून अटी मागे घ्यावयास लावून शहरात हवेलीत राहावयास यैण्याचे कबूल करून घेतले. नाना बसले उभयैता श्रीमंताची स्वारी गावात गेली समुदाय बहुत जमला.परंतु गवगवा काही पडला नाही. सीदे व नाना व रावसाहेब व हीळकर तमाम आपापले गीटस गेले आता पुढे बक्षी व पठान यांची व दौलतराव याची भेटी करवीणार आहेत व बायांच्या व त्यांच्या भेटी सत्वर हीणार आहेत.सीदे श्रीमंतांच्या भेटीस आले ते समई गुलटेकडी पासी एक खांबी अंबारी मौराची हौती ते मौडली तेव्हा ती हुची स्वारीतून माघारी लावून दीलहा आसी आपन प्रसंगी नाही त्यामुळे आम्हास काळजी वाटली कलावे राजश्री नाना आपले हवेलीस यैऊन राहणार आहेत. पुढे घडून यैईल ते खरे --- (पुढील मजकूर खाजगी) (मराठ्यांची बखर ग्रँटडफ पान ३३७)

---

लेखांक २८ श्री १०ऑकटोबर १७१८

आश्विन शु.//१ शके १७२०

वडीलाचे शेवेसी चरणी मस्तक ठेऊन सा.//नमस्कार विज्ञापना यैथील वर्तमान आश्विन शु.१ बुधवार पर्यंत यथस्थित असे विशेष रा.खंडेराव कृष्ण याजला आज तीन घटका रात्री दीवाणगीरींची वस्त्र दिल्ही जेजौरीकराचे चिरंजीव सांगतात त्याप्रमाणे यैजमानास करणे प्राप्त रा.बापुजी हीळकर याजपाशी चिरंजीवांनी खचित केलेच हीते त्यावरून दिवाणास वस्त्रे देते समई हीगाडे माहाजन याजला उचापत ऐवजी पन्नास हजार रुपयाची मखलसीची याद केली त्यावेळेस देवावे व म्हळसाकांत पाहिजे तेव्हा बापुसाहेबांचा आक्षेप असा पडला की म्हळसाकांत म्हणजे क्रीया हीती हे नसावी असा नीग्रह पाहीन जेजुरीकरांनी त्याजला सांगितले की याप्रसंगीच हे काशास काहाडीता मसलतीने जे करणे ते करावे म्हणीन कटकट हीऊन देवावे आणी म्हळसाकांत जाली परंतु पुढील चिन्ह चांगले नाही चिरंजीव कारभारात पडीन दरखदाराचे दरख कौणाचेही न चालावे हे कृत्य आरंभिले आहे यास्तव आपण यैजमानास व बापुसाहेबास व जेजुरीकरांस व खंडेराव कृष्णास ममतापूर्वक मागील मामलत धरून पत्रे लिहावी वरकड वर्तमान तपसीलवार रा.बाबाजीच्या लिहण्यावरून ध्यानास यैईल शेवेसी श्रृत हीय हे विज्ञापना.

---

---

टीप:- हीळकरांचे दरबारी पत्रावर श्रीचे शेजारी म्हाळसाकांत व पत्राचे शेवटी देवावे ही अक्षरे दरखदार या नात्याने रामराव आप्पाजी पळशीकर यांनी लिहावी असा

अधिकार श्रीमंत अहिल्याबाईसाहेबांनी अखेरचे दिवसांत त्यांना दिला होता. या कामाबद्दल त्यांना सरकारी महालांतून शेकडा दोन रुपये घेण्याचा अधिकार होता.

---

लेखांक २९ श्री गजानन प्रसन्न

१६ ऑक्टोबर १७९८

पै छ ६ जमावल सन १२०८

आश्वीन शु// ७ शके १७२०

स्वामींचे शेवेसी सा.//नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता//छ ५ माहे जमावल पहीला प्रहर रात्र पावेतो सुखरूप आसो वीशेष येशवंत होलकर हे आज पचकणास मुकामास आहेत.देपालपूर मारून आले त्यास उदयीक बरडावदस येऊन तेथ आपला अमल बसवून उपरांतीक जाव-- जाणार म्हणून येथे वंदता आली. सबब तुम्हास सूचना लिहीली आहे तरी तुम्ही सावध राहावे तुम्ही सावध राहावे तुम्ही लवकर सावध होणे विलंब न करावा कलावे बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनंती.

---

टीप :- दौलतराव शिंदयांनी दुर्बल काशीराकडून होळकरांचे कित्येक महाल ताब्यात घेतले होते त्याच्या हातुन होळकरशाही सोडविण्यास यशवंतराव धडाडीने सुरवात करतो.

---

लेखांक ३० श्री

आज्ञाधारक गोवींदराव येशवंत सा//नमस्कार विनंती वीज्ञापना ऐसीजे इकडील वर्तमान तरी खडकवाडी येथे रा//बापु व आम्ही होतो त्यास बातमी

आली की राऊत आले गावावर मग जलदी करून सर्व नदी उतरले बापु मागे होते ते जलदी करून उडी घालीन पार आले आसी संकटे प्राप्त जाली ते आपले पुणे करून पार होऊ नीभाऊन सर्व वस्त भाव हीया करून घेऊन आले असे वर्तमान जाले परंतु करार मोठा हींमत चांगली याजमुळे सर्व गोष्ट नीभली वरकड वर्तमान तर पलसीस राऊत येऊन गाव कुसावरून चढून आत गेले आनी रानात हर कोनी धरले त्यांनी दाखवीले पाटील वगैरे ते घेऊन पलसीस आले पुढे जे होईल ते नकळे आम्ही आज स्वार होऊन जाऊ आपणास कलावे लस्कर दरबस्त गावात सीरल रसनरस काय होईल ते न कले अनीवार विचार आहे न ये तो दिवस येऊन प्राप्त जाला त्याचा मुकाम बडगावी होता तेव्हडीत बापुनी सर्व तीन्ही गावचे आबालरूध सर्वत्र पाटील वगैरे जमा करून सर्वास सांगीतले की हा समये तुम्ही गावानी हीमत धरलीयास थोडे बहुतर येतपना व गर्दी दाखवून तुम्ही आपले सर्व रक्षण करावे आम्हास तो येजमानसाहेबाची येविशी आज्ञा नाही परंतु तुम्ही भवर गावप्रमाणे भाऊ बचाव करून घेणे ते गावकरी यांनी न ऐकता पलावयाची मसलत केली दरोबस्त उठोन आम्ही कळेल तिकडे जाऊ त्यावर बापुचे म्हणने गावासी पडले की तुम्हास जाने तरी दाहापाच कोसी नीघोन जाणे नाहीतर जवल राहील्यास धरतील ते सर्व बोलले की आम्ही हाती लागत नाही तुम्ही स्वस्त असावे असी त्याची बोलनी जाली यावर ते समई बापुजी पन नीघाले मागे लस्कर येऊन गावास दाखल जाले पाटील वगैरे गुंडेकरी धरले गावात सीरून गेला वयेरन भरून कही करून केली हे वर्तमान नदी पासी खचीत लागले नदीस पानी भारी नदीखेरीज नीन्ही वाटाचे गावोगाव राऊत आडवे तेव्हा उपाये नाही असे जानून नदी उतरने प्राप्त ठरले असे वर्तमान जाले गावाची खराबी काय करतील ते नाकले गाव धरला गेला तेव्हा काय करतील ते नकले असी गत आहे हे विज्ञाप्ती.

---

लेखांक ३१ श्री

स्वामींचे शेवेसी सा.//नमस्कार विनंती उपरी
येथील कुशलता // मार्गशीर्ष शु.// ६ मकाम मजकुर विशेष आपण पत्र पाठविले पावले दोण महेने जाले येणीया करींता आज्ञा केली त्यास माझा गुंता नाही परंतु मार्गाची सुभता नाही समागम चांगला नाही यास्तव समागमाची वाट पहात आहे त्यांत बायाचा व पुत्राची बोलणी होऊन ठराव जाला कीं आठ लक्षाची जागा घ्यावी आणि बायानी स्वस्त असावें त्याजवरून हे कबूल केले परंतु जागा किल्ला पाहिजे

त्यात स्वदेशचा किला मागतात ते चिरंजीव देत नाही यामुळे आट पडीन मातोश्री कुच करीन उत्तर प्रांती चालल्या आहे जाताना मार्गात दंगा बहूत मांडला आहे गाव तमाम लुटले जातात त्यास समजूतीस रायाजी पाटील व बऱ्याबा असे जान्हार आहेत काल श्रीमंताकडे आले होते परंतु श्रीमंत रा // बाबासाहेबच्या शरीरास समाधान नाही यामुळे अस्तमान परीयेत बोलणें जाले नाहीं रात्रीं जाले असेल येथुन देशच्या खेड्यास श्रीमंत येजमान साहेबानी ताकीद पाठविली आहे कीं वसूल दकार पूर्वकाकडे न देणे हे तुम्हा माहीत आहे म्हणोन ऐकिले त्याजवरोन येजमान रा. आप्पाजी जाखदेव यास बोलले कीं याचे जाण्याचे कारण कोणते होते हे कशास गेले त्यास ज्यात येजमानाची मर्जी त्याप्रमाणें वर्तणूक करावी हे सर्व एकच आहेत देश काल वर्तमान पाहून वर्तणूक करावी ऐकीले वर्तमान ली.// आहे रागास न यावे प्रसंग येक त-हेचा आला आहे .. .. .. लिहीणे हे विनंती

---

लेखांक ३२ श्री शके १७२० आश्विन व // २

पै // छ ७ जमेदीलावल सन १२०८ २६ ऑक्टोबर १७९८

श्रीमंत राजेश्री आबाजी स्वामीचे शेवेशी

विनंती सेवक आपाजी जाखदेव व दादो भैराळ चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील क्षेम ता // आश्विन व // २ मुक्काम पुणे जाणोनी स्वकीये कुशल लेखन निरतरी पत्री असावे विशेष येसाजी गागरे मौजे खडकवाडी हे सींद्याच्या लस्करात आले फिर्यादि होऊन मसाला गावास करावा पाटील कूलकर्णी लस्करास आणावे वर्तमान नागोजी नाईक रोकडे भिवाजी गागरे याजला समजले त्यानी येसाजी मजकूर आपल्या बि-हाडास आणीला वद्य प्रतिपदा गुरुवारी सेवकास भेटला नागोजी सीवजी यानी पत्र रा // भवानीपंत बाबास लिहले आहे बाबास आज्ञा आपली असावी गावकरी कारभारी पाठवून येसाजी माघारा गावात न्यावा पाटील कुलकर्णी सर्व याच्या करीण्यास वाकफ आहेत त्या प्र // घरात समाधान करावे दिवस बहुत लबाडीचे आहेत सींद्याशाही दंगा श्री सांबजीनी आपल्यास गावास लागू न देता बचाव केला घरातील कजीया बाहेर गेलीया उपद्रव नसावा खासा स्वामी गावात आहे वाडीचा सीवार जमा करून गावापासी खले करावे भरवसा येत नाही शिंद्याच्या बायाची समेट झाली तरी उत्तम नाही तर त्याच्या पाठी फौजा पलटणी लावतील कोणीकडे जातील तिकडे फौजा फिरतील सीवार जमा करवावा रयेतीस ताकीद करावी वाडीत लोक सडे वस्ती असावीं पुढे राजीक होईल वस्तभाव दाना सर्व गावात असावा पूढे राजीक होईल नाशाचे दिवस आहेत भवानीपंत बाबास सांगूण येसाजी गागरा गावावर नांदवावा पळसीकर

लीक कुभांडी आहेत मनस्वी लबाडी करावी दुस-यास बूडवीतात लीभ किजे हे विज्ञापना.

---

लेखांक ३३ श्री २९ ऑक्टोबर १७९८

पौष // छ १९ जमेदिलावल सन १२०८ शके आश्विन व // ५१७२०

श्रीमंत राजेश्री आबाजी स्वामीचें शैवेसी -

विनंती सैवक आपाजी जाखदेव व दादी भैराळ चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील क्षेम तागायत छ १५ जमादिलावल शुक्रवार प्राथ:काली मुकाम प्रांत पुणे जाणौनी स्वकीये कुशल वर्तमान लेखन निरंतरी पत्री असावे विशेष दिवस स्वामीचे कुशल वर्तमान कलले नाहीं बहूत चिंता प्राप्त जाली अकस्मात राजश्री रामभाऊ स्वामींचे पत्र आश्विन शु//१३ मुक्काम निघीजचे आले पुर्णिमेस श्रीमांबजीच्या पुजेत जपकाळी पावले पत्र श्रीरूप दर्षन तत्काळ जाले आस्वांचे शीतळ जाली चींता रौग सर्व उडाला निरंतरी पत्री सैवकाचा परामर्ष करावा येथील वर्तमान समस्त राजे मंडळ श्रीमंत व सरदार व मंत्री मु.//रास्त्या पेठेत वानवळे याच्या हवेलीत स्वकीये मंडळी आनंदरूप आहेत धारण बाजरी -१० प्रजेन्ये नाही राजे बंद नाही समैटी भीजत भीजत हीत आहे. ई//छ. १ रीज ता.//छ. ६ रीज बुधवार छ २७ रात्री रामजी पाटील वगैरे मंडळी सींदयाच्या बायाकडे गेले छ ७ रीजी बाज्याबा सीरीळ बाया पासी राहून रायाजी खंडीपंत वर्तक माघारा आले कलम बंदी यादी आणली तपसील घाटगे वगैरे ती साईत्री हुजरे चौदा असामी स्वादीन करावी लौकांची तलब घ्यावा कारभारी जुने कामात असावे बायास दहा लक्ष जागीर बक्षीचे काम त्याजकडे त्याच्या ठायी राहून बायांचा जिमा पठाण याची ललबा घ्यावी

राजी हीऊन सैवा करील तरी सैवा घ्यावी पाच लक्ष रूपये तूर्त खर्चास पाठवावे तेव्हा कूच करू सदरहू कलमाची नीशा खातर जमा राजश्री नाना फडनीस यानी घ्यावी रायाजी पाटील वर्तक यादी घेऊन दस-याच्या दिवसी प्रथम प्रहारात आले मंत्र्यास भेटले पुढे दौलतरायाकडे गेले याही बायांचे बोलणे समजाविले त्रीतीये प्रहरी श्रीमंतांकडे आले यादी दाखविली सविस्तर बौलणे श्रुत्य केले आज्ञा श्रीमंतांची जाली नाना कर्तील ते सर्वी मान्ये करावे छ.८ रीजी दौलतरायांनी यादीवर रूकार केले रायाजी पाटील यादी मंत्र्यांकडे आला ते पाहून उत्तर केले.शाही घेतली रूकार दिलहे यातील भाव काय समजले बाणाजी सैंणव्या बौलाविला खाशास पुसावे यादीवर रूकार

स्वदस्तुर दिल्हे याजवर समैट पाहणार नाही कलमाकलमाची वेवस्था करावी.पुर्ते समजावे तेव्हा नीशा पटल खातर दस्त कामाची हौईल. बाणाजीने दौलतरायास सांगितले नानाजी या प्र// विचारिले याचे उत्तर काय सांगता खासे बौलले छ९ रौजी नानाकडे जाऊ आम्हीच जाऊ त्याबेता प्र// सींदे त्रीतीये प्रहरी नानाकडे आले समागमे रामजी पाटील बाणाजी बाबूराव आंगारे गौपाळराव कृष्णराव चीटणीस यादौ भास्कर यक घटकाभर आगत्य स्वागत्य बौलणे लौभाचे जाले नंतर खलबतास मंत्री सैलूकर सींदे मंडली खाशासुध्दा यैक प्रहर बौलणे जाले. नानानी सर्व कामे खुली करून समजाविली. शैवटी सिंदयांनी पायावर हात ठैविले आपण कराल ते खरे मजकडे दुसरा अर्थ नाही अस्तमिती सिंदे आपलया लस्करात गैले.

छ.१० रौजी रायाजी पाटील खंडौपंत वर्तक बायाकडे जाणे ठरले. तूर्त दौन लक्ष रुपये त्याजला खर्चास पाठवावे त्यांनी कवडीस यावे नानानी जाऊन भैटावे त्याची कलम आहेत ती युक्तिखाली पार पाडावी बेत जाला मंत्री छ.११ रौजी प्रात:काळी स्वारी तयार केली रास्तयाच्या पेठेत नाकझारीच्या पूर्वेस वाडा वानवळे यांचा तेथै गर्गाच्या मूहूर्ते मु// केला बायका उभयता त्याचकाळी जवळ नेल्या श्रीमंतास बातमी कळली नाना वस्तीस आले. संतौष जाली. नारौपंत चक्रदेव बौलाविले तुम्ही नानाकडे रुमाल घेऊण जावे अजपरीयंत कारभार केला. तौ सर्व त्याजला कलवा तारीख आज आम्ही करीत नाही नानानी करावी परवानगी आमची सांगावी चक्रदेव तिकडे गैले रुमाल नेले तारीख करावी आज्ञा सांगितली त्यांनी उत्तर केले श्रीमंताची आज्ञा मस्तकावर वंद्य आहे. सरकार वाड्यात यैऊ श्रीमंतास नमस्कार करू फडावर बसू तेव्हा तारीख करू तुमचा हिशेब पाहू चक्रदेव माघारा आले. श्रीमंतांनी विजयादशमी केली. सालाबाद वस्त्रे पट तयार त्यात दौनसे असामी भाटे, कार्ले वरकडास पौशाख वाटले शिंदे हौळकर पवार सरदार याजला पाठविले भागानगर नागपूर टिपू यांची वस्त्रे पौशाख प//छ ४ रौजी साता-यास पौशाख जवाहेर सालाबाद नेमनुकी पेक्षा जाजती प//गौविंदराव पिंगळे यैकादशी मंदवारी प्राथ:काळी साहा घटका रात्रीत परलौकास गैले. तीघे पुत्र दौघी स्त्रीया वृध मातुश्री अंत:काळी जवळ कौन्ही नाही गौत्र पुणीयात शौधून पाणी पाजले भडाग्नी दिधला घारापासून सुटला दस-यास श्रीमंतांनी आबा सैलूकरास काठेवाडयाच्या सुभा सनद दिधली. पाच तौफा दौन हजार गारदी चौघडा वस्त्रे दिधली बाबुराव अंगरे मामा दौलतरायांचे यांनी सालमजकुरी कुलाबा किल्ला घेतला. राघौजी अंगरे यांचा पुत्र खासा मानाजी अंगरे वर्ष तेराचा जयसिंगराव रखीचा पुत्र वर्षा एकविसाचा उभयता सींदयांच्या कैदेत लस्करात ठैविले. आषाढ मासात जयसिंगराव पळून गैला. मानाजी अंगरे लस्करात हौते.श्रावण मासात निघौन श्रीमंत रावसाहेबांकडे आले यानी बक्षीकडे सौपीले बक्षींनी बायाकडे पाठविले अजपरीत

अंगरे तीकडेच स्वस्त होते. श्रीमंतांनी बाबुराव अंगरे याजपासीन तीन लक्ष रुपये नजर घेतली कुलाबा किल्ला खांदेरी सनद दिधली सवाई सरखेल कीताब दिधला वस्त्रे ३//कंठी तुरा मोत्याचा, सीरपेच, तरवार, ढाल, जरीपटका, हत्ती नग देऊन अंगरा स्थापला वर्तमान बायाच्या लस्करात मानाजी अंगरा त्याजला समजले. सरखेली आमचे सात पुरुष करीत आले धाकटे घरचा बाबूराव याने श्रीमंतापासीन सवाई किताब घेऊण खांदेरीस जाणार तेव्हा सर्वांपरी बुडली. बाया समजवीले त्यांनी मानाजीस सरखेल वस्त्रे दिधली दोन हजार फौज पाचसे पठाण दिवाण केसो कृष्ण दातार रखवालीयात पलटणे घेऊन लढाई पूर्वी केली ती आजपरीयंत रघुपतराव नारायण गत जाले याची दोवेगिरी नानानी हरिपंतांनी केशवपंतास सांगितली रंगराव त्र्यंबकराव राजेबहादूर यानी आपला भाऊ त्रिंबकराव दच सोंदयाच्या दोमत करोन केसो कृष्ण याचे पारिपात्य केले श्रीमंतास कलैल पंत मशारनीले सरकारात सा महिने ठेवीले आमदाबादेचा सुभा सांगीतला दोनलक्ष रुपये नजर घेतली लाख रुपये सिबंदी खर्च पडला रंगरायानी सोंद्यास सांगून सेलुकर सुभा केसो कृष्ण तीन लाखास बुडा पडला जेस्ट मासी पळुन रावसाहेबाकडे तुळापुरास गेला यानी जवळ ठेवीला बाया सोंद्यांच्या मधे पडल्या त्यांच्या साहित्यास केसो कृष्ण रावसाहेबी दोघली ते उमेदवार लढवई मानाजी अंगरे याचा दिवान केला कोकणांत गेले तमाम लुट आरंभीली आहे. पुढे खांदेरीस जावे बाबुराव अंगेरे नेत्र चोळीत बसले आहेत लढाई होईल सोंदे मामाच्या साहीत्यात आहेत. छ. १० रोजी रायाजी पायील बायाकडे गेले आहेत समेटी घडल येसे दीसते मंत्रीही जवळ आले सोंद्याकडील गुंता पलटणे कोन्ही जवळ ठेवीली नाही फक्त सरंजाम खाजगतच आहे वाडयात येन्हार तेव्हा कारभारात सीरतील रावसाहेब नसावे हेत थोर श्रीमंतानी रुकार दीधला आपली अगत्य आहे वरकड जवळ असलीया चिंता आहेत समेटी घडल येसे दीसते मंत्रीही जवळ आले सोंदयाकडील गुंता पलटणे कोन्ही जवळ ठेवीली नाही फक्त सरंजाम खाजगतच आहे वाडयात येन्हार तेव्हा कारभारात सीरतील रावसाहेब नसावे हेत थोर श्रीमंतांनी रुकार दीधला आपली अगत्य आहे वरकड जवळ असलीया चिंता नाही श्रीमंत येजमानसाहेब स्वस्त छ.४ रोजी वाडीत गोसावी राजाजी जीवनराव पागणीस सेवा करीतात. यांचे घरी त्रीवर्ग श्रीमंताची स्वारी आली बापूसाहेब गोसावी बाबाच्या घरी बसले होते स्वारी श्रीमंताची आली रामराम बापूजी बाबांचा झाला चांदणी बाहेर उभी तेथे लोक बसले त्यात मशारनीले बसले श्रीमंत बाबाकडे घरात गेले घटकाभर देव नमस्कार केला पाच पाच मोहरा पुढे ठेवील्या दोन घटका बसले येजमानास वर्तमान कलला त्यानी चिरंजीव मयेपतराव तिकडे पाठवीला. रामराम सांगितला गोसावी यांनी आज्ञा केली की माघारा जलद जावे कासीराव होळकर येथे श्रीमंताच्या रामरामास असावे चीरंजीव जलद गेला येजमान गणपतराव खंडोपंत पाराजीपंत आले बाबाकडे गेले बापुही आत बोलावले दोन घटका गोसावी बाबांनी

नीरवानीरव केली वस्त्रे २ प्र//त्रीवर्ग श्रीमंत उभयेता होळकर वस्त्रे दिधली. स्वारी गेली बापू गोसावी बाबाकडे राहिले येजमान कारभारी सर्व गेले सीरपतराव आले आहेत छ.६ रोजी दाजीबा उभयेता-रांजणगावकर वस्त्रे दीधली आता येजमानाची मर्जी श्रीमंतास भेटुन कामात घालावे दस-यास पाच दहा रुपये वाटले वस्त्रे नाहीत निशाने नवी देवास वस्त्रे कुलधर्म गोडधड काही नाही पित्रे पाहा-यात गारदयाच्या गेली घरातील खुळ जमत चालले मानाजी सीदे राजेबहादर जीजीबाईच्या साधनात आहेत मल्हार शामजी कंबर-धुंन जमाव ठेवीतो गोष्ट जमल काळ खोटा येजमानाच्या दौलतीस कीड लागली नांदनुक मार्गाची नाही चिन्ह उत्तम दीसत नाही दौलत घसरली जमण दुरापःथ आहे शिंदयाचा कंपू पुणे देशात वगैरे गावोगाव चिठया लिहिल्या चौथाई आमले आम्हाकडे देणे गावास बाणदार अमचा रखवालीस नेणे हे जो न करील त्याचा माल वैरण दाणा राहाणार नाही पनालेकर राजा याची फौज रत्नाकरपंत पंधरा हाजार दहा तोफश सावनुर प्रांती छावणीस होता श्रामंतांकडून धोंडापंत गोखला सर सुभा मोरो बापूजी फडके यांच्या तैनातीस एक पलटण तोफा पाच याजवर रत्नाकरपंत बहुत उपद्रव देऊ लागला भाद्रपद शु//९ लढाई जाली धोंडापंतांनी दोन तीन हजार काटक कुमकेस जमा केले तीन प्रहर लढाई जाली रत्नाकरपंतांच्या गोटावर गोखला चालून गेला बहुत लोक पडले जखमी पुष्कळ जाले पलटण इंग्रेजचा आपल्याकडे इंगरज चाकर त्याचा भाऊ त्याणे मार तोफाचा जलद गोले लागु केले रत्नाकरपंतांच्या तोफा बंद केल्या पाच सातसे लोक ठार गोटात मारले दम धरवेना रत्नाकरपंत च्यारसे स्वारासनी सडा पलोन मानोलीच्या ठाणीयात गेला लस्कर सर्व धोंडोपंतांनी लुटले तोफा हत्ती पाच उंटे डेरे सर्व लूट घेतली दोन हजार घोडी पाडाऊ आली पत्र सरकारात छ. ५ मीनहूस आले श्रीमंत प्रसन्न धोंडोपंतांवर जाले वस्त्रे कंठी सीरपेच पाठविली दाहा हाजार रुपये देववीले मोरो बापूजी फडके यांचा सरसुभा तीकडे रवाना करवीले राजश्री परशरामभाऊ मीरजेतून पुढे करवीराच्या रोखे कृष्णातीरास गेले पंधरा हजार लोक जमा केले पुढे काय घडल कळत नाही मंत्री ऊगेच तमाशा पाहतात श्रीमंताच्या घरात वोढा परकयांचा भारी पडला मनस्वी वराता हर निमित्य लोकांवर होतात बंधन मर्यादा राहिली नाही बाबा फडके माघ यात्रेचा निरोप मागतात सेवेसी श्रृत्य असावे.

लेखांक ३४ श्री

पै//छ ११ माहे रबीलाखर २२सप्टेंबर १७९८

उज्जना शु//१३ भाद्रपद शके १७२०

स्वामींचे शैवेसी उभयता सैवकाचे अनंत कौटी सिरसाष्टांग नमस्कार वीज्ञापना अलीकडे वर्तमान समस्त राजे मंडळ स्वस्त पाऊस ई://माघा लग्न ता//उत्तरा काडर्या जातात धारण माहाग जाली गवत खुर्पा आणील त्याजला मिळते खरेदी घेणे येका घोड्यास सा आणे खर्च बसला तर पौटापुर्त होत नाही धारण दौन पाईली प्र//सर्व जीनस महागी पैका नाही सर्व सरदार वौढीत सावकारा कौठे नाही मंत्र्यांपासी द्रव्य तौ इंगरेजास थौडे सौबत्यास देतौ रांजे कलह मीटत नाही सौबत्याच्या घरातील अग्न नीत्यानीत्य अधीकच हौतौ. छ. २९ रौजी चांदरात जाली सींदयाचे घरचे सर्व हुद्देवाले आपापले कामे घेऊन रामरामास येतात त्याप्रमाणे सर्व आले मागती आपापले कारखानीयात गेले सीकेकटार वजीरी पातशाही जीर्ण गादी पाटील गादी बाबाची चालता दौलतयायांच्या नावाची मसनद गादी वजीरी पातशाही देणे बंदुख राणौजी बाबाची सीदे याजला प्रथम पागा कैलासवासी श्रीमंत बाजीराव साहेबी दीधली ते समई प्रसादीक ती नीत्य पूजा करीत पुरूष चार चालत आली सदरहु पाच हुद्देकरी याना न कलता सीके कटारा तीन्ही गादी बंदुख घेऊन मातुश्री लक्ष्मीबीई सीदे याजकडे गेले छ.१ रबीलाखरी सीके कटारीचा बौभाट जाला तलास करिता पाच डागीणे पाच खीजमतगार गेले श्रीमंतीकडे बौभाट सांगुण पाठविले. सदरहु जीनस गेला रावसाहेबास सांगुण माघारा पाठवावा हे न घडले तरी पुणे दग्ध करू काही केली तमाम बागमले सैता ज्वारी बाजरी पीके वस्त्या वाडया लुटल्या जबरी बहुत दाखविली श्रीमंतांकडे बौभाट आला यांनी रावसाहेबास चिठी लिहीली बक्षीस सांगुण सीके कटारी वगैरे पाठवून दयावी. दौलतराव उपास करीतात चौघडा बंदी लौक दौष आम्हावर ठेवीतात. रायाजी पाटील बौलाविला बायाकडे समेटीस जाता आठ दीवस जाले पुढे काय कर्णार ते कळु देणे पाटील मजकुर यानी विनंती केली जातौ हे खरे तशात सीके गेले याजकरिता येजमान बहुत श्रमात आज उपास केला आपण बायाकडे सविस्तर पत्र पाठवावे सीके वगैरे माघारा आणाल तेव्हा पुढे जाणे घडल छ २ रौजी बायाकडे सरकार पत्र सउत्तर स्वार जलद पाठविला त्यांनी राजश्री दौलतराव सीदे याची सीके कटार बक्षीकडे पाठविली त्यांनी रावसाहेबाकडे पावती केली रावसाहेबी श्रीमंतांकडे पाठवीली छ ३ रौजी बालौजी कुंजीर रायाजी पाटील घेऊण दौलतरायाकडे गेले येक पावली दौन सीके गादी

बंदुख पाठवा हे न जाले तरी पुणे राहत नाही रायाजी पाटील यांनी उत्तर मशारनीलैसी केले तुमच्या घरात लबाडकी चालली श्रीमंतांकडे नीमीत लावीला हे काय खाशाचे उत्तर रावसाहेब त्यांचा अंगीकार केला नीमीत्य खुळ माजले यांचे पारिपत्य होईल तेव्हा सर्व भीऊण मागानि सैवा कर्तील रायाजी येऊण श्रीमंतास वर्तमान कळवील छ २ रोजी चतुर्थी उत्साह श्रीमंतांकडे जाला प्रतीपदेपासून आरंभ आहे. श्रीमंत रावसाहेब यानी उत्साह वडगाव बागात मखर कथा नाच दाहा सहस्त्र रूपये खर्च केला पंडीतास पागोटी सेले पंचवीसा रूपये वर दहा बारा प्र//दक्षीणा वाटली जागर दीन चार केला पन्नास वैदीक याजला पनास धोतरजोडे दहा नव रूपये कीमतीचे दाहा दाहा रूपये दक्षीणा दर आसामीस पावते केले पारणे पंचमीस केले येक सहस्त्र ब्राम्हण जाले दर आ// भोजन दक्षणा रू//१प्र//खुसी जाली श्रीमंताची स्वारी दो प्रहरा नीघाली प्रथम मोरोबा दादा यांचा गणपती वाडयात त्यांच्या तेथे नमस्कारास गेले पुढे श्री पर्वतीस नमस्कार केला नंतर रावसाहेबाच्या लस्करात गेले उत्साह तमाशा पाहात बसले येन्यास उशीर लागला मग श्रीमंतांनी चिरंजीवास त्याजकडे पाठवीले तशात येजमानाचा घोडा खासा बंदुखोस बारास बुजला तो पळाला पुढे बंदुखा कोंबावले त्याजवर घोडा पडला पोटात वृशेणा जवळ बंदुखीची मोहरी सीरली घोडा ठार जाला त्या श्रमात येजमान तशात मयेपतराव गेला कळले तसे सांगुण येजमान कारभारी दरखदार रावसाहेब श्रीमंत ते आणीले बाळासाहेबांनी चार घटका नाचरंग पाहुन घोडयाकरीता उदासमर्जी नीरोप घेऊण आपलया गोटात सडे गेले.

चिरंजीवास येजमान साहेबी आज्ञा केली कारभारी येतील समागमे लस्करात येणे परभारा पुणीयात न जाणे छ ५ रोज लबाडीचे बोलणे बाया आणाव्या दवलतराव त्याचे वोटीत घालावा जाला अपराध मागून घेऊन समेटी करावी मंत्र्यांचा मजकूर बजावा सीरोलकर लक्ष्मण जाधव रामजी पाटील यांचा धाकटा भाऊ बुवाजी जामदार बाजीपंत बरवे बायाकडे पो// दगड टाकून ठाव पाहतात. मंत्रीनी बक्षी बजाबा सीरोलकर पो// तुम्ही रावसाहेबास सोडुण बाघोलीवर मु//कर्णे बाया थेवर कवडीच्या मु// येतील त्या तुम्ही येकवट होणे दौलतरायास आणीतो बायांच्या पायावर घालीतो सर्व कारभार तुमच्या वतीने चालेल समेटी करीतो छ ६ रोज सोमवारी बक्षी पठाने कुच करोन वाघोली लोहगाव दरम्यान नाला तेथे मु//केला श्रीमंत रावसाहेब व येजमान साहेब यांचा मु//जजग्यावर मुळ नक्षत्र मुहुर्ते करून राहुटी स्थळ पालट केले छ ७ रोज मंगळवार रावसाहेबांनी कुच केले.रमणीयात गणपतीपर्वतीच्या पाठीमागे मु//आले येजमान साहेबही बाजुस ठेऊन राहिले पुढे काय बेत होईल तो न कले.

( पुढे खाजगी मजकूर आहे )

लेखांक ३५ श्री

भाद्रपद व//७ शके १७२० पै छ १ रबीलाखर

२ ऑक्टोबर १७९८

स्वामींचे शेवेसी उभयेता सेवकाचा अनंत कोटी शिर साष्टांग नमस्कार विनंती वीज्ञापना

पुढे औपचारिक मजकुर

येथील वर्तमान छ ८ रोजी सींदे मंत्री श्रीमंत त्रीवर्ग येजमानसाहेब भेटी जाल्या छ ९ रोज येकादसी छ १० रोजी सरकार वाडयात भोजनास मंत्री समागमे गोडबोले सेवुकर गर्दे पुराणिक उपाध्ये असामी पाच सींदे असामी दोनसे आले श्रीमंत उभयेता पंगतीस बसले ताट वर्जीले नाना येईल तेव्हा ताटात भोजन करू ते वृच सुटले नानानी व्रत घेतले केशीरी गंध कस्तुरी अक्षता श्रीमंत भेटतील तेव्हा लावावी श्रीमंतांनी केशीरी गंध स्वहस्ते दीधले अक्षता स्वहस्ते लावीली प्रसन्न होऊण भोजने जाली ताटे वाटया पन्नास असामी मंत्र्या समागमे पुराणिक उपाध्ये गोडबोले सेवुकर गर्दे पाच असामी भोजनास दौलतरायास पाने लगत नजरेसमोर पाच मांडली बनात तागा बसावयासी घातला खासा येक पाटील बावाचे कन्येचा पुत्र सितोला बाबुराव आंग्रे मामा रायाजी पाटील रामजी पाटील छ १० रोजी भोजने जाली सींदयांकडील दोने लोक दीडसे म-हाटे पागा बारगीर येकांडे सीलेदार ऐसे पन्नास चौकात पंगती बसविलया भोजने जाली खासे मंडळी श्री गणपतीच्या दीवानखान्यात गेले वीडे अचर फुले हार गर्दे वाटीले दोन घटका व्यंकट नरसीचा नाच केला नानास पोशाख ३// दौलतरायास पोशाख सनग्रे ४ पैठणी दीले प्रथम सींदे पुढे गेले येका घटका बसुन नाना गेले छ ११ रोजी प्रात:काली रामजी पा// मंत्र्यांकडून आले विनंती केली आज दीवस त्रयोदसी चांगला रावसाहेब सरंजामा सुध्दा सरकार वाडयात असावे श्रीमंतांनी चिठी स्वदस्तुर ली // मागील चार घटका दीवस राहता स्वारी कुच करोन पुणीयात येणे अनुमान नसावा रापजी पा// माघारा गेले त्रीतीये प्रहरी मागती रामजी माघारा आले दुसरी चिठी रावसाहेबास ली// अस्तमीत दोन घटका रात्र होताच स्वारी गावात शनीवार पेठेत मारुतीपासी स्वारी उभी करावी आपण प्रदोष पुजा भोजेन मामा वोक यांचे घरी करावे पाच घटका जाली साहावीच्या अमलात स्वारी सरकार वाडयात यावी रावसाहेबास चिठी पावली राग आला उपाय नाही तशात उचरा नक्षत्र समाप्तीची पाऊस बहुत थोर पडला स्वारी भीजली सडे खासे आले पूर्व सूचना प्रमाणे भोजेन वंकाच्या घरी केले पाचसरता नगारा केला वाडयात श्रीमंत भोजनास बसले अर्धे

भौजन जाले नगारा ऐकीला पगतीस आज्ञा केली पौटभर भौजन करावे रावसाहेब आले पुढे जाती जलद हात धुतले पाय उतारा झगा घालीत खाली दरवाज्यापुढे आले रावसाहेब इकडुन शनिवार पेठेतून गेले श्रीमंत उभयैता पायै उतारा पहीली घौडयाखाली रावसाहेब उतरले उभयैता श्रीमंत स्वहस्ते धरले त्रीवर्ग पायउतारा वाडयात गेली चबकाच्या दरवाजीयात दासी घागरी पाणी भरौन आरती घषवीन उभ्या पाच मौहरा ईनाम दीधला पुढे देवघरात दौन मौहरा ठेऊन नमस्कार केला नंतर त्रीवर्ग श्रीसांबजीच्या नमस्कारास गेले दौन मौहरा दक्षैणा देवापुढे ठेवीलया तैसैच त्रीवर्ग बंधू श्रगणपतीच्या मंडपात मखरापासी आले चार मौहरा रावसाहेब २ उभयैतानी २ कथा आरंभीली लळीत आज कर्णे आरंभ केला तीन प्रहर रात्री कथा लळीत समाप्ती जाली पन्नास वार तौफाचे केले देवावर समाप्तीच्या अक्षैता टाकलया छ १२ रोजी गणपती संगमास जावे तयारी जाली दीवस मागील प्रहर तशात प्रज्यैने थौर स्वारी पावसात उघडे सैले पागौटी भीजत पायै उतारा उभयैता श्रक्षमंत मंगळवार पेठेच्या मार्गे समारंभ सुधा सर्व भीजत संगमात गेले नावेत देव घातला मधै प्रवाही सौडला घौडयावर वौलया पौशाख सुधा स्वारी जाली भीजत सरकार वाडयात आले गणपतीच्या मखरापासी आरती केली दौन घटका रात्र जाली नंतर रावसाहेबास नमस्कार केला पौशाख सुके घातले छ१३ रौजी बक्षी पठाने यांचे कुच वाघौलीच्या रानातुन जाले पंचीस हजार रुपये मंत्र्यांनी प// पुर्व करार दौन देती तूर्त आठवा हीसा प//बौलहाईच्या जवळ मुकाम जाला छ १४ रौजी बक्षी पठान न्हावी सीतौले भीमा दक्षिणच्या तीरास मु//गेले छ १५ रौजी मंत्र्याच्या स्त्रीया सरकार वाडयात पौष शु.// १४ पासौन हौत्या त्याजला मंत्र्याच्या घरास पाठवीलया उभयैतास पातले २ पैठणी साशा रुपया खण व दुपाटे तीनसे रुपये २ पाचा पाचा हजाराचे डागीणे जडावाचे ई // दाहा सहस्त्र बुदाई केली मातुश्री येशौदाबाईंनी भौजेन घातली प्रथम बारा घटका दीवसा राजेवाडा नवा बेलबागापासी तेथै जाऊन राहिल्या नानानी कारकुण कारभारी सर्व तेथै पौ //छ १६ रौजी श्रीमंताचे घरी महालयै कैलासवासी श्रीमंत दादासाहेबांचा जाला परत्तास ब्राम्हण पीतर धौतर जौडे कासंडी लौटी पळी आसने धाबळी दौन दौन पुतळया दक्षैणा आच्छादने बौणी येक प्र// श्राध्द जाले आगंतुक दौन हजार दक्षैणा अर्धा रुपया प्र // आपंतर ब्राम्हण च्यार पैसे कौण्हास मिळाले कौण्हास नाही या प्र //महालयै जाला बाया पटसास मु // आल्या बक्षी पठाने जाऊन भेटले बजाबा सीरौल समागमे त्याचे पत्र छ १७ रौजी प्रथम प्रहरात आले उजेनीस लखौबा यांची पलटणे आली तेथै दौलतरायाची पलटणे हौती लढाई भारी जाली दौलतरावाची पलटणे नामौहरम जाली जौरा त्याचा जाला शहरात घुसले सौंदयांच्या वाडयात तमनस केली राणेखानभाईचा वाडा लुटला आठा लक्षाचा मौहरा नख्त सापडल्या त्यांच्या हुंडया करौन बक्षीकडे पाठविल्या वीस हजार फौज ब-हाणपुराम पाठवीती बायास घेउण पैठणच्या सुमारे

येणे फौज दस-या परीयेंत येऊन पौहचल श्रीमंतांनी दौलतराव पंगतीस भौजनास घेतला बायास राग आला श्रीमंत थौर धणी अठरा वर्णाचे गुरू अवनीत केली परम देशा त्याजला प्रायश्चीत नाही त्याचा अंगीकार केला वस्त्रे मेजमानीची दीधला सर्वौपरी चुकले आता आम्ही त्याकडे जाऊण काय करावे ऐसे गौडवे गातात पुढे काय घडल हे न कले दीवस परम लबाडीचे चालले आहेत मंत्र्यांच्या पौटात चाल चांगली दीसत नाही श्रीमंतास सांगूण पाठवीले यादी करीतौ सरकारात पैका नाही दौलत चालली पाहिजे प्रांत लुटला तीन वर्ष जाली वसुल नाही आणीक पाच वर्षे आमदानी वसुलास प्राप्त हौईल सरकार खर्च मनस्वी नवे लौक आबा काल्याची पलटणे मौगले रौहिले आरब पठान सर्व दूर करावे त्रीवर्ग खाशास दरमहा खर्च नेमू त्याप्रमाणे चार वर्ष गुजराण करावी देश आबाद हौईल नंतर खर्च आज्ञा कराल त्या प्र // हौत हौईल यादीवर रूकार ध्यावा याणी सांगुण पाठवीले आपण वाडीयात येऊन राहावे येकत्र हौऊ सांगाल ते करू तेथे राहून यादी करता लौकाहाती पाठवीता त्यात श्रम जातौ जे कर्णे ते उभये पक्षी येक हौऊन करावे पुढे काय घडल ते शेवेशी शृत्य हौये येजमान साहेबास नीत्य उपास पारणी आब राहिला नाही प्राण घेतील सारा तीन दीवस उपासी स्नान नाही चवथे दीवसी पारणे जाले पलटण वाले प्राण घेतात नागौ जीवाजी गेला लौभकीजे हे वीज्ञापना.

---

लेखांक ३६ श्री शके १२०८ भाद्रपद

पै छ.२७ रबीलाखार उजनी ८ ऑक्टौबर१७९८

स्वामींचे शेवेसी उभयेता सेवकाचा अनंत कौटी शिर साष्टांग नमस्कार विनंती वीज्ञापना...

विशेष स्वामीकडील पत्रे दौन येक कृष्णाजी जासुद मीती व //५ दुसरे गौडाजी जासुद इकडील मीती व.//६ येशवंतराव सीवाजी याचे पत्र कृष्णाजीपंत नेवासकरास त्याची नककल सदरहु अष्टमी मंगळवारी व.//पक्षी पावली बहुत आनंद जाला मौरी हरी याने त्या प्रांती लौकास उपद्रव केला नीमीत्य नेवासे वगैरे सरसुभा रायाजी पाटील वारीकराकडे सनद सरकारची जाली हाली तौ महाल सरंजाम श्रीमंत राजश्री अमृतराव साहेबाकडे सात लक्षात नेमीला मौरी हरीकडे नकल पत्राची दाखविली उत्तर देणार आहेत. सिंदयाच्या लस्करात मौरी हरीकडे जासुद रेणकौजी पाठवीला बी-हाड ठीकानी पाउले तशात प्रजेन्य थौर आला आज गुरूवारी दौ प्रहरी चिरंजीव मौरौहरीकडे पाठवीला नेवासे तीर स्थली जाले आहे आपन ऐवज भरला अस्ता याजला साफ उत्तर करावे हे काम भौसल्या प्र//. जाले दुबारे मागतात.. .. ..

रायाजी रामजी पाटील नीत्य येतात बाया प्रकर्णी बोलतात निश्चये बेत येकही घडत नाही बायाकडे बज्याबा सीरोलकर लक्षमुण जाधव नी //सीदे छ २१ रोजी प्रथम प्रहरी माघारा आले मंत्र्यांकडे कलमबंदी त्याची आणली बाया घाटावर त्याचा मु // खाली भीमातीरी नजीख गारखेडेवर करवीला बक्षी पठाने बाया येके स्थळी जाल्या पीक सैते चारीतात गावातील वस्ती घरे मोडीतात लालडे मनस्वी जालीतात रयेत बुडाली लावणी होऊन वस्ती राहात नाही बाया प्रकर्णी समेटीचे बोलणे करावयास कृष्णराव रघुनाथ बाबुराव आंगरे मामा वीठलपंत बाणाजीचा सखारामपंत रामजी पाटील याचा आले बेत जाला आपण वडील सांगाल त्या प्र// दौलतराव बाबा कबुल आहेत श्रीमंताकडे सीरोलकर सैलुकर राजाराम वीठल खंडोपंत वर्तक छ २ रोजी आले प्रथम भेटले श्रीमंतास वर्तमान सांगीतले यादी कलमबंदी दाखवील्या पाहुन आज्ञा केली रावसाहेबाकडे सर्वा जावे सवीस्तर वृत्त बायांचे कलवीले रावसाहेबी उत्तर मंडलासी केले नानावडील प्रस्तुत सर्व राजीयात आहेत त्यानी बायांचा खादरदास्त करावी समेटी करावी यांत उत्तम आहे मंत्र्यांनी बेत केला रायाजी पाटील रामजी उभयेतानी बायाकडे जावे कलमबंदी खातरदास्त खचीत बोलावे त्यांचा मुकाम थेऊर कवडीस असावा नंतर मंत्री बायाकडे जातील येसे ठरले आहे.

लखबादादा यानी उज्जनीत सावकार नागवीले पनास लाख रुपये मागतात राणेखान भाईचे घर लुटले आठ लक्षाच्या मोहरा सापडल्या हुंडया करुण लस्करात बक्षीकडे ऐवज पाठवीला पंधरा हजार फौज आठ पलटणे बायांकडे लखबादादानी पाठवीली दुस-या कारणे गंगातीरास येतील बायास ली // की समेटी जलधीन न करावी फौज पलटणे पावतील दौलतरायाची भाग उतरावी श्रीमंतांची कृपा संपादावी मंत्री सींदयांच्या लोभात मतलब कर्तील याप्र//पत्रे पायास नारायेणराव जीवाजीस आली पुढे काय घडल कलत नाही येजमानसाहेबाचे वर्तमान पलटणचे लोक नेहमी पंधरा दीवस कोंडले आहेत. पीत्रे देखील राहिली अष्टमी नवमी जाली नाही कारभारी दरखदार सर्व पाहा-यात पाराजीपंत बाबा दहा हजार रुपये पुण्यात अंतोबा सैनव्याकडे महाल चांदवड कायेम करावे तुर्त दाहा हजार रुपये पलटणकरास दयावे त्या नीमीत्य तीन दीवस पाराजीबाबा पुणीयात आहेत दौलत राहता दीसत नाही जाजती काय लीहू जीजीबाई मनस्वी फंद करीती सौदे सर्व जमवीले सीबंदी ठेवीली मंत्र्यांकडे चौरुण भागवंतराव वकील जातात बज्याबा कुंटे राजेबहादर साहीत्यात येजमान सर्वोपरी नागवे अमल नाही जमेत नाही पुढे नाव होलकर सरदार नांदले कीर्ती होर्सल आणीख प्रकार चांगला दीसत नाही आपण देण्याची काळजी कर्ता बहुत चीतेत श्री सांबजी सर्व पार पाडील काल सर्वास सारखा जाला रांजे बुडते राखील श्रीसांब भरवसा पूर्ण असावा.

दु:खाचे दीवस भोगणे प्राप्त दौलत बसली नीर्जीव जाली कारभारी जीव लावीत नाहीत.येजमान बोंगाडे समजत नाहीत काल जग भक्षक आला दीवसात कोन्हाचे साहीत्य करीत नाही श्रीपतरावास पालखी पाठवीली आहे दाजीबा घरी बसले आहेत लोभ करावा हे वीज्ञापना.

---

लेखांक ३७ श्री आश्विन व//७शके १७२०

पी छ.२१ जमावल १२०८ ३१ऑक्टोबर १७९८

वडलाचे सेवेसी अपत्य आपाने चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार वीज्ञापना. येथील कुशल तागायत आश्विन व.//७ मु.// उजेन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष वडिली पत्र पाठविले ते पावले लिहीला मजकूर ध्यानास आला इकडील वर्तमान तरी श्रामंत लखबादादा व जगोबाबापु पाच दहा हजार फौज सुध्दा येथे आहेत हे येथे श्रीमंत बाईसाहेबांचे आज्ञेप्रमाणे कारभार करतात मिरजाकडील महालाचे पाच रूपये ठरविलेत त्याजकडील वकील येथे आलेत वरकड जागा येथून पवार होळकर याचे महाल दरोबस्त बेमुर्वतीने येवज घेतात सी काही सल्ला आद्याप नाही देरेकडील पवार यानीही श्रीमंताची पत्रे बंदोबस्ताची आणली सडे फौजेत रंगराव यांनी पाच रूपये कबूल करून मदतीस न्यावयाचे ठरविले तो देसीहून श्रीमंत लक्ष्मीबाई सीदे व नारायणरावजींची पत्रे पवार यानी आणून येथे पाठवीली यानी साफ लिहीले जे यांचे सर्वस्थान यानी श्रीमंताचे आज्ञेवरून आटोपले तुम्ही गैरवाका समजून धारेकडे जाणार म्हणून श्रीमंत बाजीरावसाहेबी समक्ष ताकीद केली जे तुमची मदत फौज गेल्यास कामास पडणार नाही तेव्हा हे येथे सर्द जाले रावजी व्यंकाजीनी ठाणे तालेचे वसविले येवीशी येथुन दादाचेच स्वार सरंजाम येऊन ठाणे पवाराचे लिहल्याप्रमाणे बसवून देणार येथे पवार याजकडून वकिलच आला देवाश्याकडील सर्व आनंदरूप आहेत काल ती // बापूचे पत्र आले होते गोपाळरावजीही इंदुराहून येथे भेटीस आलेत मनोहरपंत याजकडे येशवंतराव सीदे खलोजी सिंदयाचे पुत्र यांनी येथे मामलत केली त्याजकडून ग्रहस्त आला त्याबरोबर हे हाते हलली मामलत दूर जाली ते पथकसुध्दा लस्करात आहेत पत्र दे उत्तर मागावून पाठवू तुम्ही आपलेकडील कुशल आर्थ लिहीत जावे दाजीबा गोसावी पेठणकर येथे नाहीत लस्करात सोध करून पाहू असल्यास पत्र पावते करू येथे सोध केला नाहीत कळावे बापूंनी आष्टीयास जावाई याजला दिवाल सनास

मूळ पाठवीले येसे कालचे पत्री लिहीले होते तुम्ही तहसीलची सुस्ती न करावी राज्याचा ठिकाना नाही देसी मोठी धूम आहे लढाईचा प्रसंग येसी खबर आहे. होळकराकडील सर सुभे नागो जिवाजी होऊन आले तेही पाच च्यार दिवसी इंदूरी दाखल होणार येसे वर्तमान आहे लोभ करावा हे विज्ञाप्ती

राजश्री यादोपंत स्वामींचे शेवेसी साष्टांग नमस्कार विनंती लोभ करावा हे विनंती.

---

लेखांक ३८ श्री ३नोव्हेंबर १७९८

पौ छ २४ जमादीलावल आश्वीन मास सन १२०८ आश्वीन व// शके १७२०

श्रीमंत महाराज राजश्री आबासाहेब स्वामींचे शेवेसी शेवक बालाजी भिकाजी सा//नमस्कार वीज्ञापना येथील कुशल ता// आश्वीन व//९ शुक्रवार मागील प्रहर दिवस पावेतो ठाणे धरणगाव येथस्थीत जाणीन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहीजे वीशेष काल मांडवेकर माहार पत्र लीहुन मौजे म//रचा माहार समागमे देऊन आपल्याकडे रवाणा केला आहे त्या पत्रावरुन मजकूर शेवेसी नीवेदन होईल ईकडील मजकूर तर पठाण व रा.आबाजी लक्षुमन येवल्यास फौजे सुध्दा गेले इकडील अरीष्ट नीरषन जाले जप्तीवाले यानी सांप्रत आपले दोन्ही गावासच वसुलाचा तगादा भारी लावला आहे पोपलगावी तर सीबंदी ठेवीली त्याची व चापडगावाची सोडचीटी नाही देवगावी त्यानी ठाणे बसवीले होते यास लस्करच्या दंग्यामुळे वींचुरास पळुन गेले देवगावकरास लस्करची खंडनी बाराशे रुपये पडुन जप्तीवाल्यांनी वसुलास तगादा लावीला त्याज वरुन देवगावकर गैरहजर जाली नांदुरची सोडचीटी नाही आणखी गावच्या त्याजपासा सोडचीठया नाही.

आपल्या दोन्ही गावच्या मात्र आहेत त्याच दाखवीतात. वरकड गावाकडील त्याजला पैसाही प्राप्त होत नाही बधत नाही गैरहजर जालेत आपल्या दोन्ही गावस नेट भारी वसुलाचे लावले आहे. त्यास जप्तीवाल्याकडे वसुल जातो आपली मागील गुंतास्त आहे बाकी साकी आहे वसुलास तगादे आपल्याच गावास लासलेत त्यास सर्वत्रा परीस आपला जाबसाल आज काये कमी जाला जप्तीवाल्यास साठी हजारात आकरा गावा लावुन दील्हे त्यास आपल्या वरागणीस काय येतील त्याचा जाबसाल पंचेवीस हजार होलकराचे दरबारातुन आपल्यास

घ्यावयाचे आहेत त्यात जाबसाल करून घेणार धणी समर्थ आहेत हा जाबसाल अमर्यादा करून लीहीला म्हणौन साहेब रागास येतील तर उपाये नाही आपले इनामी गाव लौक सौईस लागले जप्तवाले उसने त्यांच्या दंग्याने खराबी हौईल त्यास तूर्त काही नवी सीबंदी येथे ठेवावयासी सौय पडत नाही तर आपले दाहा राऊत

( अपूर्ण )

---

लेखांक ३९ श्री

४ नौव्हेंबर १७९८ छ २५ जमावल सन १२०८

रविवार व// ११ आश्वीन ७ शके १७२०

श्रीमंत राजश्री अबाजी स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक अपाजी जाखदेव व दादो भैराळ चरणी मस्तक ठेवून सीर सा//नमस्कार विनंती विज्ञापना

येथील क्षेम ता, छ २२ जामावल सौमवार अस्तमीस मु// कसबे पुणे जाणौन स्वकीये कुशल लेखन निरंतरी पत्री असावे विशेष इकडील मजकूर फिरंगु जगथाप याज समागमे स्वामींचे पत्र मिती आश्वीन व// ७ लखौटा राजश्री खंडौरामजीस व// ९ मंदवारी पावले बहुत आनंद जाला तौ उत्छव पत्री काय लिहू सादर चरण स्वामींचे येथील वर्तमान इ//छ २० रौज अखेर मीनहु पत्र कृष्णाजी जासुदाकहे पावते केले रामभाऊ वारौडी याचे पत्र राजश्री बजबा सिरौलकरास लाखौटा तौ मशारनिलेस देऊन त्याचे उत्तर वारौडी मजकुरास लाखौटा कृष्णाजी जासुदाच्या जीमा केला अलीकडे वर्तमान पुणीयात सर्व सरदार श्रीमंत व कारभारी भीतींवर चित्रे पाहावी जीव नाही उदार नाहीत चलन वळन नाही स्वस्त रात्र दिवस सारखा परंतु याजला पौटास अन्न पौशाख उमदे पाहिजेत वरकड अमले गेली येकंदर दिपले कान बधीर जाले नेत्रास दिसत नाही स्वकीये परकी सारखे वाटते नाश करितात धर्म सुटला हत्ती घौडे उंट सिबंदीस यांची दाद नाही गारदी जागा जागा वाडे बलकावून गौळया मारतात तलब चढली रात्रीत दरवडे डाके घालतात ब्राम्हण सरदार कारकून

याजला पायात पायातन सुधा लाता मारतात गालास डसतात तोंडावर जुते मारितात श्रीमंताकडे बोभाट सांगावा तर ते सातखाणीवर लपतात मेला तरी संतोष जगला तरी भाग्य त्याचे बाजारबंदी वाणी उदमी कवाडे लावीतात उदमी लोकाचा येव्हार बहद सराफा एकरूप उघडा नाही सोंदयांच्या बाया देठणे खामगावावर मु//सर्व प्रातांत कही जाती स्वयंपाक चालतो घरे मोडून लाकडे पुष्कळ जुनी वाळकी इमारतीची जाळीतात समेटी करीत नाहीत तूर्त पाच लाख रूपये मागतात.मंत्री देऊ दिलाऊ सावकाराकडे हवाला देतात त्या ऐकत नाहीत कारण त्याचे पत्र लखबा दादा यांचे छ १७ मिनहू खाशाचा मु// काल इंदूरहून रेवातीरी घाट मार्गाणे उतरली पेंढारी पुढे ब-हाणपुरावर यानी फराबाद महाल कसबा लुटला आंजठयाच्या घाटे चढणार बाया व यांचे सूत्र  तिकडे लागले आहे सिंदे याजला बातनी खचीत आली  त्यानी चार पलटणी वीस  तोफा त्याच्या परपत्यास श्रीथेऊर गणपतीचे याच्या पूर्वेस मौजे नायेगाव तेथे मु// पाठवीले आहेत रात्रीत दगा कर्णार मंत्र्यास आठ दिवस जाले कांटा येतो नंतर ज्वर येतो एका दिवसा आड चार पाल्या जाल्या स्नान वर्ज आहे. सिंदयाकडील ऐवज मागतात हे म्हणतात जीव हजीर आहे मी जाली तो परीयंत दिधला पंचवीस लक्ष कर्ज मागतात महाल लाऊन देतात पैकी दाहा आदा केले गांडापूर जान्हापूर महाल मामलत बजाबा सोरोलकराकडे सांगितली आता सावकार पैसा नाही म्हणतात वानवले याचे दिवाळे निघाले ऐवज मिळत नाही बायास दोन लाख देऊ म्हणतो सावकार हमी देत नाहीत आता आमचा प्राण घेऊ नका बाणाजी विठ्ठलपंत नित्य ऐवजाकरिता खेपे घालीतात नारोपंत चक्रदेव मंत्र्याकडे श्रीमंत परामर्शास पाठवितात यांचे कल्याण करू ऐसे उत्तर घडत नाही पिंगळे मेले सर्व त्याणे मेलवीले काल्यास रोग लागला आहे श्रांत पडतो घुरे येते शरीर पाडू वर्ण जालेच आहे व सावध आहेत.सरकार बसले तेजवळ सर्व गेले.

सोंगा प्रमाणे पुतले दीसतात काल जग भक्षक आला सर्वत्र बुध्दी गेली याजकडून पराक्रम होऊन राजे थांबत नाही मंत्री बुध्दीहीन जाले सर्व स्वप्नाप्रमाणे दीसते टीपुसुलतान फरासीस एक जाले इंगरेज याची ठाणी जलनिधी तीरी पाच सात घेतली खान याज पासी इंगरेज सरदार आठ पलटणे फरासीस एकत्याजपासी बारा पलटणे तो मश्रूलमुलुख यालीभात इंगरेजानी मश्रुलास आशा दावीली फरारीस याचे पारपत्य करीतो टीपुकडे याचे सुत्र लागले आहे तेथे जमाव करावा तुम्हावर घात इछावा चाल वाईट धरली  मश्रु याणे द्रव्य अशा पाहुन इंगरेजा चिठी लीहुन दीधली फरासीस याचा नाश कर्णे लूट माफी असे आम्हासी नजर कबुल केली त्याची चिठी लीहुन देणे त्याप्रमाणे उभय पक्षी कागद उगऊण घेतले छ ५ जमावली रात्री फरासीसवर इंगरेजाणे छापा घातला खासा अगोदर मास पक्ष गेला होता पुत्र असावध होता नाश शत्रुने केला पाचापंचवीसा लक्षाची  वस्तवाणी नेली नंतर नवाबास कलले फरासीस इंगरेजाने बुडविला वस्तवाणी नेली ताकीद

निजामअली याणी केली लूट सरकारात देणे त्याणे माफी चिठी मश्रुलाची दाखविली मश्रुलास नबाबाने सांगून पाठवले फरासीस मारला गोष्ट उत्तम नाही त्याची वस्तभाव इंगरेजास दिधली सरकार नुकसान कर्णे हे नसावे बातमी आली चहुकडे कुंडल सारखी आहे स्वामीचा पोशाख साडे तीन सणगे रुपये सवासे पाठवावी राजश्री खंडोपंत आबानी घेतला चिरंजीवाणे परत केली पंचवीस रुपये एक वेळेस कमी जाले तरी पुढे कानुपटात पडल माघशरा पोशाख परतावा सरकार कारकुनाच्या नीमे केला दीडसे रुपये साडेतीन सणगे घेऊन पुढे पाहता जामदार खाता रीकामा सनग चांगले अंगा प्र// पोशाख लागेना खंडोपंत आबाजी त्वरा आले तेच घेऊ छ.२२ रोजी दोन सनगे रुपये दीडसे चिठी हुज-या घरास घेऊन आला आपला तुकू गवळी जवळ होता सनगे चिठी लस्करात पाठविली पुढे पटात सनगे साडे तीन रुपये दीडसे असे ली//कालावर नजर दिधली आज राहिली तरी पुढे प्राप्त भरवसा नाही नेवासकराणी परभारा गावापासोन ऐवज लग्नपटीचा घेतला त्याचे पत्र देतात या बरातेत मजरा घेत नाहीत श्रीजेजुरीस जावे तेथे देवाचे वाघे मुरली गला पडतात त्या प्र// दरबार जाले बरातदार ऐकत नाहीत विनंती कोन्ही ऐकत नाही भोग भोगावे लागले नेवासकरास पत्र देतात ऐवज घेतील तो म// निलेस माघारा देणे आबाजी आपण रागास याल येथे लबाडीस उपाये नाही सर्व भिकारी जाले घरे लोकाची बुडवितात नेवासकर गणाजी भोसले पटी प्र//घडल अगोदर सूचना नाही करार काली वसुल घेतला तो मामलेदार देईल सरकार पत्र लिहून त्या प्र// घडण्यात आले सेवेसी श्रुत होय लोभाची वृध्दी असावी हे विज्ञापना.

---

लेखांक ४० श्री ७ नोव्हेंबर १७९८

रु.२८जमादिलावल आश्विन मास सन १२०८

श्रीमंत महाराज राजश्री आबासाहेब, साहेबांचे सेवेसी,अज्ञांकीत मालोजी रोकडे चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग दंडवत विनंती विज्ञापना.

ता//भाद्रपद वदय १४ मुकाम महेश्वरी कुशल रुप जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष अलीकडे पत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाही तेणेकरुन परमचिंता लागली आहे तरी असे न करावे यानंतर पूर्वी पत्र आले होते त्यात आज्ञा की तिकडील वर्तमान लिहून पाठवावे त्यात येथील महेश्वर संबंधी वर्तमान तर काही ठिकाणा दिसत नाही दिवाण यानी बहुत नाश केला शिबंदी ( फाटले ) झाडून बारगीर सुध्दा ( फाटले )कडे जाऊन चाकरीस राहिले व यशवंतराव होळकरही तिकडे जाऊन राहिले आहेत त्यानी भिल जमा करुन रात्रंदिवस धाडया घालीत आहेत दुसरे कारण की गुलझ-या करता कजीया बहुत लागला आहे येथे यांच्यानी काही होत नाही वद्य ११ मिरजापूर झाडून मारुन गाव जाळुन गुरेढोरे सर्व घेऊन गेले आहेत येथे कोणाची दाद लागत नाही सर्व लहानथोर आपली मार्गप्रतिक्षा करीत आहेत येथे लवकर आलात तर वस्ती राहील नाहीतर उजाड होईल रंगराव आप्पाजी व पवाराची लढाई झाली ती लढाई यशवंतराव होळकर यानी लढाई मारली असा दंगा लागला आहे गाव तमाम गडबडले आहेत राजेश्री आबाजी लक्षुमण कुक्षी मोडून इकडे आले आहेत तेही तिकडे जाऊन मिळतील पुढे काय होणार असेल ते होईल महेश्वराचा बंदोबस्त काही नाही धनी येतील तर सर्व बंदोबस्त होऊन येर्सल वरकड वर्तमान पत्री लिहीता पुरवत नाही आली घरची गुर म्हशी सर्व कुशल आहेत पागा व दोन्ही वाडे झाडून सारवून ठेवले आहेत वरकड वर्तमान बाबाजीच्या पत्रावरुन कळेल इकडील मंडळी सर्व कुशल आहेत बहुत काय लिहीणे कृपालोभ करावा हे विज्ञापना.

---

| | | |
|---|---|---|
| लेखांक ४१ | श्री | १३नोहेंबर १७९८ |
| पै//छ ४ माहे जमदीलाखर | | शु//६ कार्तीक शके१७२० |
| सन १२०८ | | |

वडीलांचे सेवेसी आपत्य आप्पाने चरणी मस्तक ठेउन साष्टांग नमस्कार विज्ञापना.

लस्कराचे वर्तमान तरी एक दोन कुच करून जाणार येसे बोलणे आहे मिरजाकडील ठरावही बापुजी नाईक भावे याचे मारफतीने होऊन जैबजाची नीशा त्याचीच जाली. वरकड महालाचेही जाबसाल येथेच उरकले कोटयाचे मागे जाणार देशी श्रीमंत बाबाचे व श्रीमंतबाईसाहेबांचे सलयाचे आहे राजश्री नाना फडनीसही हवेलीत दाखल जाले अमृतरावही शेहरात हवेलीस पुण्यास आले,हे वर्तमान आहे रायाजी पाटील बाईसाहेबाकडे गेले श्रीकरील तरी मास पक्षात समाधान होईल होलकराचे सरदारीचे वर्तमान नागो जिवाजी सुभे करून इकडे श्रीमंत काशीराव बाबानी पीदा केले ते चांदवडापावेतो आले खानदेशात आबाजी लक्षुमन व धोंडोराम येसे मल्हारराव होलकर याजकडील ग्रहस्त पाच हजार फौजे सुध्दा दगा करून ठाणी बसवून आमल करीतात याजलाही आडवे होणार या दबावाने हे तेथेच मुकाम करून आहेत.श्रीमंत  खंडेराव होळकर याजकडे श्रीमंताची कृपा सोके करून त्याजला दोलतीचे काम सांगितले. नानाचीही कृपा यानी महायात्रेस जावे दाजीबा दीवानही पुणीयात बसुन आहेत.श्रीपतराव भैराल ही चांदवडहुन कैद होते ते सोडवून पुणीयास दाजीबा जवळ पावले कारभारीही आतुन त्याजकडेच आहेत पारनेरकर नागु बालासाहेबापासी कारभारी पाराजी बाबा सुध्दा करीतात येसी खबर येथे आपल्याकडे देशचे वर्तमान ता: राजश्री दादोबाची पत्रे येत असतील ते खरे आम्हीही काही कामामुळे लस्करात राजश्री दादाचे भेटीस गेलो होतो तेथे महालोमहालाच्या वराती स्वार होलकर पवार याजकडे जाल्या ते पाहीले परंतु आपले महालाची काही द्रीस्टीस आले नाही. त्याजवर आपले स्नेही जे त्याजला आम्ही बंदोबस्तावीसी सूचना आपले महालाची केली जेथे दंधरा सोलांची जमा पाच पदरी पडत नाहीत. दीवाण रामराव आपाजी याजकडुन येथील काम आमचे मामाकडे आहे तेथे कदाचीत वरात स्वार जाउ लागल्यास सूचना आम्हांस कळल्याखेरीज महाली बखेडा जाऊ न घ्यावा मनोहरपंत आपले सोयरे याज देखता बोलणे केले गोविंदराव श्रीपत येशवंतराव सोदे खळोजी सोंदयांचे पुत्र त्याजला सांगोन बंदोबस्त ठेवीला आहे. ते दादापासा मुसीब आहेत हजार पंधराशे स्वार त्याचे पतक आहे वडिलास कळावे चिंता नाही बहुत करून तेथेच श्रीप केली वरात होनार नाही तिकडून मा ही याचा नाही कदाचीत जाली तरी बंदोबस्त करू मनोहरपंत भाऊनीही पत्र लीहले ते पावेल बाजीराव जयेतराम तेथे आहेत. त्यास जयेतरामजीस धारेस बिदा करावे. पवाराकडे ब रंगराव आपानी तूर्त येथून फौज हजार स्वार व काही पलटणचे लोक पाच चारशे व तोफा नेल्या. ते तूर्त या मसलतीत तालबेताल मणवलेकडे जमयेत येत नाही तेथेही आपाकडील एक दोन पत्रे आम्हास आली जे सला होत असल्यास तुम्ही धारेस जाऊन मेनास आणावे धणी आनंदराव बाबा आम्ही सेवक त्यांचे आज्ञेप्रमाणे काम

करू दरम्यान अंतर होणार नाही या कामात पाच रूपये दरबार खर्च पडल्यास तुम्ही कबूल करावी आम्ही सावकारी निशा उजेनीस देऊ तेव्हा सर्व मजकुर येथून श्रीमंतासी लीहीले आहे उत्तर आले नाही तेही अभीमानावर आहेत. मुख्य गोष्ट सला जाली तरी आपलेही कामाचा बंदोबस्त होईल व आसामीही पुर्वपार आहे ती धडेल प्रयेत्न फार करीती श्री येश देईल तो सुदीन त्यास आम्ही पत्रे लीहीतो परंतु कोणी मसलती मणुशेही पाहीजे त्यास जयेतरामजीस जरूर बीदा करावे म्हणजे येथन वरचेवर पत्रे लीहु त्याप्रमाणे येजमानास हायेबतराव बाबास समजोन गोष्ट जमावात आणून घेतील यस्तव ली// आहे काबलीमलजीनींही खाशास  व मजलसराव याजला येवाशी बहुत दूर आदेशी विस्तारिली// आहे इतकयावर त्याची मर्जी त्यास जयेतराम यास पाच च्यार रूपये लागले तरी खर्चास देऊन  जरूर बिदा करावे राउजी भाऊकडे मामलत साफ राहात नाही त्यानी हरामखोरी केली याची चिंता नाही श्री लवकरच बंदोबस्त करील चिंता नाही आपाकडीलही जाले तरी मलजीचे नावे तेही राजी आहेत. चिंता नाही बाजीराव याजला तेथे आसो देवावे फौज अपानी नेली ही येक मसलतीनेच नेली ते बदनाबरचे मार्गे नेली शेहे आहे वरकड आतून सल्याची पत्रे व कारकुन येथे आहेत आम्हीही आपास उत्तर लिहीले जे जेथवर होईल तेथवर आपली चाकरी करून देऊ येजमानाची पत्रे काही नरम आली म्हणजे मी जातो मग जे समक्ष बोलणे ते बोलून आपले त्यांचे पूर्वत प्रमाणे स्नेह पडे ते करू दोन तीन पत्रे आपली गेली व त्यांचीही आली वडिलास कळावे लोभ कीजे हे विज्ञाप्ती.

---

लेखांक ४२ श्री कार्तिक शु//९शके १७२०

पै छ ८ जमादीलाखर सन १२०८ १७ नोव्हेंबर१७९८

श्रीमंत सौभाग्यवती कनकचुडेमंडीत बाईसाहेब साहेबाचे सेवेसी

सेवक अमृतराव नानाजी सा//नमस्कार विज्ञापना ता//आश्वीन शु//१४ पावेतो जाणुन स्वामीये महाराजाचे कृपेकरून समस्त मंडळी लहान थोर कुशलरूप आसो या नंतर महाराजाकडून बहुत दिवस जाले पत्र येऊन सांभाळ होत नाही तर आसे नसावे संदैव पत्र पाठवून परामश करीत जावे ईकडील वर्तमान तर सरकारचे पत्रावरून सर्व ध्यानास येईल रा// दाजीबा गोसावी राजश्री लखबादादाच्या लस्करात आहेत कुशलरूप आहेत खजुरीहून पत्रे आली ती आपल्याकडे पाठवीली आहेत ती पावतील राजश्री येशवंतराव होळकर व सामराव महाडीक व भगवंतराव--- यानी सातआठसे जमेत घेऊन देवाळपूर लुटले आणी इकडे आले त्यास येथे ही बातमी होती त्याजवरून सावध होतो तो त्याची स्वारी आली ती फरीद साहेबाचे वाटेवर जतीचा कुडाजवळ उतरवले गावात माणुश येऊ दील्हे नाही गाव सजुन बसलो होतो आम्हीही जमेत मेळवली होती सदाभाऊ वगैरे सर्व आले होते त्यास आपलीही जमेत फार पाहून त्यानी कच खाल्ली नाही तर ठाणे बसवावे ऐसा बेत करून आले होते त्यास शु// नवमीचे दिवसी आले त्यास खर्च वेच चंदी पटे वगैरे बाहेरच दिला व दुसरे दीवसी दसरा ऐसे जाणोन बकरी व साहीत्य ऐसे थोडे बहुत दिल्हे आणी भाकरी करावयास लागले तो आम्ही मोर्चे गावापासून त्याचे लस्कराजवळ बसवले तो त्याणी स्वारी तयार केली ते बातनी कळताच स्वार वगैरे बंदुकी आणखी भील ऐसे गावाबाहेर उभे राहीलो तो समये पाहुन त्याणी मागे चाल करून परभनी वरून महेतपुरची वाट धरली तो बरखेडास भेटी करता खटपट केली त्याणी कजीया केला भेट काही दील्ही नाही दील्ही होती ती मागे घेतली पुढे महेतपुरास जाऊन तेथे आपसमधे भांडले कारण जे सीबंदी खर्चास मागु लागली त्यास काही दिल्हे नाही म्हणुन कजीया जाला मग सामराव महाडीक व येशवंतराव उभयता पळुन गेले आहेत हे वर्तमान आले आहे माहाराजास कलावे रा//लखबादादाची फौजाचा दंगा आहे त्यास काही चिंता नाही माहाराजाचे पुण आहे तो सर्व पार पाडील आपले कुशलतीचे वर्तमान ल्याहावयास आज्ञा करीत जावी बहुत काय लिहीणे लोभ करीत जावे हे वीज्ञापना.

---

लेखांक ४३ श्री

१ डिसेंबर १७९८

श्रीमंत राजश्री आबाजी स्वामीचे शेवेसी वीनंती सेवक अपाजी जाखदेव व दादो भैराळ चरणी मस्तक ठेऊन सीर साष्टांग नमस्कार विनंती वीज्ञापना येथील क्षेम ता//छ २२ रोज जमादिलावल कार्तीक व//८ रवीवार मु//पुणे

( महत्वाचा भाग फक्त या पत्रातील असा आहे ) लस्कर खराब रोजमरा नाही श्रीमंताची हुजरात मानकरी होलकराचे लस्कर एकरंग अन्न जास्ती वस्त्र जास्ती सोंदे ताजे रोजमरे लोकास वस्त्रे ज्याहानाबादी पोशाख पागा कारखाने भर चंदी पावेतो सोंदयाच्या घोडीयास नाल वरकड लस्कर खाशा घोडीयासी नाल नाहीत होडेचर्म मात्र आहेत गवत नोमे पोट मिलते सोंदे मंत्र्यास दोन  कोटी रुपये श्रीमंतांनी पन्नास लक्ष रुपये देऊ केले ते घ्यावे लोकांची तलब धसली नालबंदी समजाबीसी घ्यावी लागती लोक धरणी बसतात हुजरे बाणाजी कान्होजी वीठलपंत कारकुन त्याचा सीकेनीस पागनीस सोंदयांनी मंत्र्यांकडे पाठवीले पैका देणे दौलतराव बाबास लोकानी आडवीले मंत्र्यास मागणे नेट लावीले त्यानी दोन तीन वेला सरकार वाडीयात येऊन श्रीमंत राजश्री अमृतराव साहेबास नीराले घेऊन सोंदयाचे देणे नीकट जाली त्याजकडे भरणा मनस्वी पावला आता पुष्कळ ऐवज मागतात आमचा पराकास्टा झाली श्रीमंत धणी त्याजला सर्व उपकार सोंदयाचा आता आमचे प्राण राहत नाहीत सोंदयांकडे ऐवज येणे वी // पाटीलबाबा अलीकडे वी // दौलतरावबाबा जमा येणे सर्व झाडे तपसीलवार दाखवीले सरकार जमा ऐन त्याजकडे मामलेदार सरकारचे रसद ते नेतात ऐसी असोन आता अडीच कोटी रुपये बाणाजी वगैरे नीत्य येरझारा करीतात आमचे गा-हाणे श्रीमंतास कलावे आपण सावध आहेत त्याच्या श्रवणी घालावे पुढे राजे त्याचे काय बंदोबस्त करीतात आमचा उपाये सरला सर्व पुणे वाणी उदमी सावकार रोजगारी सरंजामी कारकुन सोयरे आप्त सर्व नागवीले भरणा सोंदयांकडे केला मागती त्याचे मागणे नीकड बसली उपाये नाही सरकारात सीलक डागीणे जव्हायेर त्यात छेतीसा लक्षाचे डागीणे श्रीमंतास सांगुण सोंदयास दयावे राजे त्याचे राखतील तरी मर्जी कोन्हास देतील तरी आमचा उपाय नाही हुजरात मानकरी सरंजामी सरदार सर्व मोकले जाले दोन वर्ष रोजमरा नाही पागा कारखाने उपासी दरमहा पाच सात चंदया मोघम देतो घोडी हाती उंटे सर्व मरतात श्रीमंतास कलत नाही स्वस्त नीद्रास्थ रावसाहेब  श्रीमंतास सांगावे काय उत्तर देतात कलवावे त्याचा रुकार पडला.

आपण छ.१९ राजी सरकरवाडीयात यावे उभयता श्रीमंतास समजाऊ मंत्र्याचे उत्तर आमचे कारण नाही काळे पिंगळे सेळुकर गर्दे स्वामीकडे येतील त्याजला घेऊन श्रीमंतास सर्व कलवावे यात खुलासा निघल रावसाहेबी उचर केलेनाना आपण याल तर त्यात फार गोड आहे छ.२० रोजी अमृतरायांनी आपला कारभारी गणेशराव दोन वेळा नानाकडे पाठवीला जरूर येणे चार घटी दिवस राहता सरकारवाडीयात श्रीमंत अमृतरायांकडे आले दोन घटका उभयेता बसले खलबत केले नंतर काळे पींगले गर्दे सेलुकर मंडळी सुध्दा श्रीमंताकडे आरसेमहालात गेले प्रहर रात्री पर्यंत खलबत भारी केले नंतर संध्येस सर्व आपापले घरास गेले सोंदयांचे आगत्य श्रीमंतास सर्व प्रकारे अगत्यवाद खरा त्याजला राजी राखावे हे

मानस मुख्यांचे मंत्र्यास संकट जव्हायेर देण्याचा अर्थ मर्जीस येत नाही सींदयाच्या ऐवजाची कालजी नानास बहुत आहे श्रीमंत बालासाहेब सुखरूप पागे बारगीर पौरगे शागीर्द पेशा पलटनाचे लौक पौटाकरीता गवगवा करीतात रघुपत खंडेराव दौलतीस अपाय करीतात खंडेराव कृष्ण यांच्या व//काम घेतले नाही रघुपतराव खोटे सींदयास समजावतात खंडेरायास आपण सांगितले काम दीवापगीरी हौलकराची कर्णे ते नारौगणेश यांचे भाचे दाजीबा यानी कामात प्रवेश केला खंडेरायास दातघासी पाडले पाच लक्ष रुपये आपणास दील्हे पाच माघ शु//५ देतौ सावकारी नीशा केली दाजीबा पैकेकरी आहे पाच मामासी देन्हार ते आज मागावे दौलतरायानी उचर केले काम जाले सावकारी नीशा केली आता मागणे केले तरी थौरास यौग्य नाही बाणाजीस रघुपतरायांनी उत्थापण दीधले त्यांचा रघुपतरायांचा कारकुन उभयेता पाच स्वार बाणाजीचे दाजीबाच्या घरी धरणे बसले पाच लक्ष आज दयावे पन्नास रूपये दुरौजा खर्च दाजीबानी भरला नंतर चिरंजीव बालासाहेबांकडे म्या पाठवीला सींदयांची चीठी नस्ता रघुपतरायांनी कार्पन्य केले कारकुन स्वार दाजीबाकडे बसले आपण नरसिंहरूप धरावे त्याजला रूबरू बौलावून दौलतरायाची चीठी दाखवा मग सांगणे ते सांगु त्या प्र// कारकुन उभयेता पाच बारगीर बाणाजीचे रूबरू बालासाहेबांनी बौलावीले चिरंजीव जवळ बसला त्यानी उत्तर खाशास केले दौलतरायाची चीठी कौठे ते दाखवा त्याचे उत्तर चीठी नाही रूबरू आज्ञा आहे येसे ऐकता रागास आले चीठी आणा मग उत्तर देऊ हे न जाले तरी स्वस्त चंदी खाऊन राहणे दाजीबाकडे मागणे केले तरी पारपत्य करू रघुपतरायाच्या कारकुनांनी उत्तर केले दौलतराव बाबा सावकारी नीशा ऐकत नाहीत आज ऐवज मागतात त्याजवर बालासाहेब रागे भरले रघुपतरायाच्या बापाचे कौन्ही लागत नाही पारपत्य करू चाकर आमच्या हीमायेत दौलतरायाची दाखवीतौ त्याजला कौन भीतौ स्वस्त बसले मयपतरायास रघुपतरायाच्या कारकुनांने सांगीतले आपण काही दादा पक्ष राखीला नाही दादास कलले तरी तुम्हावर उलट हौतील चीरंजीवाणे उत्तर केले धणी सावध आहेत तेथे दुसरे उत्तर कारण नाही तसाच चीरंजीव नीघाला मंगळवार पेठेत रघुपतराव त्याजकडे आला तेथे खंडेराव कृष्ण त्याचे घरी नमस्कार जाला रघुपतरायांनी मनस्वी बौलणे दाजीबा सुध्दा धण्यास बौलले ऐकुन घेतले मार्ग सौडला पुढे सर्व कल्याण रघुपतरायांचे हौईल तर्क केला चार घटका बसुन चार गौष्टी मार्गाच्या बौलणे जाले दाजीबा तुमचे मित्र बालासाहेब धणी त्यांचा अभिमान पुर्वी धरला त्या प्र//पुढे दौलत राखणे सींदयाचा तगादा त्याजला दादा तुम्हास हे चांगले दीसते की काय नंतर खुलले खंडेराव दादा याजला तौंडघासी पाडले आपण कारभार करीतात आम्ही कंठ केले चार रूपये खर्च केला तौ बुडतौ आता दौलतरायाकडे जातात पैका आज घेऊ हौलकराची दौलत पाणीयात घालीतौ दौन वर्ष मेहनत केली तीचा उपकार मानीत नाहीत धनी दौलतीस जाले मलारराव मारला नीमीत्य मजकडे आले आता हे जगुन

उपयोग काय खंडेराव दादा याजला दगा दीधला दाजीबा दाहा लक्ष रूपय आज सींदयास भरतील भरवसा आहे मग चालवाचालव का करीता आता मल्हार शामजी हाती धरणार नानाकडे त्याच्या हाते सुटावणार म्या मेहनत केली येकसुत्री दौलत केली येक गाव चांदवड महालात सांगावे सालाचे पाच हजार तनखा दोन हजार वसुल ते बक्षीस दीधले पन्नासा हजारांची जागीर मजला दयावी उपकार फीटणे कठीण आहे मनस्वी बोलतात चंपासैष्ठी उत्सव आला दाहा हजार रूपये बालानी मजला दयावे मयेपतराव तुम्ही धण्यास सांगावे लोभ कीजे हे वीज्ञापना.

---

लेखांक ४४ | श्री | १ जानेवारी १७१९
पै.छ २३ मंगलवार--- | मार्गशीर्ष व//१०शके १७२०
माहे रजब सन १२०८

विनंती वीज्ञापना ऐसीजे आम्ही नीधोनेहून शुक्रवार संध्याकाळी आली शनिवारी स्वाराचे होते रूपये साडेसातसे धोकटी भरून ठेवीली व पाचसे रूपये चांदवडी मोजून ठेवीले स्वाररविवारी प्रात:कालीच रवाणा करावे तो श्रीमंत मातुश्रीजीजीबाईकडील फौज अस्तगावावर होती तीच करजगावीशनीवारी त्रीतीय प्रहरी दाखल जाली मुकाम वेसीपासी खल्यावर जाला तेच दिवशी राजेश्री बालाजी येशवंत पुणीयाकडून आले त्याजला करजगावी हटेसिंग यानी मेजमानी करीता राहवीले तो हा गलबला बाहेर जाला तेव्हा ते भोजन करून तयार होऊन बाहेर निघाले त्याचे बीडार आम्ही व हटेसिंग याचे घरची मंडळी जीव घेऊन मात्र निघून अंमलनेरी आली त्यांनी करजगावी लुटून गावकरी यास हाणामार बहुत मारले गावकरी झाडून धरून बसविले गावात घोडी हटेसिंगाची दोन व आपले स्वारीची चार व मोकासी याची दोन सुतार मानभाव याची दोन ऐसी नेली सरकार वाडा झाडून लुटला वस्तभाव भांडेकुंडे कागदाचे रूमाल वगैरे आदी करून झाडून नेले शंभर माणूस वाडयावर आले होते इतका मजकूर शनिवारी संध्याकाल पावेतो जाला रवीवारी काय होईल ते पाहावे थोरलया नेवासीयावर शंभरस्वार शनवारी मागील चार घटका रात्र राहता गेले खाबगावची दशा कैसी होईल ते पाहावे करजगावची वस्ती बुडाली गाव लुटला गेला पुढे काय होईल ते न कले जबानी सविस्तर वर्तमान महार सांगता ध्यानास येईल करजगावचा बंद धरून गोटात नेला रात्री गावचे गावकुसानी चौकया बसवुन वेसीपासी चौकी मातबर बसविली गाव लुटुन पुढे

खंडणीचा डौल घातला आहे हा उपद्रव होईल म्हणोन आदौ दोन चारदा सेवेशी विनंती लिहीली परंतु मजकूर ध्यानास न आला रयतीचे व आमचे कपाल धण्याकडे शब्द नाही हे विज्ञप्ती रविवारी वर्तमान की चार हजार खंडनी बिनीचे खर्चासुध्दा घेऊन ठाणे बसवून सेवागावी जाणार बहीरजी हुसींग याजला फार मारले आयुष्य असलीया वाचल गावचे गाडे झाडून नेले.

---

लेखांक ४५ श्री मार्गशीर्ष व//१० शके १७२०

१ जाने १७९९ प्र//छ २३ रजब सन १२०८

श्रीमंत राजश्री खंडेराव होलकर सुभेदार श्रीमंत राजेश्री भाऊसाहेबांचे शेवेसी आज्ञाधारक मोकदम मौजे करजगाव सा// दडंवत विनंती विज्ञापना येथील क्षेम ता// मार्गशीर्ष व// ७ जाणोन स्वामीचे कृपाकटाक्षे कुशलरूप असो विशेष राजश्री राणेखाभाईचा भाचा नुरखाभाई नी//याची पागा पथक वगैरे पायदल यांचा मुकाम मौजे चांदेगाव ता.बेलापूर येथे होता जाणुन बातमीस महार पाठवीला तो कुच मुकामाचे येकंदर समजु देत नाहीत आणि आम्ही वसवस बालगावा तरी राणेखाभाईची पागा वफौज बेफाम असता अकस्मात शनीवारी व.//६स दोन प्रहरी हुल गर्दी न होता पुढे जातो म्हणोन आवई टाकून गावास वेढा घातला दरोबस्त चौकीबंदी जाली त्यासमई रा// व्यंकाजीपंत दादा ठाणीयात होते हटासिंग भंडारी यानी रा//बालाजी येशवंत यास मेजवानी केली तेही गावातच होते मुकाम येथे जालीयावर नेवासकर बालाजी येशवंत या समागमे दादाही नीघोन गेले मागे आम्हास त्याचे समक्षच धरून बसविले की घासदाणा वगैरे बाहेबुदी करणे त्यावरून त्याची तजवीज सायंकालपर्यंतकेली नंतर पाटील व कुलकर्णी श्रीमंत भाऊसाहेब व कारभारी यास नेऊन गारदी यांचे पाह-यात दिल्हे रात्री कोलदांडे घालून थंडया पाणीयाने शचील स्नाने घातली वीस हजार रुपये खंडणी देणे ऐसे म्हणो लागले मग रवीवारीही प्रात:काली खाटेवर पाये अटकावून झोका देउ लागले ते अवस्था लीहीता पुरवत नाही रवीवारी दोन प्रहरानंतर अमलनेरकर पाटील व पाणेगाव मांजरीकर पाटील येऊन खंडनीचे बोलणे लावीले तेव्हा अधिकोचरच आम्हास मार केला की मध्यस्त कशास पाहिजे वीस हजार रूपये या घटकेस रोकड दयावे म्हणोन एकच गर्दी उ विली तेव्हा अमलनेरकर वगैरे मौजे मजकुराचे पाटील म्हणो लागले की मध्यस्त न पडोन याजला जीवे मारून रोकड रूपये मिलत असतील तरी घ्यावे

ऐसी मसलत रात्र पावेतो जाली मग काहीसे वाटेवर भाई मजकूर येऊन म्हणो लागले की निदान दाहा हजार रूपये दयावे मीनतमाना कर्ता कर्ता खंड सरकारचा रूपये तीन हजार ३००० केला सिवाय अंतस्थ रूपये पाचसे कबूल केले याप्रमाणे मौजे पाणेगावकर कोळाजी पा//यांचा चिरंजीव सुलतानजी पा//यानी ठाणसिंग डोंगरवाल हुडीवाले याजपासून रूपये अकरासे नख्त कर्ज घेऊन दीलहे बाकी ऐवजाची हमी चौ राजाचे मुदतीने दीलही आहे राणातील शेते तमाम उपडून पायेमाल करून गावात हलीहरामी शिरोन वस्तभाव वगैरे पांघुर्णे व घोडी भांडी नेली ऐसी दशा आमची जाली कोणे विषयी ठीकाण राहिला नाही इंदमूत वर्तमान झाले तैसे लिहीले असे स्वामींनी ध्यानास आणुन अक्षरशाहा मनन करून आमचा तरूणोपाये योजावा तरच ठीकाणुक आहे आणखी वर्तमान बेलापुरावर राणेखाभाईची पागा वगैरे पथक लष्कराचा मुकाम ऐकतो वर्चाविर येक येक अदावली येणार त्याचे निवारण श्रीसर्वोत्तम अथवा साहेब करतील सैवेसी श्रृत होये हे वीज्ञापना ता// सरकारवाडीयातील घोडी वगैरे दरोबस्त वस्तभाव नेली गावातील गाडे बैल झाडून नेले माघारा येथील तेव्हा खरे चौथाईवालयाची घोडी चार व हटेसिंगाची नेली आहे साहेबास कळावे.

राजश्री भवानीपंत बाबासाहेब शेवेसी विज्ञापना साहेबास विनंती पत्र लिहीले हे निवल वाचून आमचा बचाव कर्ते आहाच सविस्तर लेहून जाणवावे ऐसे नसे कळेल तैसे आमचे पाळण करावे हेच विज्ञाप्ती.

---

लेखांक ४६ श्री ५ जानेवारी १७९९
मार्गशीर्ष व // १४ शके १७२०

चिरंजीव राजश्री केशवरावभाऊ यासी प्रति रामराव आबाजी आशिर्वाद

उपरी बेथील कुशल ता // मार्गशीर्ष व // पावेतो सुखरूप आसो विशेष तुम्ही कासीबा बाम्हण्या व विठुमाली या समागमे पत्रे पाठविली ते पावली लिहला मजकूर कलला ऐसीयास करजगांवचे वर्तमान ऐकोन चितास जो खेद जाला तो पत्री कोठवर ल्याहावा पत्र येताच श्रीमंत राजश्री बालासाहेबाकडे जाउन वर्तमान सांगून बोलावे तेही बोलली परंतु तेथे काहीच ठिकाणा नाही तेव्हा करावे ते काय तदनंतर श्रीमंत राजश्री पंतप्रधान व राजश्री नानाचेही श्रवणी वर्तमान घातले बंदोबस्त करतो ऐसे मुखे करून मात्र सारे समाधान करतात परंतु कोणी जमेत पाठवून हारामखोराचे परिपत्य होत नाही तुमचे पत्र आल्यापासोन चित्ताचा बहुत क्षोभ जाला आहे परंतु नाईलाजास काय करावे समई पाचसातसे स्वार जरी येजमानाचे पदरी असते तरी आम्ही जातीने रातोरात जाऊन शत्रूचे पारिपत्य केले असते तो अर्थ याजपाशी काहीच नाही याजमुळे उपायच राहीला आसो दैवी होणार ते चुकत नाही श्रीमंताकडोन जीजीबाईस ताकीद बहुत करविली आहे. परंतु गावचा नाश होणे तो जाला खांबगावची गती काय जाली असेल येकाएकी दगा गुलामानी केला आदी कलले असते तरी सिबंदीची तरीं माणसे ठेवली असती येकुण दैवयोगापुढे उपाय काय तिकडे असा प्रकार करून पुढे काय होईल हाही भरवसा येत नाही तस्मात संहार काळ जो येणार तो आजच्या सरदारांच्या संगतीने आला ऐसे जाले येथे कोणत्याही गोष्टीचा ठिकाणा राहिला नाही याजकरता तुम्ही पलसीची सावधानी बहुत खबरदारीनें राखावी गाफील सर्वात्मना न राहावे राजेश्री गोविंदराव येशवंत सिंदो माणसासुध्दा तुम्हापाशी आज तागायत पावले असतील त्याजला जागा नेमोन देऊन जाबता चांगला राखावा चहुकडून बातमी राखीत जावी दारूगोळयाची खरिदी जरूर करावी आता कोठीलही भरवसा न धरता आपल्या बलाने आपली आबरू राखावी तरच राहील नाही तर काही चांगले नाही येथे यजमानासी मनस्वीपणे भांडलो कीं तुमच्या पायी आमचा हा खराबा जाला तुम्ही डोले झाक करून कसे बसला आहा तुमच्याही सेवगावची व लेकीची दशा हेच होईल तेव्हा त्यानी गोपाळ दिनकर व सिंदो आसामी पाचशे आसे व कलगावडे यांचे व्याही सेवगावी आहेत. त्याजपासी जमेत आहे त्याजला व या जमेतीस पाठवून हारामखोराचे पारिपत्य करावे अशी पत्रे पाठविली आहेत येथील वर्तमातंरी राजश्री दौलतराव सिंदे याचे कुचाचा बेत जाला आहे तेवीस लक्ष रूपये द्यावे असे ठरले आहे त्याजला ऐवज द्यावा त्याची व्यवस्था श्रीमंतांनी गाईकवाड वीस लक्ष व होलकर पंचवीस लक्ष ऐशा वराता केल्या आहेत गायकवाडाचे कारभारी रावजी आपाजी येथे आहेत त्याणी वीसा लक्षाची सावकारी निशा दिल्ही होलकर यांचा ठराव करावा म्हणोन राऊत तगाद्यास आले येथून कारभारी व आम्ही जाऊन दौलतीचा हालहवाल सांगून राऊत उठविले परंतु सरकारचे म्हणे पडले आहे कीं आमचा सरदेशमुखी बाबतीचा ऐवज तुम्हा कडोन हिशेबी वाजवी पन्नास लक्ष रूपये येणे

याशीवाय तुम्ही सरकार महालातून लाखौच घेतले ऐसी जाबसाल पडले आहेत आणी येथे तर सरदारीत काही ठीकाणा नाही आज आठ दिवस नेहमी सिबदी लौकाची धरणी बसली आहेत कौणास हलुचलु देत नाहीत आणि सरकारचे तर नेट असे तेव्हा सरदारीचा परीणाम कसा हौईल हेच चिंता येऊन प्राप्त जाली आहे श्रीमंताचे मानस याणी सुधामते ऐवज घेऊन सिंद्यास द्यावा आणी याचे कुच करवावे ऐसी निकट बसविली आहे याचा परीणाम ईश्वरच काय लावील तो खरा ऐसे संकटांत आम्ही रात्रंदीवस आहोत या खेरीज दरा सावकाराचे देणे बर्दविदास ऐवज बाराची भरती करणे ऐसा घौर येकदाच येऊन प्राप्त जाला आहे श्री जगदंबाच कृपा करील ते खरी असा हे वर्तमान ऐकौन तूम्ही उदास न व्हावे नी सरि पार पाडील हेही दिवस जातील बहुत काय लिहीणे हा आसीर्वाद प // छ २७ रौज शनवार दीड प्रहर दिवस रजब सन १२०८.

---

लेखांक ४७ श्री सौमवार १४ जानेवारी १७८९
पै छ ७ साबान सन १२०८ पौष शु // ८ शके १७२०

स्वामीचे शेवेसी उभयेता सेवकांचे अनंत कौटी सिर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील क्षेम ता // इ. २२ साबान मंगळवार मु // पुणें स्वामीच्या पुण्यें प्रतापे कडून सेवकाचे वर्तमान कुशल आहे विशेष येथील वर्तमान दिनचर्ये पत्र ई // छ ८ रौज मंगळवार छ १३ आज लखौटा जीमे रामभाऊ छ १४ रौज ता // छ १५ रौज मंगळवार मिनहु पत्र इकडील भिरगु जगथाप खाना केली पावतील अलीकडे वर्तमान सिंद्यानी निरोप कृष्णराव चिटणीसा समागमे छ १५ रौजी रात्रिसि श्रीमंत राजश्री नानास सांगुण पाठविला कुच करून मौजे मांजरी मुकामास आलो लौक तलावर राहिले कुच करीत नाहीत आपण एक हप्ता दाहा लक्षाचा आदा केला. जांबगांव कौरेगांव पंधरा देन्हार ते आता द्यावे लौकास थौडे बहुत देउ तेव्हां कंपुचे सरदार कुच कर्तील नानानी निरौप ऐकुन कृष्णरायास निसिध्द केले यादी ठरली हप्ता प्रमाणे ऐवज पाठवावा त्याप्रमाणे प्रथम मु // पावला आता बौलता हे काय या कामात इंगरेज कलकतेकर त्याच्या विद्यमाने यादी ठरली छ १६ रौजी प्रात:काली बज्याबा सिरौलकरास आज्ञा जाली सिंद्याच्या लस्करात जाऊन त्याजला साफ सांगावे कराराप्रमाणे ऐवज पावले अलीकडष निमीच ठेऊन मागता

करणाल कलकचेकर याच्या विद्यमाने कारभार जाला आता कुच करावे हे चांगले बज्याबा राहुटी कंठाल सुधा बारा घटका दिवसात गेला मागाहुन मेस्तर कर्णाल माघारा चार घटका दिवस अस्ता आला येक कपुवाल्यास सांगणे ते सांगीतले येक सरदारास दोन लक्ष रुपये पावले. तो मात्र गेला दोन सरदार तोफखाना नीमे लस्कर तलावर स्वस्त आहे छ १७ रोजी आबा चिटणीस राजश्री नानाकडे ऐवज प्रकर्णी बोलावयासी आले. प्रात:काळी रायाजी पाटील येऊन गेले नानाच्या शेरिरास ज्वराउंष जाला आहे श्नान नेहमी पंधरा दिवस वर्ष तिसरे दिवशी स्मश्रृ होत होती ती आता पंधरा दिवसा करावयास जीव भितो वैदयानी श्नान बंद केले आहे पुर्वी वैदय लक्ष्मण शास्त्री तेलग ब्राम्हण पूर्ण उपासना श्रीसांबजी त्रिकाल पुज्या बहुत रसा येणे त्याच्या वी//घेतली अलिकडे त्यासी वाकडे आले निमित्य त्याचे ऐवसेद घेत नाहीत इतर वैदय करितात त्याजला याची तन कलत नाही आजार सुटत नाही दोन दिवस कोन्हाचा नमस्कार नाही जाणे बोलावणे तरी चिमणाजीपंत तशात आबा चिटणीस येऊन आत्माराम बाबाच्या घरी बसले कारकुन येऊन वर्तमान आले हे सांगितले नानानी नारोपंत चक्रदेव चिटणीसास बोलावु पाठविले ते आले नाना आबा चक्रदेव तिघाचे खलबत तीन घटका जाले ऐवज प्रकर्णी बोलणे कुच करावे बेत बोलतात तो बज्याबा सिरोलकर कृष्णराव चिटणीस विठलपंत आले चिमणाजीपंतास बोलाविले आपण पलंगावर निद्रा करून यासी बोलणे पाच घटकापरीयंत रात्र जाली दाहा लक्ष पावले आणीख पाच घ्यावे पोलण्यात आले त्याचे बोलणे अठरा कपुंची बाकी देणे तूर्त पंधरा घ्यावे तेव्हा त्याचे कुच होईल येथे तो घंटानाद आहे श्रीमंत स्वस्त मंत्र्यांच्या गला गोणी याजकडून मामलेदारास पीडा आहे गोविंदराव काळे सिंहगडावर त्याजकडे ऐवज ठरवावा निमित्य कुंजीर पाठवावा निरोप श्रीमंतांकडे पाठविला आपले कारभारी पलटण येतात दिवसभर निद्रा घेतात अस्तमिती चिमणाजीपंत नारोपंत बज्याबाची गाठ पडती एक दोन उत्तरे बोलतात रात्र जाली उदयीक येऊ उठोन जातात छ मारी दाजीबासुध्दा मंडळी लस्करात गेले येजमानासी खचित बोलू अंख ठरला पाहिजे चिमणाजी पंतांस सांगितले आज जातो प्रात:काळी येजमानसुध्दा बलवंतराव वाकडे यांच्या घरास येतो नंतर आपण खचित बोलणे बोलू चिमणाजीपंतांनी रागाचे उत्तर केले लटका काळ घालविता सरकार देणे वरात होती मग जडेल पडेल ऐकोन घेतले चहुकडे पागले चिमणाजीपंत नानाकडे यांचा बेत बोलावयासी गेला येक घटका त्याचा मर्जी प्रसन्न पाहुन उत्तर बोलावे ते बोलुन बाहेर आला कारभारी निघोन गेले चिरंजीव दादास पंत म//री यांनी आज्ञा केली सुर्योदयी लस्करात जाऊन कारभारी मंडळी पुढे घालून येणे सिंदयाकडील मंडळी आबासुध्दा बारामतीकराच्या वाडयात राहिले कंपूच्या वराता होतील छ १८ रोजी शुक्रवारी श्रीमंताची प्रकृती बिघडली सैन्य ज्वराउंश जाला दिवाणखान्यात भस्मेश्नान पाथे घेणे जाले राजश्री आबा चिटणीस मंडळीसुध्दा रंगराव राजेबहा÷र

याच्या घरास मेजवानीस गेले तेथून दी प्रहरी सरकारवाडयात आले श्रीमंता गाठ पडली खलबत दीन घटका जाले चक्रदेव चिमणाजीपंत जवळ हाते त्रितीये प्रहरी आबाजी रघुनाथ राजश्री नानाकडे गेले दीन घटका त्यासी खलबत जाले कुच करविती ऐवजाचा भरणा बेता प्र // सत्वर करावा निरोप मागुन मांजरीच्या मुकामी चिटणीस गेले कृष्णराव बाबा विठलपंत तहसिलीस आहेत नानाची प्रकृत्य ग्लानी जाली पलंगावर निद्रास्थ आहेत अन्न थीडे खातात त्रितीये प्रहरी दादाजी गंगाधर व गाणु नमस्कारास गेले दीन घटका मल्हार शामजी प्रकर्णी बीलणे जाले सरकार आज्ञा हीईल त्याप्रमाणे हजर त्याचा उपद्रव थीर माहालात हीऊन सर्व गावे नागविली त्याजला बीलावून रूबरू सांगावे मल्हार शामजी नानानी बीलावून आणीला दादाजीस दीन घटका बीलणे जाले पंत म//र गंगे गेले गंगादास मथुरेस गेले जमानादास नानानी मल्हार पंतास सांगितले तुम्हाकडील बीलणे बेतात आले या उपरी तुमचा दंगा उपद्रव महालात इतर स्थळी नसावा लीकांस ताकीद करावी माघारा आणावे पुन्हा बीभाट नसावा त्याने मान्ये केले दादाजी उठले पुढे दिवाणखान्यात बऱ्याबा सिरीलकर बसला तेथे आले नाना दादाजी परीक्ष मल्हार पंतासी येक घटका बीलले मल्हारपंत बऱ्याबाकडे आला दादाजी लगत बसले अर्धघटका नव-या प्र// सजुन गीष्टी बहुत जुवा मर्दांच्या बीलीन गेला नंतर आपले कारभारी मंडळ अस्तमिती आले दीन घटका बऱ्याबासी बीलणे जाले त्याणे नानाकडे नमस्कारास नेले अर्ध घटका बीलणे प्रात:काळी येऊन बेतात आणिती आता गुंता ठेवीत नाही ऐसे बीलीन लस्करात गेले स्वामीचे पत्र सेवकास पौष व// चतुर्थीस शुक्रवारी त्रीतीये प्रहरी रमजानी प्रवीष्ट केले बहुत आनंद जाला. स्वामींची स्वारी जाताच शत्रु प्राणामुख जाला हे देणे श्री सांबजीचे चींताहरण श्रीसांब आहे येथुन पत्रे छ ८ ता छ १३ छ१४ छ१८ मीनहु रवाना केली पावतील आपण स्वस्त असावे रक्षणास आपले पुण्ये वडीलांचा आसीर्वाद साकुरकरानी घरपटी प्रातांत ब्राम्हणाची वर्षासने सरकारात जमा केला ईश्वर जवळ आहे धर्म बुडत नाही पाप तरत नाही. र॥ १९ रीज मंदवार आज श्रीमंताची प्रकृत बीघडली. डकार आला आहे. उदकशांती केली.दीन गीदाने श्रीमंत राजश्री आपासाहेबाकडून करवीली आणि कारभारी प्रात:काळी यावे कालचा बेत सूर्योदयापूर्वी दाजीबा आले दीन दीवस येता रावजी आले चार घटका दीवस येता खंडीपंत बाबा भीजन करीन आले वाकडयांच्या घरी जमा जाले दादाजी बलवंतराव वाकडे बारा घटका दीवसा राजश्री नानाकडे गेले दीन घटका अगीदर बऱ्याबा चीमणाजी पंतासी नाना बीलीन याजला बीलावयासी बीलाविले घटका दीड घटका उभेयता दौलत प्रकर्णी बीलने जाले कारभारी मंडळी पुढे दीवाणखाना दरवाजीयावर तेथे बसले नंतर त्याजला बीलावीले नमस्कार जाला आज कुयीग उदयाक रवीवारी येणे आज्ञा जाली मंडळी वाकडे यांचे घरी भीजनास गेली सींदे यांनी आज चार पलटणे सरंजाम सुधा बायांवर रवाना केली त्यांचा मु// रासीना आसपास आहे

बातमी आली त्यांनी कुच करीत नीरा नरसीपुराकडे आलया नीरेवर मु// आहे सग्याबा नींबाळकर यांचे घरची बातमी आली संक्रांतीप्रमाणे जाणे येणे आरंभिले आहे राजश्री परशुराम भाऊचा पुत्र रामपंतअपा पाच हजार फौजेनेसी चौरकंटटे येथे मु// आला भाऊ बदामी अलीकडे दोन मजली आले बातमी सरकारात आली बेलापुरकर मामलेदार याची बातमी आली कालगावडे आबाजी लक्षुमन याची लढाई जाली सीकस्त आबाजी लक्षुमनाची जाली स्वामीचे पत्र येजमानास अगोदर पावले ईनाम जासुदास दीला वर्तमान ऐकीले बायावर चार पलटणे रवाना सींदयांनी केली त्याचा मु// नजीक रासीण आज सग्याबा नींबाळकर याची बातमी आली बाया नरसिंहपुराच्या पश्चमेस नीरेवर मुक्कामास गेलया दौलतरायाचे खासा कुच होऊन मांजरी कवडीवर मु// आहे दाहा लक्ष आदा जाले आणीख पंधरा दयाल तरी कंपु कुच करील याप्र// कृष्णराव चीटणीस वीठ्ठलपंत नेहमी वसुलास बसले आहेत मंत्री पलंगावर नीजोन आहेत आज आपले कारभारी नीश्चये बेतास आले परंतु कुयोग उदयीक बोलु अस्तमित परीयंत वाकडयांच्या घरी मंडळी होती छ//२० रोज रवीवारी प्रात:काळी कारभारी मंडळी येजमान साहेबाची त्यात खंडोपंत बाबा गळले घरीच राहिले वरकड दादाजीच्या घरास आले चीरंजीवास बोलावीले बातमी आणा नानाकडे जाण्याचा राबता आहे बज्याबास वीचारावे आम्ही येतो कानावर मुख्यांच्या घाला त्याप्रमाणे चीरंजीव जाऊण परत नीरोप सांगावयासी आला दादाजी गोवींदपंत दाजीबा श्रीपतराव बलवंतराव वाकडे यांच्या घरास पाच घटका प्रथम दीवस गेले त्याजला समागमे घेतले सर्व मंडळी नानाच्या वाडीयात आले मशारनीले नीजलेस्थळीच होते बज्याबापाशी दोन घटका बोलणे जाले ते पुढे गेले मर्जी पाहून वीनंती केली होलकरांकडील मंडळी बोलावयास आली आज्ञा जाली बलवंतराव दादाजी उभयेता बोलावा नंतर मंडळी नमस्कारास आणावी त्या बेताप्रमाणे केले त्यांनी आज्ञा केली अंख घालावा मग बंदोबस्ताचे बोलणे घडल तेव्हा बलवंतराव दादाजी मंडळीकडे आले वीचार केला येजमान आणावे नंतर अंख त्यांच्या मुखे ठरल ती खरा आता नानास काय सांगावे आज सेष्ठी दाहा घटका आहे कुयोग अस्तमिती येजमान सुध्दा येतो खचीत वीनंती करीतो बज्याबाने नानास कलवीले सर्व नमस्कारास गेले वीनंती केली आम्ही येथच बलवंतरायाच्या घरी राहून मयेपतराव वकील येजमानाकडे पाठवीतो स्वारी त्रीतीय प्रहरी येईल आज्ञा जाली कोन्ही लस्करात न जाणे बाहेर आले दादास आज्ञा केली येजमानाकडे जाऊण नीरोप सांगावा नाना म्हणतात बोलणे ते काशी रायासी बोलु जरूर स्वारी घेऊन येणे बारा घटका दीवस आला उपासा मुल लस्करात गेला येजमानास सांगुण स्वारीचा बेत ठरला पाराजी बाबा खंडोपंतबाबास जासुद पाठवीला तयारी असावी चीरंजीव माघारा अठरा घटका दीवस येता आला दादाजीस कलवीले वरकड ढेकणे यांच्या घरी भोजने केली त्याजला कलवीले स्नान सध्या भोजेन मयेपतरायाचे जाले दाजीबांनी जासुद

बोलावयासी पाठवीला आज्ञे प्र// बालाजीतात्या दादा उभयेता गेले मंडळी वाकडे यांचे घरी जमली येजमानाची स्वारी सा घटका दीवस अस्ता आली पाराजीबाबा पुढे आले सर्वआदी वर पुढील दीवानखान्यात बसले प्रथम खाली सोफयात बसवुण पुढील दीवानखान्यात गेले तो पाराजीबाबा तेथे बसला आहे नानानी बऱ्याबापुढे पाशी खाशास ऐकटे वर असावे सांगावे वाखा आमचं खाली येणे घडले नाही त्याप्रमाणे सोरोलकर आले येजमानसाहेबी खंडोबाबास समागमे घेतले जीना चढता आनंदरावदादा आणीख पांच सात मंडळी वर गेले प्रथम बालासाहेबास येकटे बोलावीले अर्ध घटका त्यासी बोलणे जाले नंतर बलवंतराव वांकडे बोलावीले येजमानाच्या बोलण्याचे पके बोलणे करोन दादाजीस बोलावीले अर्ध घटका त्रीवर्ग हे चवथे नाना बोलणे जाले नंतर कारभारी मंडळी बोलावीली सर्वांस आज्ञा की कासीराव नेणते आहेत सर्वी लक्ष यांच्या केल्यात ठेवावे दौलत राखावी आपापले ओढे प्रथम प्रथक नसावें सर्वी एक आज्ञा पालावी पुर्वी थोरले सुभेदार यांचे उपकार श्रीमंतांच्या पायासी लक्ष राखोन सेवा येकनीष्ठ केली पुढे तुकोजी बावा सुभेदार यानी सरकारचा मार्ग रक्षीला याप्रमाणे सर्वी दौलतीस जपावे श्रीमंताची सेवा करावी अंतर सर्वर्थी न करावे खाशास पानदाने मंडळीस वीडे लोकास वीडे खाली दयावे तबक चीरंजीव दादाकडे स्वहस्ते दीधले दोन घटका रात्र जाली स्वारी लस्करात गेली आज श्रीमंतांनी ज्वर येतो निमीत्त रुपे दाने भेसा वृषभ तुप तेल कापुस गुळ कीरकोल दाणे केली सातसे रुपये दक्षीणा दानावर दीधली सीवाये वस्त्रे कीरकोळ भरणी सांगाता वगैरे तीनसे रुपये स्वहस्ते वाटले श्रीमंत राजेश्री वीनायेकराव बापुचा व्रतबंध माघ शु.// त्रीतीया बेत जाला थत्याच्या घरी जप्ती केली चांदी अठरा हजाराची नीघाली ते टाकसालेस सीका पाडावयासी दीधली पन्नास हजार रुपये नेमीले त्यात अठरा हजार चांदीचे करवीले साहीत्याचे रोखे माहालकरी याजवर जाले सर्व नेत्रास उदक आणीतात छ २१ रोजी ता. छ २ रोज मंगळवार श्रीमंतांची प्रकृत बरीच आहे आपले कारभारी नेहमी पुणीयात आहेत वाकडे यांचे घरी खलबत करीतात प्रात:काळी संध्याकाळी राजश्री नानाच्या वाडयात जातात कोण्ही गोष्ट बेतात नाही सरकार खर्चासुध्दा पंधरा लाख बोलतात तूर्त पाच घ्यावे कारभारी वीचारात बहुत पडले वाकडे म्हणतात पंधरात मागील पुढील घरातील खुळ पध्दी घालतील तरी कबुल करावे तुर्त दोन तीन दयावे यात गोडी आहे सर्व भार नानाकडे सोपावा फडणीस दादाजी याजला कचीपंत म्हणतो दप्तराचा काराभार आपला तो पारनेरकर लोहीतात फकत तारीखवाले तुम्हास केला म्हणतात दप्तर आपले आपण सांभाळावे नीमीत्य खंडोबाबा वीच्यारात पडले आहेत दीवान मंडळी दादाजीच्या रोखात आहेत पारनेरकर चींता करीतात काय घडल कलत नाही चोहोकडून आभालाचे रीकामे ढग फीरतात परीणाम दौलत राहणे कठीण आहे स्वारही गेल्यात जमा आहे आवडाचावडी येशवंतराव समागमे कुरुवाईकर रोहीले भुपालकर पठान पाच हजार सीवाय पेंढारी

कीरकोल जमयेत भील कोळी दुदरनेक याचे एक पलटण तोफा घेतल्या त्या आणोन महेश्वरास गोळे मारीतात हरकुबाई मावसी पार जाऊन त्याजला भेटली गोळे मारू नका शहर लुटल जाईल पाचा दीवसा कीला खाली करोन देतो दुदरनेक जाबांचा घाट चढुन इंदुरास माघारा गेला दौलतीचा फजीता जाला आपली पत्र पौष शु// सेष्टी सप्तमी दोन्ही रामभाऊनी नवमी मंगळवारी पावती केली पावली बहुत आनंद जाला आपण कलेल तैसे करोन मुंजीचा बेत सीध्दीस नेऊन लस्करात जलद यावे सीदे मांजरीतुन माघशरा तलावर येतात वार्ता आहे मंत्री नीत्यानीत्य पाच पंचवीस पावता पंधराचा भरणा करीतात बाया नीरा तीरास बारामतीच्या पुर्वेस साता कोसावर मु//आहे चार पलटणे सोळा तोफा सींद्यानी त्याजवर रवाना केल्या गोपाळराव चीटणीस बाबुराव आंगरे त्याजवर जातात मंत्र्याकडे बज्याबा सीरोलकर मागतात हे देण्याचा आनमान करीतात नासीक प्रांतात गवळी येशवंतराव जीवाजी पठाण दाहा हजार जमुन पाच लक्ष नासीककर रयेतीस मागतात मल्हरशामजी मुछीवर हात फीरवीतो येकही भरवसा कोण्हाचा चांगला पुडे रांजे राखावे दीसत नाही परशरामभाऊचा पुत्र रामचंद्रपंत पाच हजार फौज मंगळवेढयास दाखल जाला बदामी अलीकडे भाऊ दोन मज्जला आले चोहीकडे गर्दी रयेतीवर आहे मंत्री फार करोन नीद्रा करीत आहेत पंधरा दीवस जाले बेलबागात नमस्कारास जात नाहीत भस्मस्नानावर क्रम चालला आहे. फौजस रोजमुरा दोन मास नाही आरबास येक माही पावता केला थोर वीढ सींद्याचा ऐवज भरावा कोणते घटकेत काय घडल कलत नाही लोभ कीजे हे विज्ञापना.

---

लेखांक ४८ श्री

श्रीमंत राजश्री मल्हारजी बाला सुभेदार सा // सेवेसी

सेवक बाबाजी कृष्ण ठाणे मौजे माणीक दौंड कृतानेक आसीर्वाद वीनंती येथील कुशल ता // छ ५ रमजान पावेतो येथात्थीत आसे वीशेष आपले लस्करचे कहीचे लोक येऊन मौजे महीदे येथील आज लुट लबाडी करून कही भरून नेली

महींद्या नजीक ठाणे मजकुरचे शेताच्या ठाणीच्या वयेरणीच्या गंजी होत्या त्या भरून नेल्या ऐसीयासी हा गांव श्रीमंत नाना फडणीस याची खास जागीरीचा आहे येथे लस्करचे कही कबाडाचा उपद्रव काडी मात्र लागो नये म्हणोंन लस्करात ताकीद होऊन बीनीचे लोकास रखवालीची आज्ञा असावी याजकरीता सुचनार्थ वीनंतीपत्र लीहीले आहे मौजे मजकुरचे वाडया व मौज्याची रखवालीस ठाण्यातील लोक आहेत आपल्याकडील पेंढारी लोक बेकैदी करून कहीचा उपद्रव देतील तरी कज्या होईल आणी खटला पडीन दुरदराज लागे असे करणार आपणही अभीज्ञे आहेत नानाचा खाजगी गाव तो आपला ऐसे जाणोन कहीचे लोकास नीक्षोन ताकीद होऊन मौजे मजकुरची रखवाली चांगली करवीली पाहीजे लीहीला मजकुर सवीस्तर नीवेदन होऊन पत्रोचर दयावयाची आज्ञा केली पाहीजे बहुत काये लीहीणे लोभ करावा हे विज्ञापना.

ताजा कलम येवीसी साहेबास लक्ष्मणजी सरकाराचे हुजरे मुखोक्तंर्गत वीनंती करतील तीजवरून सर्वश्रुत्य होईल कलले पाहीजे हे विज्ञापना.

---

लेखांक ४९ श्री १८जानेवारी १७९९

पौष शु. //१२ शके १७२०

पौ छ११ साबान पोषे मु//पळसी सुहुरसन तिसा तिसैन मयावअलफ १२०८

शेवेसी आबाजी लक्ष्मण कृतानेक सा// नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लि // असीले पाहिजे विशेष आम्हाकडून राउत तुम्हाकडे बोलावयाकरिता गोविंदराव खनोजकरसुध्धा आसाम्या चार पाठविल्या होत्या त्यास तुम्हाकडून अडथळा झाला म्हणोन वर्तमान समजले हे काय आपल्याकडून आमचे रावतास व हर कोणी आल्या गेल्यास वाकडेपणा नसावा आपल्या गावाविषई आम्ही वाकडेपणा दाखविला नाही राजश्री रामराव नी// राजश्री बजाबादादा सिरोलकर याजकडून आले त्यांनी सांगितले की आबाजी गावखेडयास आपल्याकडून उपसर्ग न व्हावा म्हणोन कित्येक प्रकारे सांगितले त्याजवरून आम्ही ढाला देऊन कुच केले असे असता आमचेच रावतास अडताला हे काय व आता पत्र पावतान रावतास निरोप दयावा इतिकयावर मर्जी आपली छ११ साबान बहुत काय लिहीणे लोभ कीजे ही विनंती.

रा.पाराजीपंत बाबा यांचे हचीचा सरजाम आपल्यापासी आहे तो सरजाम व हसनभाई माहीत याज बरीबर जो सरजाम असेल तो पाठवून दयावा हे विनंती.

---

लेखांक ५० श्री २३जानेवारी १७९९

बुधवार पौष व //२शके १७२०

राजश्री आबाजी लक्ष्मण गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री खंडेराव होलकर दंडवत.

सुमा तिसा तीसैन मया व आलक राजश्री रामराव आपाजी याजकडील मौजे करजगाव येथील वस्तवनी गाडे घोडे वगैरे तुम्ही नेले म्हणोन त्याजकडून विदीत जाहले त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले आसे तरी मौजे मजकूर येथील घशेडे गाडे वगैरे काय वस्तवानी नेली असेल ती माघारी देणे त्याचे म्हणने पलसी सोडुन आम्ही अथवा कारकुन किंवा मानुस एक त्याचे कुमकेस पाठविनार नाही त्यास ते पलसी सोडुन तुम्हावर येनार नाहीत यास्तव तुम्ही पलसीस कोनपि उपसर्ग न देणे जाणीजे छ १६ साबान पहुत काय लिहीणे ( मोर्तब खुद)

---

टीप:- खंडेराव होलकर हा तुकोजीचे पुत्र सवाई मल्हारराव होळकराचा मुलगा शिंदयांच्या तुरुंगात होता तरीही यशवंतराव होळकर राज्यकारभार इ.स.१८०६ पर्यंत त्याचे नावाने तो मरेपर्यंत चालवीत होते.

---

लेखांक ५१ श्री २३जानेवारी १७९९

पौष व //२शके १७२०

वडिलांचे सेवेसी आपत्याचा सा//नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत पौष व//२ पर्यंत साहेबाचे आशीर्वादे करून येथास्थित असे विशेष

राजश्री बजाबादादाकडे काल गेलो होतो त्यास पत्रे देऊन दाजीबाचे विदयमाने मकार पूर्वकाचे घरी जाऊन निक्षुण पत्राची परवानगी घेतली आहे आज पत्रे तयार करून घेऊन येतो पेशजी पत्र सरकारात लिहीले होते त्यास त्याचे उत्तर व

हली सीमा समागमे पत्रआले त्याचे उत्तर पाठवले आहे.मुसाबास याचे प्रश्न त्याजकडील कप्तानास घेतले आहे हे त्यास देऊन इंगळे याचे पथक वगैरे सबनीस समागमे देऊन मार्ग चांगला दाखवून देऊन मार्गस्त करावे मौत्याजी काळगावडे यांची एक दोन दिवसात गाठ घालून खटका होणार त्यास पलटणची सत्वर रवानगी व्हावी आपली आज्ञा की राजश्री दाजी व बाजी व खंडोपंत बाबास विचार पुसावा त्यास आज्ञेप्रमाणे त्याजकडे गेलो होतो त्यांनी सांगितले की,आपण आपले स्थळ राखून असावे खंडोरामजीस देखील पुढे रवाना करू नका मुंज करून कुटुंब घेऊन इकडेच यावयाचे करावे घरची जमेत आहे ती तशीच असो दयावी दारुगोळयाचे सरंजाम करीत असावा. अंधारी रात्र आली याजकरीता हावायाचा संग्रह करावा कोस आद कोस पर्यंत पुरत अशा आणाव्या याप्रमाणे त्यांनी सांगितले मुत्सदी मंडळी नित्य गावात जाती आपल्यातर्फेचे कोणी येथे येजमानास देखील चांगले नीक्षुन बोलण्याजोगे कोणी नाही येजमानाचे म्हणणे की आपाजींनी सरंजाम घेऊन जावे नथबा कारले मामा आपल्याविषयी थोडे बहुत बोलतो सर्वत्र कारभारी कोण्ही वाडीयात जात नाही मग आपले कामासाठी कोण जातो आज श्रीमंत बापूसाहेब जातीने येऊन धरणे बसले आहेत पुढे पाहावे काय होईल राजेश्री विठोबादादास सबनीस आणावयास गेला आहे आज उदया येतील आल्यावर पत्र देऊन जाबसाल उगउ इंगले याचे घरची मेवाती याचे चौकी होती त्याविषयी कानावर घालुन उठवीली आहे व त्यास पत्रही घेतले व त्यास देऊन पुढे रवानगी व्हावी सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

राजश्री पाराजीपंत बाबानी मल्हार शामजीचा कारकुन व त्यानी आपला कारकुन असे उभयता पाठवीले आहेत की तीस हजार रुपये माघारा दयावे याजप्रमाणे पाठवीले आहेत घडता घडषल ते खरे.

पै.// छ १९ साबान पौष सप्तमी सन १२०८

---

लेखांक ५२ | श्री | गुरुवार पौष व ३ शके १७२०
२४ जाने १७९९ | | पौ छ१७ साबान सन १२०८

वडिलांचे सेवेसी आपत्याचा सा//नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता// पौष शुध्द १५ पर्यंत साहेबाचे आशीर्वादे येथास्थित असे विशेष कालगावडे यास सरंजाम सुध्दा आबाडाकडे जाण्याविषई दोन तीन पत्रे लगट केली आहेत हली आपल्यास पत्र लिहीले की राजश्री खंडेरामजी या समागमे पलटण व स्वार

देऊन पुढे रवाना करणे गोपाळदिनकर वासन जमादार सर्व एकत्र होऊन एखादे खुल मोडावे या नावे लिहीले त्यास सबनीसा समागमे पलटण स्वार देऊन मोत्याजी कालगावडे याजकडे पाठवण्याचे करावे राजश्री खंडोपंत आबास तीकडे वाटे न लावता ईकडे रवाना करावे आपुन आपले घर राखावयास आली हाच भाव दाखवावा शेकती लावून फौजेचा मेल दाहा हजार पर्यंत जाला आहे यशवंतरावसुध्दा सरसी गोष्ट त्यांचीच पडत जाती व नकार पूर्वकाचा पक्ष भारी आहे.येथील मंडळीचे म्हणे हेच पडते की वाकडे न दाखविता कुटुंब घेऊन इकडे यावे आज माघारा परतोन फौज गेलीया भरवस्यावर न जावे ते एक नष्ट आहेत त्याचे शाश्वत काहीच नाही आपण दैववान म्हणोन हे अरिष्ट टळले सर्वांमुखी हेच ऐकतो हेच पार पाडणे सप्तशृंग निवासीनीकडे आहे सीम-यातुन पत्रे खेमराज स्पराज याचे दुकानी आली होती ती आपल्याकडे पाठवीली आहेत पावतील साहेबरामाची वरात सही जाली म्हणोन सावकार याने सांगितले सिंदे सडे स्वारी येथष दाखल जाले कंपू फौज जाण्यास आठ चार दिवस लागतील तेथुन कुच होण्यास मास पक्ष लागेल आपले कारभारी नित्य गावात जात येत मात्र आस्तात पुढे काय होईल ते पाहावे सेवेसी श्रृत होय हे विज्ञप्ती.

---

लेखांक ५३ श्री २६ जानेवारी १७९९

पौ.छ १९ साबान सन १२०८ पौष व//५शके १७२०

स्वामीचे शेवेशी उभयता सेवकाचे अनंत सीर साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता//छ.१३ रविवार शाबान मु//पुणे जाणोनी स्वामीचे कुशल लेखन निरंतरी पत्री असावे विशेष स्वामीची स्वारी छ ८ रोजी बारा घटकात प्रथा:स अबाजी महादेव यांचे राहुटीस गेली वर्तमान चिरंजीव नी सांगितले सेवकास परम

चिंता प्राप्त झाली श्रीसांबाजीची पुजा केली विनंती केली यजमान स्वामीस येश दयावी भोजेन केले स्वामीच्या नमस्कारास जलद आलो प्रथम गोटात गेलो रामभाऊ निलोबा दादा पुरोहितजी भेटले वर्तमान सांगितले यजमान स्वामी गेले ऐकता कंबर सेवकाची बसली परम चिंताक्रांत होऊन माघशरा गावात दोन घटका दिवस शेष असता पावलो रात्रीत श्रीसांबाजीसी बहुत भांडलो सा घटका रात्र सूर्योदयास राहिली निद्रा रात्रीत आली नाही बाहेर आलो आचमन केले आणखी विनंती केली जागाच आहे भजेन जप व्दारे आरंभिल जागृत स्वप्न पाहिले मी त्रासरूप होऊन घोडीयावर स्वार जालो स्थळ सोडून बाहेर निघालो, तशात स्वारी श्रीसांबाजीची आली पालख्या दोन पुढे पुरूष मागील पालखीत स्त्री परम योग्य वस्त्रे भूषणे अपार पाठीमागे सेंभर दोडसे स्वार स्वारी परम कडकडीत आली मी मार्गात घाबरलो आता उभे कोठे राहु तशात एक ओवरी राजे भटाच्या भीतींस सापडली घोडा त्यात उभा राहिला स्वारी स्वामीची जलद आली म्या उभयता पालख्यात उमा महेश्वर कल्पना करोन नमस्कार केला आज्ञा केली स्वस्थ असावे जाण्याचा उदयोग न करावा स्वारी पालख्या स्वारासुध्दा आपल्या वाडयात शिरले खासे स्त्री पुरूष जिन्यात चढोन आपल्या खासा दिवानखान्यात बसले पुर्वेकडील खिडकी उघडी केली मी भटाच्या भींतीच्या वोवरीत घोडयावर उभा पुढे मार्गात स्वार जाणे कठीण श्रीसांबाजींनी खिडकीतून आज्ञा केली स्वारी येऊन दाखल जाले आता स्वस्त स्नानसंध्या कर्णे घोडे पागेत लावणे बेल फुले तुळशी दुर्वा ब्राम्हणाहाती पाठवीतो चिंता न कर्णे तशात कवाड जासुदाने ुघडले मी जागृत उठुन बसलो सुर्योदयी दिवस बुधवार छ ७ साबान श्रीसांबाजींचे अभय वचन झाले स्वामी छ ८ रोजी गेले छ ७ रोजी रात्री गोविंदराव काळे सिवरामपंत थत्ते बालाजीपंत सेदोरे श्रीमंता धरले छ म//री मंगळवारी प्राथ:काळी काळे सिंहगडास पाठवीले थचे सेदोरे कोकणात किल्ला आरनाळा तेथे पाठवीले घरे माणसे वस्त्र,नाणी,घोडी,हची,बागमळे सर्व जप्ती केली कारकूने मोजदादीस पाठवीले.मंत्री गु // सोंदयांनी हस्तगत केले पाठीमागे काळे यांनी मंत्र्यांकडील खाजगत अंगवस्त्रे तीन ती आपले घरास नेली बागमळे वेताळपेठ रायगड सेत कुरणेयांचा भोगवाटा घेतला आपल्या जमेस सर्व वहिवाट करून दरख नजराणा महालातील कार्येतील मामलेदारास दबाऊण घेतली त्या प्र// थचे सेदोरे यांनी मनस्वी श्रीमंतास समूाण नुकसान केली त्या त्रासे पारपत्य केले आणीख बंधना ठेवीला सिंदयांच्या बावा मोगलाकडे पाठवीतात पत्रे लिहीली बाळा अनंत वकील बायांचा खंडेराव रास्ता वकील रावसाहेबाकडुण बायांकडे नीलोबाचा रास्त्याचा चांगुलपणा आहे निमित्य ठेऊण निळोअनंत छ.९रोजी सिंदयास सांगुण निलोबा धरला चौकसी करोन आत्मारामबाबाच्या जिमेस सोंदयाच्या लस्करात ठेवीला रास्ता श्रीमंतांनी तोफखान्यात पा ो मार्गात जाता कोठे लपाला गुप्तरूप आहे मंत्री

सिंदयाच्या लस्करात पाठीमागे बहुतानी कारभार केला ते सर्व किल्यावर घालावे निमित्य रावसाहेबासुध्दा सर्वांस भय प्राप्त जाले श्रीमंत मंत्र्यांच्या हुकुमात सर्वेपरी जाले अहेत छ१० रोजी कृष्णराव चिटणीस आत्मारामबाबा श्रीमंतांकडे आले विनंती केली शुक्रवारी छ११ रोजी राजश्री दौलतरावबाबा निरोपास येतात आज्ञा जाली नानाकडे जाणे आमची स्वारी व्दादशी भोजनास कोथरूडच्या बागात जाती सिंदे येतात बेत ठरलासा जाला म्हणजे स्वारी बागातून जलद येईल चिटणीस पागनीस चार घटका रात्रीस श्रीमंत राजश्री नानाकडे गेले सिंदयाच्या येण्याचा बेत ठरवला यादी वस्त्रे रकमा हत्ती घोडा मंडळी पोषाख पोतनीस बोलवावे सर्व पाहूण ठेवावे स्वारी बागात भोजनास न जावी सिंदे येतात प्राथ:काळी बज्याबा सिरोलकर सिंदयाकडे पाठवावे स्वस्त स्वारी यावी निरोप वस्त्रे देतो याप्र// निरोप नानानी चिमणाजीपंत समागमे श्रीमंतांकडे पाठवीला मान्ये केले बागात जाणे राहवीले छ ११ रोजी शुक्रवारी प्राथ:काळी श्रीमंतांनी भोजने केली पोतनीस बोलावीला पोषाख पाहून लाबंविले जेव्हाराव्याचा दरोगा बोलावुण रकमा पाहुन ठेवील्या पीलखान्याकडील दरोगा बोलावूण हची नग नेमीला हुजुर पागयास आज्ञा झाली घोडा तयारी असावी त्रितीये प्रहरी दहा घटका दिवस राहता सिंदे खासे आबा चिटणीस कृष्णराव गोपाळराव रायाजी प// बाबूराव आंगरे आले श्रीमंत आरसे महालात होते बज्याबा सिरोलकर सिंदयास  बोलावू गेला होता नारोपंत चिमणाजीपंत बालोजी कुंजीर श्रीमंतापासी जमा होते सिंदे येताच चापेखणात अर्ध घटका बसले नारोपंत चक्रदेव येऊण आरसे महालात श्रीमंत आहेत आपण चलावे खासे मंडळी वर गेले श्रीमंत राजेश्री रावसाहेबास चिमणाजीपंत भाऊंनी विनंती केली सिंदे आले बाबासाहेबी आपणास बोलावीले प्रथम अनमान जाण्याचा केला मागती बालोजी कुंजीर बोलावु पाठवीला सत्वर यावे समागमे पन्नास साठ खासे कमरबंद सुध्दा रावसाहेब आरसे महालात सर्वी ताजीम घेतली लोकासुध्दा रावसाहेब श्रीमंताचे बाजूस बसले विनंती केली आज मृग नक्षत्र आहे आज्ञा घेतो खासा कुच करोन नदीवर खराडी मांजरी दरमीयाण मु//करीतो पागा कारखाना बोलावीले ऐवज जलद पाठवावा लोकास देउन कुच करतो येक घटका या प्रमाणे बोलणे जाली खाशास वस्त्रे ५ कंठी सिरपेच पानदान मंडळीस विडे दिधले त्यांनी अवर खाशास व मंडळीस प्रविष्ठ केले तीन चार घटकात कारभार जाला सिंदे नानाच्या वाडीयात गेले बजाबा सिरोलकर चक्रदेव चिमणाजी पंत श्रीमंतांनी समागमे देऊण नानाकडे पाठवीले. मशारनीले खाली चवकात आले सिंदयाचा हात धरला दरवाजीयावर दिवानखान्यात बैठक होती तेथे बसले दोन घटका बोलणे जाले खासे कुच करीतो गोपाळराव चिटणीस बायाकडे पाठवीतो. रंगासारखे जालीयास समेटी करतील खराडी मांजरीवर मु.// करतो पागा कारखाने पत्रे आज रवाना केली जलद येतील आपणाकडून ऐवज जलद पाठवीला पाहिजे लोकास देऊन कुच करीतो नानानी ब-

